रविवार, 06 नोव्हेंबर 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक -88
RNI : MAH/2021/82566

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 06 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-88 ● RNI : MAH/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5

# नोंदणीकृत कामगारांना घरकुल देणार

## कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे : प्रत्येक जिल्ह्यात कामगार भवन उभारणार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद : राज्याच्या विकासामध्ये कामगार हा महत्वाचा घटक असून शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. कामगारांचा घराचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रधानमंत्री घरकुल योजनेंतर्गत नोंदणीकृत कामगारांना घरकुल देण्यात येणार. यासाठी गायरान, गावठाण तसेच एमआयडीसीमध्ये असणाऱ्या जमिनींचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. प्रधानमंत्री घरकुल योजनेंतर्गत घरकुलासाठी अडीच लाख रुपये मिळतात यामध्ये कामगार विभागाकडून प्रत्येक घरकुलासाठी दोन लाख रुपये देऊन नोंदणीकृत कामगारांना घरकुल देण्याचा महत्वपूर्ण निर्णय आज घेण्यात येत असल्याचे कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी जाहीर केले.**

जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित कामगार विभागाच्या औरंगाबाद विभागीय आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला कामगार विभागाचे प्रधान सचिव विनिता वेद सिंघल, कामगार आयुक्त सुरेश जाधव, उपसचिव दादासाहेब खताळ, सहसंचालक राम दहिफळे आदी अधिकारी उपस्थित होते. कामगार विभागाची सर्व कार्यालये एकाच छताखाली आल्यास प्रशासकीयदृष्ट्या कामकाज करणे सोईचे होणार आहे. म्हणून प्रत्येक जिल्ह्यात कामगार भवन बांधण्यात येणार असून हे काम दर्जेदार आणि कालबद्धरित्या पूर्ण करण्यासाठी योग्य नियोजन करा. कामगार भवन उभारण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात किमान 1 ते 2 एक्कर जागा निवडावी. जागा निवडतांना कामगारांची सोय पहावी. या इमारतीमध्ये जिल्हा कार्यालय व विभागीय कार्यालय अशी स्वतंत्र व्यवस्था करावी. शक्य असल्यास एमआयडीसी सारख्या ठिकाणी जागा निवडा. कामगार भवनचे भुमिपूजन जानेवारी महिन्यात होईल यादृष्टीने कालबद्धरित्या नियोजन सर्व अधिकाऱ्यांनी करावे, असेही डॉ. खाडे यांनी सांगितले. औरंगाबाद विभागातील कामगार विभागाच्या जिल्हा तसेच अन्य कार्यालयाची जागा, विभागातील रिक्त पदे, प्रलंबित प्रकरणे व निपटारा झालेल्या प्रकरणांचा आढावा घेऊन प्रलंबित प्रकरणे डिसेंबर महिन्याच्या शेवटपर्यंत मार्गी लावावे, अशा सुचनाही त्यांनी दिल्या. पुर्वी कामगार नोंदणी करण्यासाठी 25 रुपये नोंदणी फी होती. ही फी कमी करुन आता केवळ 1 रुपयांमध्ये कामगार नोंदणी करण्यात येणार असल्याने अधिकाधिक कामगारांनी नोंदणी करावी, असे आवाहनही डॉ. खाडे यांनी केले.




### बालकामगार आढळल्यास अधिकाऱ्यांवर होणार कारवाई

बालमजूरी निर्मुलन हे शासनाचे धोरण आहे. विभागात बालमजुरी निर्मुलन करण्यासाठी नियमित सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. ज्या जिल्हयात बालकामगार आढळतील त्या जिल्ह्यातील संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही डॉ. खाडे म्हणाले.

### ई-श्रम कार्ड नोंदणीला गती द्यावी

डॉ. खाडे यांनी यावेळी ई-श्रम कार्ड नोंदणीचा आढावा घेतला. ते म्हणाले ई-श्रम नोंदणी काळाची गरज असून प्रत्येक जिल्ह्याने नोंदणी कालबद्धरितीने पूर्ण करावी. नोंदणी वाढविण्यासाठी पूर्ण क्षमतेने काम करावे, असेही ते म्हणाले. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाचा आढावा घेतांना डॉ. खाडे यांनी अतिधोकादायक कारखाने व धोकादायक कारखान्यांचे निरिक्षण वेळेच्या वेळी पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच कामगारांच्या वैद्यकिय तपासणीसाठी ऑनलाईन प्रक्रिया राबवावी, असे सांगितले. प्रधान सचिव विनिता सिंघल म्हणाल्या की, कामगारांची नोंदणी वाढावी यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करावे. विटभट्टी कामगार, बांधकाम कामगार अशा असंघटीत कामगारांची नोंदणी करण्यासाठी त्यांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांची जागेवर नोंदणी करावी. कामागार कार्यालय आणि कामगार यांच्यात थेट संवाद असावा. मध्यस्थीला वाव देता कामा नये. प्रलंबित वैयक्तीत प्रकरणे प्राथम्याने निकाली काढावीत, असेही त्या म्हणाल्या. यावेळी औद्यागिक सुरक्षा विभागांतर्गत देण्यात येणाऱ्या ऑनलाईन सेवा, कामगारांची वैद्यकीय तपासणी, प्राणघातक अपघातांची मागणी, सानुग्रह अनुदान व नुकसान भरपाई आदींबाबत आढावा घेण्यात आला.



# औरंगाबादहून मुंबईसाठी सायंकाळीही विमानसेवा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** इंडिगो कंपनीने सकाळच्या सत्रात मुंबईसाठी विमानसेवा काही दिवसांपूर्वी सुरू केली आहे. ट्रॅव्हल्स एजंट असोसिऐशन ऑफ औरंगाबाद यांनी इंडिगो कंपनीच्या व्यवस्थापनाकडे सायंकाळच्या सत्रात मुंबईसाठी विमान सुरू करण्याची मागणी केली होती. या मागणीनंतर अखेर इंडिगो विमान कंपनीने एक डिसेंबरपासून औरंगाबाद विमानतळावरून सायंकाळच्या सत्रात विमान सेवा सुरू करण्याची घोषणा केली. औरंगाबाद विमानतळावरून सकाळच्या सत्रात टाटा एअर इंडिया कंपनीने मुंबई आणि दिल्लीसाठी दोन विमाने सुरू केली. या विमानांना चांगला प्रतिसाद मिळाला. यानंतर इंडिगो विमान कंपनीनेही सकाळच्या सत्रात विमाने सुरू करण्याचे नियोजन केले. या नियोजनानुसार सकाळच्या सत्रात मुंबई आणि हैदराबाद या दोन शहरांसाठी विमान सेवा सुरू करण्यात आलेल्या आहेत. औरंगाबाद विमानतळावरून इंडिगो विमान कंपनीच्या मुंबई आणि दिल्लीसाठी प्रत्येकी एक आणि हैदराबादसाठी दोन फेऱ्या सुरू केलेल्या आहेत. सायंकाळच्या सत्रात मुंबईसाठी विमान असावे, अशी मागणी अनेकांनी केली होती. यापूर्वी जेट एअरवेजचे मुंबईसाठी सायंकाळी विमान होते. जेट एअरवेजला चांगले प्रवासी मिळत होते. या धर्तीवर ट्रॅव्हल्स असोसिएशन ऑफ




औरंगाबादने इंडिगोच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना सायंकाळच्या सत्रात मुंबईसाठी विमान सुरू करण्याची मागणी केली होती. तसेच याबाबत असोसिएशनकडून पाठपुरावा सुरू होता. या पाठपुराव्यामुळे अखेर इंडिगोने सायंकाळच्या सत्रात मुंबई-औरंगाबाद-मुंबई या मार्गावर विमान चालविण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे औरंगाबादहून जाणाऱ्या प्रवाशांना एका दिवसात मुंबईचा दौरा करता येणार आहे. तसेच मुंबईहून औरंगाबादला येणाऱ्या प्रवाशांनी एकाच दिवसात औरंगाबादचा दौरा करून परत मुंबई गाठता येणार आहे. आगामी एक डिसेंबरपासून औरंगाबाद विमानतळावरून मुंबईसाठी दुसरे विमान सुरू होणार आहे. ६ई५३९२ हे विमान मुंबईहून ५.४० वाजता उड्डाण करणार आहे. हे विमान औरंगाबाद सहा वाजून ४० मिनिटांनी पोहोचणार आहे. तर, ६ई५३८३ हे विमान औरंगाबादहून सायंकाळी सात वाजून १० मिनिटांनी मुंबईकडे निघणार आहे.

# तो हमने भी जख्म नहीं गिने : भुजबळ

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीकडून



देशभरातील विविध राजकीय नेत्यांवर केल्या जाणाऱ्या कारवाईवरून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी जोरदार टीका केली आहे. देशातील कोणत्या पक्षातील किती नेत्यांविरोधात ईडीकडून कारवाई केली जात आहे, याची यादीच छगन भुजबळांनी वाचून दाखवली. या यादीत एकही भारतीय जनता पार्टीचा नेता नाही, ही बाब अधोरेखित करत छगन भुजबळांनी भारतीय जनता पार्टीवर जोरदार टीकास्र सोडलं आहे. ते शिर्डी येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यक्रमात बोलत होते. यावेळी केलेल्या भाषणात भुजबळ म्हणाले की, सध्या देशात एकाही भाजपा नेत्यावर ईडीकडून कारवाई केली नाही. धुतल्या तांदळासारखे राज्यकर्ते पाहायचे असतील तर भाजपाकडे पाहायला हवं. कारण काहीजण स्वतःच सांगतात आम्ही दिल्लीला गेलो, तेथून गुवाहाटीला गेलो आणि सुटलो. ईडीच्या कचाट्यातून मुक्त झाल्यानंतर तेच पुन्हा म्हणतात की, या तपास यंत्रणा स्वतंत्रपणे काम करतात. अरे हा कसला दांभिकपणा आहे? स्वतंत्रपणे काम करत असतील तर मग विरोधी पक्षातील नेत्यांवरच कारवाई का होते? भाजपावर कारवाई का होत नाही? असे सवालही छगन भुजबळांनी उपस्थित केले आहेत. भुजबळ पुढे म्हणाले की, विरोधी पक्षातील नेता जेव्हा भाजपात जातो, तेव्हा तो ताबडतोब शुद्ध कसा होतो? ती काय लाँड्री आहे का? वॉशिंग मशीनमध्ये टाकलं की पांढराशुभ्र व्हायला. राजकारणाची लढाई तुम्ही राजकारणासारखी मैदानात लढा, शिखंडीसारखे तपास यंत्रणांना पुढे करू नका. हिसाब-किताब हमसे न पूछ अब, ऐ जिन्दगी! तूने सितम नहीं गिने, तो हम ने भी ज़ख्म नहीं गिने, अशी शायरी करत छगन भुजबळांनी टोलेबाजी केली आहे. संजय राऊत आणि नवाब मलिकांवरही काय आरोप आहेत? ज्यामुळे त्यांच्यावर ईडीकडून कारवाई केली जात आहे. पण तेही लवकरच बाहेर येतील, कारण अडचणीत असलेल्या कार्यकर्त्यांना शरद पवार कधीही एकटे सोडत नाहीत.

# गंगापूर-लासूरला गुटखा येतोय पॅकबंद खोक्यात


## पोलिसांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष : गुटखा माफियांना राजकीय वरदहस्त


आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर : तालुक्यात गंगापूर,लासूर स्टेशन,वाळूज,पंढरपूर,या मोठ्या गावांसह तालुक्यातील ग्रामीण भागात महाराष्ट्र सरकारने बंदी घेतलेला गुटखा व सुगंधी तंबाखू विक्री करणाऱ्या माफियानी अक्षरशः हैदोस घातला असून या अवैध चालणाऱ्या गुटखा धंद्याविषयी अन्न, औषध भेसळ प्रशासनाच्या काही अधिकारी व कर्मचारी यांना या धंद्याची इत्यंभूत माहिती ठेवतात प्रत्येक महिन्याला अशा धंद्यावाल्यांसोबत संपर्क होतोच अशी माहिती समोर आली आहे गुटखा माफियाशी फोनवर बोलताना त्याचा वेगळा कोडवर्ड बोलला जातो यातून अर्थपूर्ण संबंध जोपासले जात असल्याचे बोलले जाते व लासूर स्टेशन येथील गुटखा माफियाकडून तीन महिने अगोदरच पुढील तीन महिन्याचा मेवा या अधिकारी व कर्मचारी यांना रोख दिला जातो त्यामुळे काही कर्मचारी व अधिकाऱ्यांमुळे अन्न,औषध भेसळ प्रशासन असून अडचण नसून खोळंबा असून गुटखा माफियाना मोठा प्रशासन व राजकीय वरदहस्त असल्याने त्यामुळे कारवाई शून्य असून गाव तिथे टपरी व टपरी तिथे गुटखा सहज मिळत असून तरुण पिढी मात्र व्यसनाधिनतेच्या आहारी जात आहे आत्तातर गुटखा माफियानी नामी शक्कल लढवली असून गुटख्याची तस्करी टाटा पिकअपद्वारे पॅकबंद खोक्यातून करत असून टपरी, दुकान व घरपोहच गुटखा ऑन कॉल हि संकल्पना हे गुटखामाफिया पोलीस व अन्न,औषधी भेसळ विभागाच्या नाकावर टिचून यशस्वीपणे बिनबोभाटपणे ग्रामीण भागासह तालुक्यातील गावोगावी राबवत आहे कसा बखेडा,वैजापूर,श्रीरामपूर,शिऊर,जालना,औरंगाबादेतून राज्य सरकारकडून प्रतिबंध घातलेला हा गुटखा टाटा पिकअपमध्ये पॅकबंद खोक्यात गावोगावी पोहच केला जातो पूर्वी पॅकबंद गोण्यात हा गुटखा येत असे.**

**गुटखा ऑन कॉल अर्थात फोन करा, गुटखा पानंटपरी, चहाटपरी किंवा घरपोहच मिळवा अशी ऑफर गुटखा माफिया लासूर स्टेशनला राबवतात.....**

लासुर स्टेशन येथे पिकअपद्वारे खोक्यात पॅकबंद गुटख्याचा साठा आल्यानंतर तो तालुक्यातील व पंचक्रोशीतील प्रत्येक गावांत पंटरद्वारे दुचाकीवर ठेवून घरपोहच पाठविला जातो फोन करा व गुटखा उपलब्ध होईल, अशा प्रकारची सेवा दिली जाते या व्यवसायावर कारवाई करण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासन विभागाची असली तरी ते तसदी कधी घेत नाही व कारवाई करत नाहीं मात्र कधी कधी पोलीसच कारवाई करतात व नंतर अन्न, औषधी प्रशासनाला बोलावले जाते मात्र अगदी कधी कधीच हा प्रकार पाहायला मिळतो सूत्रांच्या मते गुटखा माफियाचा अर्थपूर्ण हप्ता बंद झाल्यानंतरच अशी कारवाई होत असते.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# गाथा एका शूरवीराची

आधुनिक केसरी


हेमंतच्या आईचे म्हणणे खरे ठरले होते. सगळ्यांनाच आनंद झाला. खरोखर हेमंत वाचला होता, तो सुखरूप होता. सावरकरांच्या शब्दात सांगायचे तर ' अनादी मी अनंत मी अवध्य भला...'त्याच्या हातून पुढे आणखी सेवा व्हायची होती.

वडील बाबुराव त्याला भेटण्यासाठी गोव्याला जाऊन आले. नंतर हेमंत आणि इतर सत्याग्रहींना पोर्तुगीजांनी मुक्त केले. गोवा पोलिसांनी बेळगावपर्यंत पोहोचवले. पण बेळगावातील पोलीस आणि प्रशासनाला त्यांचे महत्व कळले नाही. भारतीय हद्दीत त्यांचे असे अपमानास्पद स्वागत झाले. पण पुढे मात्र मिरज स्टेशनवर त्यांचे स्वागत झाले. त्यांचा जोरदार स्वागत सोहळा पुण्यात झाला. पुण्यातील अनेक मान्यवर संस्थांनी त्यांचा सत्कार केला.

पुढे यथावकाश दिल्लीला जाऊन त्याने पं नेहरूंची भेट घेतली. हेमंतच्या कर्तृत्वाची गाथा ऐकून पंडितजीही प्रभावित झाले. त्यांनी त्याला ' तू आमच्यासोबत काम कर ' असे सांगितले. पण देशभक्ती रोमारोमात असलेल्या हेमंतला राजकारणात रस नव्हता. तो अटल बिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी यांनाही भेटून आला आणि त्यांचा आशीर्वाद घेतला.

इथे हेमंतच्या आयुष्यातील एक रोमहर्षक पर्व संपले. पुढे त्याने आणखी शिक्षण घेतले. यथावकाश लग्न झाले. प्रतिभा नावाची एक नावाप्रमाणेच प्रतिभासंपन्न आणि सुस्वभावी पत्नी त्याला मिळाली. त्याच्यातील ध्येयवाद संपला नव्हता. त्याने पुढे पुण्यात बी एड, एम एड केले. रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीत शिक्षक म्हणून नोकरी मिळाली. या दरम्यान त्यांच्या संसारवेलीवर दोन कन्यापुष्पे उमलली. दरम्यान त्याचे संघकार्यही सुरूच होते. अशातच आफ्रिकेत आदिवासी गरीब मुलांना शिकवण्यासाठी शिक्षकांची गरज आहे अशी जाहिरात त्याच्या पाहण्यात आली. हेमंतने मग आफ्रिकेसाठी प्रयाण केले. तेथे अत्यंत काटकसरीत राहून त्याने आपली सेवा दिली. तेथे दोन वर्षे राहून तो इंग्लंडला आला. तेथून पुढे तो पुण्यास आला. पुण्यात काही दिवस राहून तो अमेरिकेला गेला. तेथे ऑडल्ट एज्युकेशन अंतर्गत प्रौढ शिक्षणाचे वर्ग तो घेऊ लागला. अमेरिकेतच पूर्ण सेवा करून सेवानिवृत्तीनंतर तो भारतात परत आला. पुढे पुण्यात राहू लागला. वयाच्या ८१ व्या वर्षी या गोवा मुक्ती संग्रामातील क्रांतिवीराने अखेरचा श्वास घेतला. कुठल्याही आजाराशिवाय भाग्यवंतास शांतपणे आणि कृतार्थ अवस्थेत येणारा मृत्यू त्याला लाभला. त्याच्या मृत्यूनंतर ' तरुण भारत ' मध्ये त्याच्या गौरवार्थ एक सविस्तर अग्रलेख लिहिण्यात आला होता.

अशा रीतीने हेमंतच्या जीवनातील रोमहर्षक प्रसंगांनी ' क्रांतिसूर्य हेमंत लक्ष्मण सोमण ' हे पुस्तक भरलेले आणि भारलेले आहे. या प्रेरणादायी पुस्तकाचे सर्वांनी विशेषतः तरुणांनी वाचन करावे आणि हा रोमहर्षक आणि अंगावर शहारे आणणारा हा इतिहास जाणून घ्यावा तरच आपल्या स्वातंत्र्याचे मोल त्यांना कळेल. ध्येय म्हणजे काय आणि त्याचा पाठपुरावा कसा करायचा असतो हे कळेल.



# आनंदी पहाट

## अभ्यासपूर्वक विचार महत्वाचाच

आधुनिक केसरी

आपण वर्तमानांत आपले जीवन जगत असताना खरे तर सद्यःस्थितीचा आणि नजीकच्या भविष्यकाळाचा विचार करणे महत्वाचे, गरजेचे आणि म्हणूनच आवश्यक असते. आपण वर्तमानातील जीवन जगताना प्राप्त परिस्थितीचा आनंद लुटण्याच्या ऐवजी भूतकाळाचे गोडवे गात बसतो. मी असे केले होते, तसे केले होते, माझ्यासारखे कोणी काही करूच शकले नव्हते, माझ्याकडे एवढा पैसा होता, मी सर्वांत अधिक व्यवसाय केला होता वगैरे वगैरे.... ह्या सर्वच घटना भूतकाळातल्या असतात, त्याचेच आपण सदोदित कौतुक करत रहात असतो. भूतकाळाचे भूतच जणू काही आपल्या मनाचा ताबा घेऊन सर्वत्र टेंभा मिरवत असते. वर्तमानातल्या "मी" चा त्यामुळेच आपल्याला विसर पडलेला असतो. मागील काळात, गत आयुष्यात, भूतकाळात मी कधी, कसा, कोण, कोठे आणि काय होतो, ह्यापेक्षा सद्यःस्थितीत, आज मी कसा, कोण, कोठे आणि काय आहे? आणि ते सुद्धा का? ह्याचा प्रकर्षाने, प्राधान्याने, सातत्याने आणि साकल्याने अभ्यासपूर्वक विचार करत राहणे गरजेचे असते. मी कालच्या पेक्षाही आज सरस, प्रगत होणे आवश्यक असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या आयुष्यात अथवा इतरत्र काय घडले आहे, हे आपल्याला माहिती असतेच किंवा ते कालांतराने माहिती होतेच. कालची, भूतकाळातील माहिती आपल्या सर्वांनाच उपलब्ध होत असते. वर्तमानात राहून भूतकाळातल्या अनुभवांबरोबर सतत राहणे हे नेहमीच उपयोगाचे ठरते असे नाही. प्राप्त परिस्थितीत काहीवेळा उपलब्ध झालेल्या अनेक चांगल्या संधी आपण गमावू शकतो. ह्याचे नुसते ज्ञान असून चालत नाही तर त्या संधीचे सोने करण्याचे भान आपल्याला असणे आवश्यक असते. अनेकदा आपल्या गत आयुष्यातील अनेक बाबींची सांगड, बरोबरी, तुलना आपण प्राप्त आणि सद्यःस्थितीशी करत असतो.

# परमात्म्याचे प्रियत्व आले की जनप्रियत्व येते



आधुनिक केसरी

परमात्म्याने आपल्याला लोककल्याणार्थ सर्व काही शक्ति द्याव्यात, असे काही माणसांना वाटते, पण अमुक एका देहामार्फत लोककल्याण व्हावे अशी इच्छा का असावी ? देहबुद्धी सुटली नाही असाच याचा अर्थ नव्हे का ? शक्ति वापरण्याचे सामर्थ्य आपल्याला आले तर परमात्मा कदाचित् ती देईलही. लहानाच्या हातात तरवार देऊन काय उपयोग ? लोकांनी आपले ऐकावे असे तुम्हाला वाटते; पण अजून क्रोध अनावर आहे, मन ताब्यात नाही, असेही म्हणता ! तर आधी आपल्या विकारांवर, मनावर छाप बसवा आणि मग लोकांबद्दल विचार करा ! तुम्हाला जनप्रियत्व पाहिजे ना ? मग जनांचा राजा परमात्मा, त्याचे प्रियत्व संपादन करा, म्हणजे जनप्रियत्व आपोआपच येईल. तुम्हाला लोक वाईट दिसतात, पण त्यांना सुधारायला जाऊ नका. तुमच्याच मनात वाईट आहे म्हणून लोक तुम्हाला तसे दिसतात. स्वतःला आधी सुधारा म्हणजे कुणीही वाईट दिसणार नाही.

लहान मुली बाहुलीबरोबर खेळतात, तिला जेवू घालतात, निजवतात. त्यांना ठाऊक असते की ही निर्जीव आहे, पण भावनेने तिला सजीव कल्पून तिच्याशी त्या खेळतात. तुम्हीही अशी भावना का करीत नाही की, परमात्मा आपल्याशी बोलतो आणि आपणही त्याच्याशी बोलतो ? ही भावना जो जो जास्त दृढ होईल, तो तो खरोखर तो तुमच्याशी बोलू लागेल. मनातून आपले नाते भगवंताशी ठेवावे. आपले सगळे जीवन जर भगवंताच्या हाती आहे, तर जीवनातल्या सर्व घडामोडी त्याच्याच हातात असणार.

आपण सात्त्विक कृत्ये करतो, पण त्यांचा अभिमान बाळगतो. सात्त्विक कृत्ये चांगली खरी, पण त्यात अभिमान ठेवला तर फार वाईट. एक वेळ वाईट कृत्ये परवडली; केव्हा तरी त्यांचा पश्चात्ताप होऊन मुक्तता तरी होईल. पण सात्त्विक कृत्यातला अभिमान कसा निघणार ? मी आप्तइष्टांना मदत केली, आणि आपइष्ट म्हणू लागले, 'यात याने काय केले ? परमात्म्याने त्याला दिले म्हणून त्याने मदत केली !' हे ऐकून मला वाईट वाटते ! इथे वास्तविक पाहता परमात्मा त्यांना आठवला, आणि मी मात्र 'मी दिले' असा अभिमान धरून वाईट वाटून घेतो ! परमात्म्याने त्यांना माझ्या हाताने दिले, हीच सत्य स्थिती असताना मला वाईट वाटण्याचे काय कारण ? म्हणून, परमात्म्याच्या इच्छेने सर्व काही घडते आहे ही भावना ठेवावी. आपण परमात्म्याजवळ मागावे की, "तू वाटेल त्या स्थितींत मला ठेव, पण माझे समाधान भंगू देऊ नकोस, माझा मीपणा काढून टाक. तुझा विसर पडू देऊ नकोस. नामामध्ये प्रेम दे आणि तुझ्या चरणी दृढ श्रद्धा सतत टिकू दे."

बोधवचन : आपले जीवन देवाच्या हाती आहे आणि देव नामाच्या स्वाधीन आहे.

– श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# "निरुपण"

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## सद्गुरुकृपा

माझी नाही रे रचना। नाही माझी रसना।
शब्द गुरुप्रसादाचा। नाही कोणाचा उसना।।
सद्गुरू रे माझा थोर। बसे नित्य पद्मासना।
साधे अंबेसी संवादु। मंत्रजप रात्रंदिना।।
त्यांसी रेणुका प्रसन्ना। नमावे त्या भगवाना।
गुरु सांगे ज्या वचना। चंद्रहासा येई काना।।

# संवाद...

आधुनिक केसरी

वाद-संवाद, वाद-विवाद, नाद , साद म्हणायला हे शब्द छान वाटतात. पण यातला संवाद हा शब्द फार गोड आहे. सुरुवातच सं ने झाली आहे. त्याप्रमाणेच साद देखील खूप महत्त्वाची आहे. साद असेल तर प्रतिसाद मिळतो .आणि त्यासाठी संवाद महत्त्वाचा असतो. घरात असो की बाहेर संवाद हा झालाच पाहिजे. वाद-विवाद तर होतच राहतात. त्यातून कधी चांगले तर कधी वाईट निष्पन्न होते. पण संवादातून मात्र नेहमीच चांगले निष्पन्न होते. संवादापेक्षाही कुटुंबात तर सुसंवाद हवा. खासकरून मुलांशी सुसंवाद व्हावा. पक्ष्यांप्रमाणे त्यांनी भरारी जरूर घ्यावी. पण पक्षी जसे सायंकाळी आपल्या घरट्याकडे परततात तसे मुलांनी, पालकांनी आपल्या घरात एकत्र जमावे. एकत्र जेवण करावं. आणि त्याच वेळी एकमेकात सुसंवाद व्हावा. नव्हे तो पालकांनी घडवून आणावा. मोठ्यांचे अनुभव लहानांच्या उपयोगात यावे .आणि त्यासाठीच सुसंवाद व्हावा.

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-45


विचारांची देवाण-घेवाण व्हावी. कधी हलकासा विनोदही व्हावा. मुलं थोडी मोठी असतील तर त्यांचं आधी ऐकून घ्या. आणि जो काय सल्ला द्यायचा असेल तो हळूवारपणे द्या. संवादातून द्या.जे काय सांगणार आहे ते मुलांना पटलं पाहिजे. ओरडून, रागावून, खोचक, रूक्ष भाषेत सांगण्याची गरज नाही, त्यामुळे वादाला तोंड फुटते. संवाद हरवून जातात.मुलं भावनाशून्य होतात. प्रेमाचा ओलावा कमी होतो. मनात वाळवंट तयार व्हायला लागते. संवाद होईल अशी कुठलीही आशा वाटत नाही. त्यामुळे घरातले वातावरण बिघडते. उगीचच स्वर्गाचा नरक वाटायला लागतो. सगळ्यांची तोंड पडलेली दिसतात. रंगाचा बेरंग होतो. सरळ बोललो तरी वाकडेच वाटते. त्यासाठी मोठ्यांनी वाद टाळून नेहमीच सुसंवाद साधावा. एकमेकांशी संवाद साधल्याने मन प्रसन्न राहते. स्वर्गसुख मिळाल्याचा आनंद होतो .आपली लेकरं खुश तर आपण खुश. घरी परतण्याची मुलांना ओढ असावी. त्यासाठी आपला त्यांच्या सोबत नेहमीच सुसंवाद असावा.

# एक आगळा संत!

आधुनिक केसरी

महाराष्ट्राच्या उज्ज्वल संतांच्या प्रभावळीत संत रामदासांचे वेगळेपणे फार ठसठशीतपणे समोर येते. वाङ्मयीन, सामाजिक आणि राजकीय या तीन अर्थांनीच रामदास हे इतरांपेक्षा वेगळे होते असे नव्हे, तर ते ज्या काळात जन्मले आणि जी शिकवण त्यांनी दिली हे पाहिले तर त्यांच्यातील मोठेपण समजून घेण्यास मदत होईल. अल्लाउद्दीन खिलजीचे आपल्या प्रदेशात येणे, विजयनगर साम्राज्याची वाताहत आणि एकंदरच या प्रदेशावर झालेले परकीय आक्रमण यामुळे ज्याला आज महाराष्ट्र म्हणून ओळखले जाते तो प्रदेश मनाने मेलेल्या अवस्थेत जवळपास चारशे वर्षे राहिलेला होता. तेराव्या शतकाच्या सुरुवातीस यवनांचे आक्रमण महाराष्ट्रावर होण्यास सुरुवात झाली. सुरुवातीला आपल्याकडील राजवटींनी सुरुवातीच्या काळात त्यांना तोंड दिले. परंतु नंतर नंतर त्यांचा धीर सुटला. विजयनगरच्या साम्राज्यातला रामदेवराय मारला गेला आणि हा संपूर्ण टापू परकियांच्या अमलाखाली आला. एका दुर्दैवी योगायोगाचा भाग म्हणजे एकीकडे आपला प्रांत असा परकियांच्या अमलाखाली येत होता आणि त्याच वेळी संत ज्ञानेश्वर समाधी घेत होते. अल्लाउद्दीन खिलजी ज्या वर्षी आपल्या प्रांतात आला त्याच काळात संत ज्ञानेश्वरांनी संजीवन समाधी घेतली. त्यानंतर जवळपास चारशे वर्षे हा प्रदेश मनाने मेलेलाच राहिला. अनन्वित अत्याचार झाले. परंतु भागवत धर्माचा प्रभाव इतका की त्यालाही तोंड देऊन माणसं जिवंत राहिली, धर्म जिवंत राहिला; परंतु काही करायची ऊर्मी मात्र हा समाज घालवून बसला.

अशा या मनाने मेलेल्या समाजाला उभे राहावे असे वाटले ते १६३० नंतर. म्हणजे शिवाजी महाराजांच्या जन्मानंतर. त्यानंतर या प्रदेशात



धुगधुगी निर्माण झाली आणि मुर्दाड समाजाला पहिल्यांदा 'स्व'ची जाणीव झाली. राजकीय पातळीवर हे होत असताना सामाजिक पातळीवर या आणि अशा ओल्या समाजाला आकार देण्याचे काम संतांनी केले. त्यात रामदासांचा वाटा जास्त महत्त्वाचा. कारण त्यांनी भक्तांना मेल्यानंतर स्वर्गात जाता यावे यासाठी पुण्य जमा करण्याचे शिकवण्याची संतांची पारंपरिक भूमिका सोडून इहलोकातील अस्तित्वास महत्त्व द्यायला शिकविले. तोवर हा देह नश्वर आहे. तो कधी तरी जाणारच. त्याची कशाला इतकी काळजी करायची. वगैरे प्रकारच्या शिकवणींनी मराठी मनावर शेवाळ निर्माण झाले होते. ते रामदासांनी घालवले. शरीरास महत्त्व आहे. तेच टिकले नाही तर पुण्य काय करणार. असा थेट सवाल केला आणि धडधाकट राहण्याचे महत्त्व निर्माण केले. सर्वसाधारण जनतेस निराकार भक्ती जमत नाही. डोके ठेवण्यासाठी त्यांना कोणाची तरी मूर्ती हवी असते, एखादा ज्याला देव म्हणता येईल असा आकार हवा असतो. मारुतीच्या निमित्ताने समर्थांनी तो आकार मोठ्या प्रमाणावर समाजात पसरवला. त्यामुळे पूजा करायची तर भीमरूपी महारुद्राची करायची आणि अणुपासोनी ब्रह्मांडाएवढा होण्याच्या त्याच्या क्षमतेची आराधना करायची हे रामदासांनी तरुण, बेकाम पोरांना शिकवले.

कोणापुढे तोंड उघडायाची वेळ आली तर आपला अभ्यास पक्का हवा, हा त्यांचा सल्ला आहे. त्यासाठी ते सांगतात.. अभ्यासोनी प्रकट व्हावे, ना तरी झाकोन राहावे, प्रकटोनी नासावे, हे बरे नव्हे. याचा साधा अर्थ असा की एखाद्या विषयावर बोलायच्या आधी अभ्यास हवा, तो नसेल तर आपलेच हसू होईल आणि ते काही बरे नाही.

रामदासांपर्यंतच्या संतांच्या शिकविण्यात तत्कालीन परिस्थितीमुळे असेल, पण एक प्रकारचा निरिच्छवाद दिसतो. त्या वेळी परकीय आक्रमक मोठ्या प्रमाणावर अत्याचार करीत होते. घरेदारे, पोरेबाळे लुटत होते. त्यामुळे संसार हा एक प्रकारे असार बनला होता आणि प्रपंचाचा एक प्रकारे कंटाळा आला होता. तो संतांच्या वाङ्मयातही दिसतो. हा कंटाळा रामदासांनी घालवला. प्रपंच करण्यात काहीही कमीपणा नाही, तो करतानासुद्धा ईश्वरभक्ती करता येते. किंबहुना तो चांगला झाला तरच ईश्वर भेटतो इतक्या ठसठशीतपणे रामदासांनी आपली शिकवण दिली. प्रपंच करावा नेटका. असे अन्य कोणी संतांनी सांगितल्याचे दिसणार नाही. 'संसार त्याग न करिता, प्रपंच उपाधी न सांडता, जनामध्ये सार्थकता, विचारेची होय. दृढ निश्चय करावा, संसार सुखाचा करावा, विश्व जन उद्धारावा, संसर्गमात्रे' अशी रामदासांची शिकवण. प्रपंच नेटका करायला हवा. मग तो नेटका करण्यासाठी काय काय अडचणी येऊ शकतात, याची सहज शिकवण रामदास देतात. म्हणजे तरुणपणी एखादा प्रेयसीच्या प्रेमात कसा जगाला विसरतो, आईवडिलांकडे कसा दुर्लक्ष करतो आणि नवसाने झालेला हा पोरगा बायकोच्या प्रेमापोटी आपल्याशी असा वागू लागल्यावर वृद्ध आईवडिलांना शंखतीर्थ कसे घ्यावे लागते. हे सांगणे असो, वा ब्राह्मणे बाळबोध अक्षर, घडसून करावे सुंदर, जे पाहताची चतुर समाधान पावती. असा विद्यार्थ्यांना दिलेला सल्ला असो, रामदास रोजच्या जगण्यातील उपयुक्ततेत भर घालतात. **(क्रमशः)**

महाराष्ट्र टाइम्स
AUSPICIOUS BEGINNING
ADVERTORIAL



इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन, नवी दिल्ली (आयएसटीई) कडून बेस्ट इंजिनियरिंग कॉलेज- २०२२ अवॉर्ड डॉ. प्रमोद सावंत - मुख्यमंत्री, गोवा यांच्या हस्ते स्वीकारताना प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे.

## सी.एस.एम.एस.एस. छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग


# अभियांत्रिकीसाठीचा सुयोग्य पर्याय

बदलती जीवनशैली, जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानामुळे आज विविध क्षेत्रात इंजिनिअर म्हणून करिअर करण्याची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाली आहे. हळूहळू संपूर्ण भारत आणि जगभरात सर्व शाखांमध्ये कुशल इंजिनिअर्सची मागणी वाढत आहे. ही दृष्टी डोळ्यासमोर ठेऊन संस्थेचे अध्यक्ष इंजि. रणजीत मुळे आणि सचिव श्री. पद्माकरराव मुळे यांनी सी.एस.एम.एस.एस. छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगची उभारणी २०१३ साली केली. आमचा असा विश्वास आहे की विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भवितव्य घडवण्यात महाविद्यालयाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते.


कॉर्पोरेट जगतातल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि जबाबदाऱ्या पेलण्यासाठी तयार असलेला तरुण इंजिनिअर घडवण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. विद्यार्थीकेंद्रित शिक्षणासोबतच आम्ही त्यांचं चारित्र्य घडवण्यासाठी तसंच नैतिक मूल्यांची जपवणूक करण्यासाठी कटिबद्ध आहोत.

आमच्या विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढवण्यासाठी आम्ही नियमितपणे ॲप्टिट्यूड डेव्हलपमेंट, सॉफ्ट स्किल्स, इण्डस्ट्री ओरिएण्टेड ट्रेनिंग देतो. उद्योगासाठी कुशल इंजिनिअर देऊन आम्ही अल्पावधीतच नामांकित कंपन्यांकडून प्रशंसा मिळवली आहे. अनेक प्रमुख कंपन्या आमच्या विद्यार्थ्यांना प्लेसमेंटच्या संधी देण्यासाठी आमच्या संस्थेला सातत्याने भेट देतात.

नॅशनल प्रोग्रॅम ऑन टेक्नॉलॉजी एनहान्स्ड लर्निंग (एनपीटीईएल) आणि कोर्सेरा या प्लॅटफॉर्मच्या मदतीने प्रयोगशील व व्यावहारिक शिक्षण देण्याच्या प्रक्रियेवरही संस्था लक्ष केंद्रित करते. या पद्धतीमुळे आमचे विद्यार्थी विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये प्रावीण्य मिळवत आहेत; त्यापैकी काहींनी विद्यापीठ श्रेणी आणि सुवर्ण पदकंदेखील मिळवली आहेत. चांगल्या शैक्षणिक कामगिरीसोबतच आमचे विद्यार्थी गेट, कॅट, यूपीएससी, एमपीएससी आदी परीक्षांमध्ये उत्तम कामगिरी करत आहेत. येणाऱ्या काळात आमचे विद्यार्थी टॉफेल, जीआरई, आयईएलटीएसमध्ये उत्कृष्ट कामगिरी करू शकतील यासाठी आम्ही अधिक लक्ष केंद्रित करत आहोत. शैक्षणिक अभ्यासक्रमासोबतच आम्ही विद्यार्थ्यांना सांस्कृतिक आणि क्रीडा प्रतिभा प्रदर्शित करण्यासाठी सर्वोत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देतो. आमच्या अनेक



इंजि. श्री. रणजित मुळे



श्री. पद्माकर मुळे

विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धेत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळवले आहेत.

नियमित अभ्यासक्रम, सह-अभ्यासक्रम आणि अभ्यासेतर उपक्रमांच्या माध्यमातून आमचे विद्यार्थी शैक्षणिक तसंच इतर स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत आहेत. अलिकडेच, आमच्या विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय स्तरावरील स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२२ मध्ये प्रथम पारितोषिक व अखिल भारतीय स्तरावरील एसएई ई-बाजाच्या कॉस्ट अॅवॉर्डच्या श्रेणीतील प्रथम पारितोषिक पटकावलं आहे. तसंच नॅशनल गो-कार्ट ऑटो इंडिया रेसिंग चॅम्पिअनशिप २०२२ मध्ये बिझनेस प्लॅन आणि सर्वोत्कृष्ट महिला रेस कार ड्रायव्हर पुरस्कार व एसएई टीफन२०२२ मध्ये सर्वोत्कृष्ट उत्पादकता पुरस्कार आणि आयआयटी बॉम्बे येथे राष्ट्रीय स्तरावरच्या ई-यंत्र रोबोटिक्स स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळवलं आहे.

विशेष म्हणजे आमचे प्राध्यापक, कर्मचारीवृंद, विद्यार्थी, माजी विद्यार्थी यांच्या अथक परिश्रमामुळे आणि दूरदृष्टी असणारे आमचे मा. अध्यक्ष व मा. सचिव यांच्या मार्गदर्शन व पाठिंब्यामुळे आम्हाला इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन, नवी दिल्ली (आयएसटीई) यांच्याकडून **'सर्वोत्कृष्ट अभियांत्रिकी महाविद्यालय - २०२२'** या पुरस्काराने गौरवण्यात आलं आहे.

आमच्या संस्थेत सर्वोत्कृष्ट पायाभूत सुविधा दिल्या जातात. उत्कृष्ट क्लासरूम, सुसज्ज प्रयोगशाळा, मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह, २४ तास सतर्क सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरा, २४x७ वैद्यकीय सुविधा, व्यायामशाळा, भव्य क्रीडा संकुल, वातानुकूलित सभागृह, कॅफेटेरिया, शहराच्या कानाकोपऱ्यातून बस सुविधा उपलब्ध आहे.

उद्योग आणि शैक्षणिक महाविद्यालय यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी आम्ही आयबीटीआर, आयआयटी बॉम्बे (ई-यंत्र रोबोटिक्ससाठी नोडल सेंटर, व्हर्च्युअल लॅब आणि स्पोकन ट्युटोरियल), जीआयझेड, सीएसआय, सीआयआय, टीएएसीटी, सीएमआयए, मसीआ, एनआयपीएम, आयएसटीई, आयईटीई आदी नामांकित संस्थांसोबत जोडले गेलो आहोत. तसंच महाविद्यालयात विविध प्रोफेशनल ऑर्गनायझेशनचे स्टुडण्ट चॅप्टर्स असून ते विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता अनेकविध उपक्रम राबवतात.

विविध क्षेत्रातले सेंटर ऑफ एक्सलन्स, उदा. ई-मोबिलिटी रिसर्च अॅण्ड स्किल डेव्हलपमेण्ट, रेड हॅट, एडब्ल्यूएस अॅकेडमी, हनीवेल, पलोअल्टो नेटवर्क्स, सेलोनिस, ज्युनिपर नेटवर्क्स इत्यादी केंद्रांशी संलग्नता असल्यामुळे विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित होते. सेंटर फॉर टेक्निकल स्किल्स अँड आंत्रप्रिनरशिप या केंद्रांतर्गत स्टार्ट-अप इनक्युबेशन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना संस्थेच्या सहकार्याने त्यांच्या कल्पनांवर काम करण्याची आणि इनक्युबेशनची संधी प्राप्त करून देण्यात आली आहे.

आमच्या विद्यार्थ्यांच्या काही स्टार्ट-अप्सना इंटरनॅशनल सेंटर फॉर आंत्रप्रिनरशिप अॅण्ड टेक्नॉलॉजी (आयक्रिएट इनक्युबेशन सेंटर, अहमदाबाद) आणि मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अॅण्ड अॅग्रीकल्चर (मसीआ) तसंच मराठवाडा अॅक्सलरेटर फॉर ग्रोथ अॅण्ड इनक्युबेशन कौन्सिल (मॅजिक) यांच्यातर्फे निधीदेखील मिळाला आहे. स्टार्ट-अप संस्कृतीला चालना देण्यासाठी आमच्या संस्थेने कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे च्या भाऊ इन्स्टिट्युट ऑफ इनोव्हेशन, आंत्रप्रिनरशिप अॅण्ड लीडरशिप तसंच केपीआयटी टेक्नॉलॉजिज लिमिटेड यांच्याशी सामंजस्य करार केले आहेत. विद्यार्थ्यांचं उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

Academics + Soft skills + Discipline + Placement = CSMSS... Where Success Begins!!!

**- डॉ. उल्हास शिंदे**
प्राचार्य, सी.एस.एम.एस.एस. छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, औरंगाबाद.

# प्रोफेशनल करिअर आणि प्लेसमेंटच्या संधी म्हणजेच सी.एस.एम.एस.एस.!

सी.एस.एम.एस.एस. छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल विद्यार्थ्यांच्या करिअरमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे आणि हा संस्थेचा एक महत्त्वपूर्ण स्तंभ आहे. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल विद्यार्थ्यांना त्यांच्या रोजगार क्षमतेत वाढ करण्यासाठी विविध प्रशिक्षण देऊन त्यांच्या करिअरचे ध्येय साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. विद्यार्थी, माजी विद्यार्थी, प्राध्यापक आणि औद्योगिक क्षेत्र यांच्या मजबूत भागीदारीद्वारे हे साध्य केलं जात आहे.

सी.एस.एम.एस.एस.ने ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल करीता प्राध्यापक आणि विद्यार्थी समन्वयकांची समर्पित टीम तयार केली आहे. हे विद्यार्थी समन्वयक प्रशिक्षण कार्यक्रम आणि कॅम्पस इंटरव्ह्यूच्या नियोजन आणि व्यवस्थापनात सक्रिय सहभाग घेतात, यामुळे त्यांचे व्यवस्थापन, आंतरवैयक्तिक आणि नेतृत्व कौशल्य विकसित होते. ज्यामुळे त्यांना भविष्यात उत्तम कार्य करण्यास मदत होते. सी.एस.एम.एस.एस.ने या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलसाठी सुसज्ज ऑडिटोरियम, सेमिनार हॉल, कंप्युटर सेंटर, ग्रुप डिस्कशन रूम, इंटरव्ह्यू रूम इत्यादी अनेक सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

या संस्थेत उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञ, औद्योगिक क्षेत्राना भेटी आणि इंटर्नशिपची संधी प्रामुख्याने दिली जाते जेणेकरून विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील कार्यसंस्कृतीविषयी माहिती अधिकाधिक उत्तमप्रकारे मिळते.

सध्याच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, निर्णयक्षमता, नाविन्यपूर्ण कल्पकता या गुणांची आवश्यकता असून व्यावसायिक जीवनातील आव्हानांना तोंड देण्यास तो सदैव तयार आणि सक्षम असला पाहिजे. सी.एस.एम.एस.एस.मध्ये सर्व विद्यार्थ्यांना कंपन्यांच्या गरजेनुसार तज्ज्ञांकडून प्रशिक्षित केले जाते. आम्ही विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाकरीता अधिक प्रोत्साहन देतो. उदाहरणार्थ - अगदी पहिल्या वर्षापासून ॲप्टिट्युड डेव्हलपमेण्ट, इंग्लिश कम्युनिकेशन, सॉफ्ट स्किल्स डेव्हलपमेंट, कोडिंग आणि प्रोग्रॅमिंग स्किल्स (सी, सी प्लस प्लस, पायथॉन, जावा प्रोग्रॅमिंग) आणि कंपनी स्पेसिफिक ट्रेनिंग यासारखं अद्यावत प्रशिक्षण दिलं जातं. याशिवाय पूर्व आणि अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी रेझ्युमे रायटिंग वर्कशॉप्स, ग्रुप डिस्कशन्स आणि मॉक इंटरव्ह्यूजचं प्रशिक्षण आदी उपक्रम आयटी-प्रोडक्ट, आयटी-सर्व्हिसेस, कोअर आणि इतर कंपन्यांच्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये प्लेसमेंटसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.

दरवर्षी महाविद्यालयामध्ये नामांकित ५० हून अधिक कंपन्या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हसाठी येतात. यामध्ये प्रामुख्याने इन्फोसिस, टीसीएस, कॅपजेमिनी, अॅसेंचर, कॉग्निझंट, पर्सिस्टंट, ॲमडॉक्स, विप्रो, टेक महिंद्रा, एण्ड्रेस-हाऊसर, व्हेरॉक, एन्ड्युरन्स, कॅनपॅक, सिमेन्स, ग्राइंड मास्टर, बॉश, जबिल सर्किट्स, बर्कहार्ट कॉम्प्रेशन, जिंदाल सॉ, टाटा टेक्नोलॉजीस, प्रिमिअम ट्रान्समिशन, लिभेर अप्लायन्सेस यासारख्या अनेक नामांकित कंपन्यांचा समावेश आहे.



इन्फोसिसचे मनुष्यबळ विकास विभागाचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री. अभिजेश जोशी यांचा कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हदरम्यान सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. दीपक पवार

गेल्या तीन वर्षात संस्थेने 'इन-कॅम्पस, पूल कॅम्पस आणि 'ऑफ-कॅम्पस' उपक्रमांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील २,२०० हून अधिक विद्यार्थ्यांना यशस्वीरित्या जॉब मिळवून दिला आहे, त्यामध्ये ९३५ हुन अधिक सी.एस.एम.एस.एस.च्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. २०२१ आणि २०२२ मध्ये ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल ने सी.एस.एम.एस.एस.च्या ६५५ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंट दिले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने टीसीएस- ७६, इन्फोसिस- ७४, विप्रो- ६८, कॅपजेमिनी- ६४, अॅसेंचर- २७, कॉग्निझंट- २६, ॲमडॉक्स- १७ अशा अनेक नामांकित कंपन्यांचा समावेश आहे. सर्वात जास्त पॅकेज रुपये १५ लाख आणि सरासरी पॅकेज ३.८५ लाख रुपये इतकं आहे. आमचे विद्यार्थी केवळ बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्येच नव्हे तर स्पर्धात्मक परीक्षांद्वारे सरकारी सेवांमध्येही उत्तम यश संपादन करत आहेत.

सी.एस.एम.एस.एस.च्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलने मागील अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांची गुणवत्तापूर्ण कॅम्पस प्लेसमेंट करण्यामध्ये सातत्य राखलं आहे. सी.एस.एम.एस.एस.चे विद्यार्थी विविध क्षेत्रात आपली गुणवत्ता सिद्ध करत असून देशाच्या विकासात मोठं योगदान देत आहेत.

**- प्रा. दीपक पवार**
ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर, सी.एस.एम.एस.एस. छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग




कॅपजेमिनीचे श्री. मन्नान बोबडे - मनुष्यबळ विकास व्यवस्थापक व त्यांची कॅम्पस हायरिंग टीम यांच्यासोबत कॅम्पस ड्राइव्हमध्ये निवड झालेले विद्यार्थी

CSMSS
Since 1986
www.csmssengg.org
Since 2013
CHHATRAPATI SHAHU MAHARAJ SHIKSHAN SANSTHA
CHH. SHAHU COLLEGE OF ENGINEERING
DTE CODE 2533
Approved by AICTE, New Delhi, Govt. Of Maharashtra & Affiliated to DBATU, Lonere
KANCHANWADI, PAITHAN ROAD, AURANGABAD. (M. S.)
PH: 0240-2646383, 363 MOBILE NO. 8600012515, 9011629299
ADMISSIONS OPEN FOR B.TECH. & M.TECH.

A GRADE COLLEGE By University
BEST ENGG. COLLEGE AWARD BY ISTE-2022
DISCIPLINED ACADEMICS & EXCELLENT PLACEMENTS
CO-CURRICULAR & EXTRA CURRICULAR ACTIVITIES
HIGHLY QUALIFIED & EXPERIENCED FACULTIES
FUTURISTIC INFRASTRUCTURE & AMENITIES

| BRANCH | CHOICE CODE |
|---|---|
| CIVIL ENGINEERING (UG & PG) | 253319110 |
| ELECTRICAL ENGINEERING | 253329310 |
| MECHANICAL ENGINEERING (UG & PG) | 253361210 |
| ARTIFICIAL INTELLIGENCE & DATA SCI. | 253399510 |
| ELECTRONICS & COMPUTER ENGG. (UG & PG) | 253384410 |
| COMPUTER SCIENCE & ENGG. (UG & PG) | 253324210 |


PROUD ALUMNI OF CSMSS

At CSMSS, I was accompanied by highly intellectual, experienced and supportive faculty members who helped me to enhance my skills and knowledge. Apart from academics activities, the institute motivates students to participate in competitions like SAE TIFAN, BAJA, ROBOCON, SMART INDIA HACKATHON, E-YANTRA etc. that help students in holistic development. I can never forget the contributions of my Department and the Training & Placement Cell for helping and guiding me throughout my placements.
KRISHNA KALATRE
B.E. - Mechanical Engineering, 2019 Batch, Graphics & Advance Visualization Specialist - JOHN DEERE INDIA PVT. LTD., PUNE

The four amazing years just passed in the blink of an eye. At CSMSS, in addition to the concepts of Computer Science & Engineering, the faculty members of the Department focuses on competitive programming using various platforms. Respected Principal Sir, HOD and Faculty members guided & supported us in every step of success. The Training & Placement Cell provides prior training and works as a bridge between students and potential companies. I am delighted to begin my professional journey with WIPRO.
SNEHAL BHALE
B.Tech. - Computer Science & Engineering, 2022 Batch, Project Engineer - Data Science (Turbo), WIPRO

I am very glad to share my positive journey in CSMSS Chh. Shahu College of Engineering. All the faculties are enthusiastic and always ready to help. They not only focused on regular academic activities but but also motivate and guide students to prepare for Government Sector and competitive exams. Because of blessings of my teachers and my parents, I was able to clear the MSEDCL exam and take my professional journey to another level. I appreciate the efforts taken by Electrical Department ad all the staff members.
VIVEK JADHAV
B.E. - Electrical Engineering, 2019 Batch, Junior Engineer - Maharashtra State Electricity Distribution Company Limited (MSEDCL)

Hello, I raised and grew in the CSMSS with Technical skills and Leadership quality. CSMSS not only taught me engineering modules but also helped me to achieve my career objectives. Throughout my Bachelors study at CSMSS, I had been keenly involved in various technical events, cultural and sports activities which leads to overall personality development. The institute has highly qualified, experienced and caring teaching and management staff who supported me in my journey from India to United Kingdom.
PAWAN RAHATE
B.E. - Mechanical Engineering, 2018 Batch, Assistant Project Manager - Amazon Logistics, United Kingdom.
Major Campus Placement 2021 & 2022

| TCS | Infosys | Wipro | Capgemini | accenture | Cognizant | amdocs |
|---|---|---|---|---|---|---|
| 76 | 74 | 68 | 64 | 27 | 26 | 17 |


CSMSS Chh. Shahu College of Engineering provides a great exposure to students by organizing different activities and trainings. Here, the atmosphere is full of motivation and innovation. It is all because of the efforts put by our Respected Principal Sir, Faculty Members and Training & Placement Cell which always make sure that students get placed in the best company in the market. My confidence has been boosted after coming here. I am really thankful to our institute and my department for providing platform to enhance my career.
NAYAN JADHAV
B.Tech. - Electronics & Telecommunication, 2021 Batch, System Engineer (Digital) TCS

It was great time spend in CSMSS Chh. Shahu College of Engineering. The campus environment is very positive. The relationship between faculty and student is very cordial, which gave me an opportunity to excel in my area of interest. The institute has excellent faculties and they are very cooperative. It has a very strong Training & Placement Cell which regularly conducts Aptitude Training, Soft Skill Sessions, Mock GDs & Interviews, etc. which helped me to grow in my professional career.
PRIYA HINGMIRE
B.E. - Civil Engineering, 2018 Batch, Senior BIM Engineer nCircle Tech Pvt. Ltd., Pune.
HELP DESK CENTERS- OSMANPURA-9260389794, BAJAJNAGAR-8788598902, 8888553275
SOME OF OUR BRAND RECRUTIERS
Atos | GRIND MASTER | Atos Syntel | XORIANT | SIEMENS | TATA TECHNOLOGIES | Mahindra
BOSCH Invented for life | JABIL | HEXAWARE | LIEBHERR | Tech Mahindra | NeoSOFT TECHNOLOGIES
Burckhardt Compression | BYJU'S The Learning App | PREMIUM | JINDAL SAW LTD TOTAL PIPE SOLUTIONS | MPHASIS an HP company | Atlas Copco | Endress+Hauser
JOHN DEERE | ENDURANCE | Jio | CANPACK | Persistent | COSMO FILMS Engineered to Enhance | VARROC | Ajeet | GIACL
Thinking Placements, Think CSMSS!
HON. PADMAKAR MULAY SECRETARY | HON. RANJEET MULAY PRESIDENT | DR. SHRIKANT DESHMUKH ADMINISTRATIVE OFFICER | DR. ULHAS SHINDE PRINCIPAL

# पर्यटनातून व्यक्तिमत्त्व विकास



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**फिरण्यामुळे बाहेरचे जग कळते. जग कळणे म्हणजे अनुभवाची व्याप्ती वाढणे. कोणत्याही माणसाला काही नवीन शिकायचे तर निश्चित मार्ग आहेत. त्यापैकी एक मार्ग म्हणजे पर्यटन होय. घरचा शहाणा व बाहेरचा वेडा बरोबरीचे असतात असे म्हटले जाते ते त्यामुळेच. उद्देशासह किंवा निरुद्देश फिरणे कसेही असले तरी आपल्या अनुभवात भरच पडते. आणि अनुभव हा कोणत्याही गुरुपेक्षा सरसच म्हणावा लागेल. भौगोलिक विविधता, असंख्य चालीरीती आणि खाणपाणाच्या वेगवेगळ्या पद्धती, पोशाख आणि बरेच काही हे सर्वत्र वेगळे असल्यामुळे ते आपणांस फिरण्यामुळे अनुभवायला मिळते. माणूस उन्नत होतो.**

फार प्राचीन काळापासून माणूस भटकंती करत आलेला आहे. जगण्याच्या ओढाताणीतून त्याच्या नशिबी फिरणे आले असले तरी फिरण्यातूनच त्याला एके ठिकाणी स्थिर होण्याची कल्पना सुचली असावी. वेगवेगळ्या प्रदेशात फिरल्यामुळे त्या ठिकाणची एकूण परिस्थिती, वातावरण कसे आहे हे माणसास ज्ञात झाले. जर आपण फिरलोच नाही, घर सोडून बाहेर निघालो नाही, तर आपणास हे जग पूर्णत्वाने कळणार नाही. विशेषतः भारताच्या बाबतीत आपणास बाहेर जगात कुठे फिरायला जाणे जमले नाही तरी आपल्या देशातच आपण फिरल्यास पूर्ण जगाचा अनुभव घेतल्याची अनुभूती आपणास प्राप्त होईल, एवढी विविधता आपल्या देशात आहे. अगदी जम्मू-काश्मीर पासून ते कन्याकुमारी पर्यंत आणि इकडे गुजरात पासून ते पूर्वोत्तर राज्यापर्यंत आपण एकदा तरी निश्चितच भटकंती केली पाहिजे. तसे पाहता अलीकडे पर्यटन व्यवसाय तेजीत चालत आहे.
पूर्वीच्या काळी लोकांकडे शेतीच्या उत्पादना व्यतिरिक्त उत्पन्न मिळविण्याचे दुसरे कोणतेच साधन उपलब्ध नव्हते, परंतु अलीकडे मात्र वेगवेगळे जोडधंदे आणि व्यवसाय करून आणि वेगवेगळ्या क्षेत्रात नोकरी करून माणसे आर्थिक सधन होत आहेत. ही सधनता सर्वांकडेच आहे असेही आपणास म्हणता येणार नाही, परंतु तरुण पिढीच्या उद्यमशीलतेमुळे आपण आपला आर्थिक स्तर बराच उंचावला यातही दुमत नाही. या आर्थिक संपन्नतेतून बाहेर फिरायला जाऊ वाटणे काही गैर नाही. यातही काही महाभाग कुठे जायचे फिरायला? काय होते फिरण्याने? विनाकारण पैशाचा अपव्य मात्र होतो, असेही म्हणणारे आहेत. केवळ पैसा जमवणे आणि पैशाला पैसा जोडत बसणे, एवढेच त्यांच्या आयुष्याचे ध्येय असते. वेगवेगळ्या कारणाने किंवा हेतूपुरस्सर विविध ठिकाणी फिरायला गेल्यामुळे आपल्याही व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असतो. फिरण्याने माणसाचे मन विस्तीर्ण होते. परमनप्रवेशबुद्धी विकसित होते. एक प्रकारचा ताजेतवाणेपणा वाटत राहतो. एकरेषीय जगणे थोडेसे सैल झाल्यामुळे विमुक्तपणाचा अनुभव प्रतीत होतो. मुक्तता हे आयुष्याचे सारसर्वस्व असल्याने फिरण्यातून मिळणारा आनंद हा अवर्णनीय स्वरूपाचा असतो.
जगणे समृद्ध करण्यासाठी भाकरीच्या गरजेसोबतच कलेची समृद्धता देखील तेवढीच आवश्यक असते. अलीकडे कलेची कळा बदलून जी अवकळा प्राप्त झाली आहे, त्यास अनुभवाचा उणेपणा हे एक प्रमुख कारण आहे. कथा, कादंबरी, कविता, नाटक, शिल्प, नृत्य, संगीत या सर्व कलाप्रकाराला अनुभवाची जोड नसेल तर ते निरस होण्याची शक्यता असते. अलीकडच्या अनेक साहित्यिकांच्या साहित्यकृती वाचल्यास वरवरचे काहीतरी लिखाण करून प्रसिद्धी मिळवणे आणि पुरस्कार प्राप्त करणे एवढेच शिल्लक आहे. कलाकाराच्या अनुभव समृद्धतेवर उपभोक्त्याच्या उपभोगाची पातळी निश्चित होत असल्यामुळे कलाकाराने जर अनुभवांती मांडणी केली असेल किंवा प्रकट केले असेल तर ते आपल्यापर्यंत यथोचित पोहोचते, अन्यथा कलाकाराची रिकामी झोळी आपल्या पदरी काहीच टाकणार नाही. त्यामुळे किमान ज्यांना कलेची आवड आहे, जे निर्मितीक्षम मेंदू आहेत, त्यांनी तरी फिरलेच पाहिजे. पूर्वीच्या काळी फिरण्यासाठी काही मर्यादा निश्चितच होत्या, परंतु आधुनिक काळात साधनांच्या उपलब्धतेमुळे आणि ठिकठिकाणी राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था होत असल्यामुळे आज फिरणे फार कष्टप्रद राहिले नाही. तुम्हाला पर्यटनासाठी फक्त दोन गोष्टींची




नितांत आवश्यकता असते. एक म्हणजे तुमच्याकडे पैसा आणि वेळ असणे गरजेचे आहे आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट आपण फिरायला गेले पाहिजे हे तुम्हाला मनातून वाटले पाहिजे. ऐश्वर्य आहे पण दातृत्व नाही त्या पैशाला काहीच किंमत नाही. तसेच दातृत्व खूप आहे पण ऐश्वर्य नाही त्यासही काही अर्थ नाही. हाच नियम पर्यटनाच्या बाबतीत देखील लागू पडतो. तुमच्याकडे पैसा भरपूर आहे ,वेळ आहे, परंतु फिरायला जाण्याची मनाची तयारी नाही, तरीही काही अर्थ नाही आणि तुम्हाला खूप फिरावेसे वाटते, परंतु पैसा नाही, वेळ नाही अशाने तुम्ही पर्यटनाचा आनंद घेऊ शकणार नाही. वयाच्या तीस पस्तीस वर्षापर्यंत रोजीरोटीसाठी एखादे स्थिर क्षेत्र निवडायचे आणि साठ वर्षापर्यंत नोकरी करायची, पैसा कमवायचा, लेकरांचे करिअर पहायचे आणि वार्धक्यात आपण कुठेच फिरायला देखील गेलो नाही असे कुढत कुढत जगायचे आणि एके दिवशी मरून जायचे. जो काही आयुष्याचा आनंद आहे तो आपल्या नित्याच्या कामामधूनच मिळाला तर ठीक अन्यथा निरस पद्धतीने आयुष्यभर जगणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे ज्यांना शक्य आहे त्यांनी घराबाहेर पडून पर्यटनाचा मनसोक्त आनंद मिळविला पाहिजे. हा क्षण पुन्हा अनुभवास येणार नाही याची जाणीव ठेवून जगणे समृद्ध केले पाहिजे. भूतकाळात आपली किती हलाखीची परिस्थिती होती आणि भविष्य किती अंधकारमय किंवा विदारक असणार आहे, या कोणत्याच गोष्टीची चिंता न करता आपला वर्तमान आनंददायी करण्याचा प्रत्येकाने किमान प्रयत्न केला पाहिजे. तुम्ही धार्मिक, अध्यात्मिक विचाराचे असा अथवा नसा कसेही असलात तरी किमान त्या त्या ठिकाणी जाऊन स्थापत्य कलेचा तरी अनुभव घ्यायला काय हरकत आहे? निसर्गरम्य डोंगरे, बर्फाच्छादित पर्वते, समुद्रकिनारे आणि त्या ठिकाणी पोहोचेपर्यंत प्रवासात मिळणारा आनंद आपण घेतलाच पाहिजे. चला तर मग. बाहेर पडा आणि पर्यटनाचा मनसोक्त आनंद घ्या.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय ता. अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# रोजगार उपलब्ध करून देण्यातील अपयश संकट ठरू नये ?




डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकताच व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे 'रोजगार मेळा'चा शुभारंभ केला. या अंतर्गत पहिल्या टप्प्यात निवड झालेल्या ७५,२२६ युवकांना नियुक्ती पत्र देण्यात आले. या भरती मोहिमेत एकूण १० लाख तरुणांना सरकारी नोकऱ्या देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारतातील युवा शक्तीसाठी आजचा दिवस महत्त्वाचा आहे. गेल्या ८ वर्षात देशात रोजगार आणि स्वयंरोजगाराची मोहीम सुरू आहे, त्याला आणखी एक दुवा जोडला गेला आहे, ही लिंक आहे रोजगार मेळाव्याची. केंद्र सरकार ७५००० तरुणांना नियुक्ती पत्र दिले हे चित्र आशादायक वाटत असेल तरी तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यात सरकारचे अपयश हे संकटमय ठरू नये, त्याचा फायदा तरुणांना व्हायला पाहिजे.**

दरवर्षी सुमारे १३ दशलक्ष लोक भारताच्या कर्मचाऱ्यांमध्ये सामील होण्यास पात्र होतात, परंतु परिणाम असा आहे की प्रत्येक १० पदवीधरांपैकी फक्त एकच रोजगारक्षम आहे. अफाट लोकसंख्या जी भारताची ताकद बनू शकली असती, जर विध्वंसक नसली तर ती एक कमकुवत बनली आहे. याची अनेक कारणे आहेत - खराब शालेय शिक्षण आणि प्रशिक्षण, सामाजिक अशांतता आणि जातीय विसंगती आणि वाढता बहुसंख्यवाद. हे सर्व घटक रोजगाराच्या संधींमध्ये अडथळे निर्माण करत आहेत. अशा परिस्थितीत शक्यतो विनाश टाळायचा असेल तर या चक्रव्यूहातून बाहेर पडावे लागेल. असं असलं तरी पुढच्या वर्षी भारत लोकसंख्येच्या बाबतीत चीनलाही मागे टाकणार आहे.
२०११ च्या जनगणनेनुसार, तेव्हा भारतातील ५८.३ टक्के लोकसंख्या २९ वर्षांपेक्षा कमी वयाची होती. २०२१ मध्ये ते ५२.९पर्यंत कमी झाले आणि २०३६ मध्ये आणखी घसरून ४२.९ टक्क्यांपर्यंत जाण्याची अपेक्षा आहे. तरीही आपल्याकडे तरुणांची मोठी लोकसंख्या आहे आणि ती तशीच राहणार आहे. पण त्यांना एकतर रोजगार मिळत नाही किंवा आमच्याकडे त्यांच्यासाठी रोजगार नाही ही चिंतेची बाब आहे. असे म्हणता येईल की भारत 'डेमोग्राफिक डिझास्टर'चा सामना करत आहे.
संयुक्त राष्ट्रांच्या मते पुढील वर्षी भारताची लोकसंख्या चीनपेक्षा जास्त होईल. तथापि, CMIE (सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी) चे महेश व्यास यांना यात एक फायदा दिसतो. इंडियास्पेंडला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणाले, "अनेक पिढ्यांमधून एकदाच तुमच्याकडे एवढी मोठी कार्यरत लोकसंख्या असलेली विंडो आहे." जेव्हा तरुणांना रोजगार मिळतो तेव्हा त्यांचे घरगुती उत्पन्न, उपभोग आणि मागणी तसेच बचतही वाढते आणि त्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळते.
माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी त्यांच्या अलीकडच्या स्तंभात रोजगाराची वाईट स्थिती आणि त्याचे सामाजिक परिणाम याबद्दल सांगितले आहे. त्यांनी म्हटले आहे की भारतातील एक चतुर्थांश लोकांकडे कोणत्याही प्रकारची वैयक्तिक वाहतूक नाही, अगदी सायकलही नाही. ७५ टक्के ताकदीवर एअर कुलर किंवा एअर कंडिशनर नाही. ७० टक्के लोकांपर्यंत स्मार्ट फोन आणि वैयक्तिक लॅपटॉपही पोहोचलेले नाहीत.
शिक्षणाची स्थितीही चिंताजनक आहे. मध्यमवर्गीय मुलांच्या गरजा काही खर्चात ऑनलाइन प्लॅटफॉर्म आणि कोटा कोचिंग कारखान्यांद्वारे पूर्ण केल्या जातात, परंतु ग्रामीण भागात आणि सरकारी शाळांमध्ये शिकणारे बहुसंख्य लोक मागे राहतात. सर्वत्र चांगले शिक्षक आणि डॉक्टरांची मागणी आहे, पण सरकार ही गरज पूर्ण करू शकत नाही.
वायुसेनेने नुकतेच एक निवेदन दिले की १७ ते २१ वयोगटातील विक्रमी ७.५ लाख तरुणांनी अग्निवीरांच्या ३००० पदांसाठी अर्ज केले. स्पष्टपणे, विधानाचा अंतर्निहित संदेश 'अग्निपथ' योजना किती लोकप्रिय आहे हे पाहण्याचा होता. सरकारी नोकऱ्यांसाठी लोकांची एवढी गर्दी आश्चर्यकारक नाही कारण सामाजिक सुरक्षा आणि पेन्शन नसली तरी पगार वेळेवर मिळेल अशी नोकरी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. रेल्वे भरतीदरम्यान झालेल्या दंगलीत आपण पाहिल्याप्रमाणे, मोठ्या संख्येने अर्जदार असे उमेदवार होते ज्यांची पात्रता या पदासाठी खूप जास्त होती. काहींनी पीएचडीही केली होती. पण तात्पुरत्या रोजगारासह बेरोजगारीचा कायमचा प्रश्न सोडवण्यासाठी निती आयोगावर सरकारी थिंक टँकचा विश्वास आहे. १० वर्षांत तात्पुरत्या रोजगाराच्या संधींद्वारे नऊ कोटी लोकांना काम मिळण्याची अपेक्षा आहे. सध्या हा आकडा ८० लाख ते १.८कोटी आहे.
आयोगाचे म्हणणे आहे की 'नवीन काळातील कार्यबल' बांधकाम, उत्पादन, रिटेल, लॉजिस्टिक आणि वाहतूक क्षेत्रात काम करेल. कमिशन काय लपवत आहे ते म्हणजे या नोकऱ्या कमी पगाराच्या असतील, सामाजिक सुरक्षा नसतील, विमा, वैद्यकीय सुविधा इत्यादी नसतील आणि कर्मचाऱ्यांच्या प्रगतीच्या बाबतीतही निराशाजनक असेल.
CMIE ने म्हटले आहे की फक्त जून २०२२मध्ये, पगारदार नोकऱ्यांमध्ये अंदाजे २.५ दशलक्ष कपात झाली आहे, तर नोकऱ्यांचे नुकसान लहान व्यापारी आणि रोजंदारी कमावणारे होते. सीएमआयई डेटा दर्शविते की जूनमध्ये, कार्यरत वयाच्या लोकसंख्येपैकी ३६टक्क्यांपेक्षा कमी रोजगार होते.
वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या आकडेवारीनुसार भारतात दरवर्षी सुमारे



१३ दशलक्ष लोक कर्मचारी वर्गात सामील होतात. परंतु चारपैकी फक्त एक व्यवस्थापन व्यावसायिक, पाचपैकी एक अभियंता आणि प्रत्येक १० पैकी फक्त एक पदवीधर नोकरीयोग्य आहे. आपण ज्या परिस्थितींना तोंड देत आहोत त्यात नोकरी गमावणे हे वास्तव आहे. महामारीच्या काळात मोठ्या संख्येने लोकांना रोजगार देणारे स्टार्टअप देखील आता लोकांना काढून टाकत आहेत. स्टार्टअपच्या ११००० हून अधिक कर्मचाऱ्यांनी अलीकडेच नोकऱ्या गमावल्या आणि वर्षाच्या अखेरीस ही संख्या ६०,००० पर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे.
इंडियन एक्स्प्रेसने प्रकाशित केलेल्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की मे २०२२ मध्ये २.६१कोटी ग्रामीण कुटुंबांनी मनरेगा अंतर्गत कामाचा लाभ घेतला. २०२१ च्या याच कालावधीत योजनेंतर्गत काम मिळालेल्या कुटुंबांच्या (२.२२कोटी) संख्येपेक्षा ही संख्या केवळ जास्तच नाही, तर महामारीपूर्वीच्या आकडेवारीपेक्षाही जास्त आहे. मे २०१९ मध्ये मनरेगा अंतर्गत काम मिळालेल्या कुटुंबांची संख्या २१ दशलक्ष होती.
अर्थशास्त्रज्ञ आणि कार्यकर्ते अजित अभ्यंकर म्हणतात, "जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक असल्याचा अभिमान बाळगणाऱ्या सरकारच्या नेतृत्वाखाली भारत अनिश्चिततेने वेढलेला दिसतो." एकीकडे उत्पन्न घटत आहे, नोकऱ्या गेल्या आहेत आणि महागाई वाढत असल्याने सर्वसामान्य जनता नाराज आहे, तर दुसरीकडे सरकारने जाणीवपूर्वक पाठ फिरवली आहे. दुसरीकडे, खाजगी क्षेत्राच्या स्वतःच्या मजबुरी आहेत. ज्यांच्याकडे कामाचे कौशल्य नाही अशा लोकांना तो रोजगार देऊ शकत नाही, असे त्याचे म्हणणे आहे.
कंपन्या त्यांच्या कामासाठी लोक शोधताना कंटाळत आहेत आणि तरुण नोकऱ्यांच्या शोधात आहेत, ही एक विचित्र परिस्थिती आहे, असे गोव्याचे शिक्षणतज्ज्ञ डॉ मनोज कामत सांगतात. कुशल लोकांची कमतरता चिंताजनक आहे. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (CII) समर्थित एनजीओ 'टूरिझम अँड हॉस्पिटॅलिटी स्किल कौन्सिल' देखील म्हणते की भारतीय हॉस्पिटॅलिटी सेक्टर व्यवसायात सुमारे ३,५०,००० कर्मचाऱ्यांची कमतरता आहे.
गोवा ट्रॅव्हल अँड टुरिझम इंडस्ट्री असोसिएशनचे राल्फ डिसोझा म्हणतात, "व्यवसाय पूर्वपदावर आल्यानंतर कुशल लोकांची मागणी वाढत आहे. परंतु महामारीच्या काळात नोकऱ्या गमावलेल्या अनेक कामगारांना आता परत यायचे नाही. बँक ऑफ बडोदाचे मुख्य अर्थतज्ज्ञ मदन सबनवीस म्हणाले, "सरकारच्या दाव्याप्रमाणे बेरोजगारी कमी होत असेल, तर खप वाढायला हवा होता." कॉर्पोरेट क्षेत्रातील नोकऱ्याही कमी झाल्याचं सबनवीस सांगतात. याशिवाय, श्रमशक्तीचा सहभाग दर २०१६मध्ये ४७ टक्क्यांवरून २०२१ मध्ये ४० टक्क्यांवर आला आहे. तो म्हणतो, 'आतिथ्य क्षेत्र किंवा मॉल्स आज पूर्वीइतकेच लोक कामावर घेत आहेत का? कदाचित नाही. सबनवीस म्हणतात की, 'वर्क फ्रॉम होम' संस्कृतीने ऑफिस असिस्टंट, कॅन्टीन स्टाफ अशा सर्व नोकऱ्यांचा गळा घोटला आहे. बँकेला ग्राहकांनी शाखेत यावे असे वाटत नाही. लोकांनी घरी बसून इंटरनेट बँकिंगमधून काम करावे अशी त्यांची इच्छा आहे. उत्पादन हे एकमेव क्षेत्र आहे ज्यात लोकांना कारखान्यात जाऊन काम करणे आवश्यक आहे. असे म्हणता येईल की तंत्रज्ञान लोकांची जागा घेत आहे आणि त्यांना निरुपयोगी बनवत आहे. सबनवीस यांच्या मते, भारतासारख्या विशाल देशात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्सचा वाढता ट्रेंड अत्यंत धोकादायक ठरणार आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
RNI : MAH/2021/82566, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAH/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

# 'भारत जोडो'ला 'समान नागरी कायदा' पर्याय ?

आधुनिक केसरी

**हा भारत घटनेप्रमाणे चालणार का? आधुनिक गांधी बाबांच्या विचारावर? 'भारत जोडो' हा पदयात्रा पर्याय आहे काय? काँग्रेसची तुष्टीकरण नीती देश तोडण्यास कारणीभूत नाही काय? देशात समान नागरी कायदा आणि लोकसंख्या नियंत्रण कायदा या गंभीर विषयावर चर्चा सुरु आहे. याबाबत गांधीबाबांचे मत काय? काँग्रेस पक्षाची भूमिका काय असणार आहे? समान नागरी हा कायदा देशाच्या एकतेसाठी महत्वाचा टप्पा आहे, हे काँग्रेस पक्षाला मान्य आहे की नाही? तेंव्हा काँग्रेसने 'भारत जोडो'साठी समान नागरी कायदा हा एकमेव पर्याय आहे की नाही? हे स्पष्ट करावे.**

काँग्रेसने नेते राहूल गांधी यांची 'भारत जोडो' यात्रा दि. ७ नोव्हेबर रोजी महाराष्ट्रात नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथे येणार आहे.काँग्रेस यात्रा ११ नोव्हेबरपर्यंत नांदेडात मुक्काम राहणार आहे. या भारत जोडो पदयात्रेची महात्मा गांधीजींच्या दांडी यात्रेशी तुलना केली जात आहे. तद्पूर्वी राज्यात अशोक चव्हाण हे भाजपात जाणार असल्याच्या वावड्या उठविल्या गेल्या होत्या. यात स्थानिक काँग्रेसचेच राजकारण होते. यातून चव्हाण हे काँग्रेसवर नाराज असल्याची चर्चा सुरु व्हावी,यासाठी केले गेले. यामागचे कारण म्हणजे पक्षाने चव्हाण यांनाही कारणे दाखवा नोटीस दिली होती. आपल्यासारख्या निष्ठावंत नेत्याला पक्षाने नोटीस द्यावी, ही बाब त्यांना निश्‍चितच खटकली होती. तेंव्हा चव्हाणांची समजूत काढावी, यासाठी काँग्रेसचे बडे नेते धावपळत नांदेडला येवून गेले. कारण चव्हाण यांच्या सहकार्याशिवाय नांदेडात गांधीबाबांची यात्रा यशस्वी होवू शकत नाही, हे पक्षाच्या लक्षात आले. ही यात्रा बाजूला राहिली व चव्हाण भाजपात जाणार नाहीत, याचीच चर्चा अधिक झाली. महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणूक व शिंदे व फडणवीस सरकारला ज्या अदृश्य हातांनी मदत केल्याचा जो आरोप झाला, यामुळे काँग्रेस पक्षाने नऊ आमदारांना नोटीसा बाजावल्या होत्या. आता त्या कारणावरून पक्ष त्यांचेवर कारवाई करणार नाही, असे दिसतेय. चव्हाणांनीसुद्धा भाजपात जाण्याच्या चर्चेला पूर्णविराम दिल्याचे पुन्हा सांगितले जात आहे. पण या निमित्ताने राजस्थानचे काँग्रेसचे नेते गहिलोत व महाराष्ट्रातील अशोक चव्हाण या दोन नेत्यांनी पक्षाला आपली ताकद दाखवून दिलेली आहे. तेंव्हा पक्षाला नाईलाजाने का होईना, ती नोटीस माघार घ्यावी लागत आहे. पण या यात्रेनंतर चव्हाण भाजपा जातील. कारण त्यांना ईडीच्या कारवाईची भीती आहे, अशी राजकीय गोटात चर्चा आहे. 'पण भारत जोडो' या यात्रेवर खर्च कोणी करावयाचा? असा प्रश्‍न निर्माण झाला होता. तेंव्हा राज्यातील काँग्रेसच्या माजी मंत्र्यांनी हा खर्च करावा, असा यात तोडगा निघाला, अशी माहिती आहे. काँग्रेस पक्षाची ही राजकीय यात्रा आहे. तरी पण नांदेड जिल्हा प्रशासनाने तयारीसाठी पायघड्या घातल्याच! याचे आश्‍चर्य वाटते. गांधीचे स्वागतासाठी कांही शैक्षणिक संस्थाना सक्ती केली जात आहे. आधुनिक राहूल गांधीबाबा कोणत्याही संवैधानिकपदावर नाहीत. आता चव्हाण काँग्रेस यात्रेच्या स्वागतासाठी तयारीला लागले आहेत. काँग्रेस नेते राहूलबाबांची' पदयात्रा ही सामान्य माणसांच्या भल्यासाठी, प्रश्‍नांसाठी मुळीच नाही. नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी गांधी परिवाराची देशभर जी प्रतिमा डागळली आहे. त्याला उजाळा देण्यासाठी भारत यात्रेचा हा खटाटोप आहे. त्यात काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून मल्लीकार्जून खडगे हे जरी निवडून आले असले.पक्षाचा लगाम गांधी परिवारवारा राहणार नाही, या भारत जोडो यात्रेत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खडगे अजूनही सहभागी झालेले नाहीत. पक्षात गांधी परिवाराचे वर्चस्व कायम राहावे, ही खेळी आहे, गांधीबाबा हे अनेक राज्यातून जात आहेत, तेंव्हा तेथील सामान्य माणसांचे, आदिवासी, मागासवर्गीय समाजाचे तसेच शेतकरी, कामगारांचे प्रश्‍न समजून घेणार आहेत काय? या यात्रेतून काही निष्पन्न होणार आहे का? काँग्रेस पक्षाला नवीन दिशा दिली जाणार आहे काय? असे अनेक प्रश्‍न यातून निर्माण होत आहेत. पण यात्रेत जनतेचे प्रश्‍न उपस्थित करत नाहीत. तर भाजपा व आरएसएसला शिव्या घालण्याचा, हा एककलमी कार्यक्रम करत आहेत ! याला 'भारत जोड'ला म्हणावयाचे काय? यात काँग्रेसभक्त मिडीया' तर भारत जोडो यात्रेचे कॉलम व तोंडभरून कौतूक करत आहेत. कार्तिक मासनिमित्त गांधी महाराजांची निघालेली या राजकीय दिंडीबाबत राज्यातील पक्षात एकमत नसल्याचे दिसून आले. त्यात काँग्रेसचे भाविक त्यांचे दर्शन व्हावे, सोबत छबी काढता यावा, यासाठी आतूरेने वाट पहात आहेत. काँग्रेस पक्षाचे नेते गांधींना दैवत मानत आहेत. ते अंधभक्त बनले आहेत, त्याचा हा पुरावा आहे. या निमित्ताने स्थानिक काही पत्रकारांना जाहिराती व इतर मार्गाने रसद पुरवली जात आहे. त्यामुळे स्थानिक मिडियातून 'भारत जोडो' यात्रेच्या विरोधातील वृत्त झळकणार नाही. याची काँग्रेस पक्षही काळजी घेत आहेत. हा भारत घटनेप्रमाणे चालणार का? आधुनिक गांधी बाबांच्या विचारावर? 'भारत जोडो' हा पदयात्रा पर्याय आहे काय? काँग्रेसची तुष्टीकरण नीती देश तोडण्यास कारणीभूत नाही काय? देशात समान नागरी कायदा आणि लोकसंख्या नियंत्रण कायदा या गंभीर विषयावर चर्चा सुरु आहे. याबाबत गांधीबाबांचे मत काय? काँग्रेस पक्षाची भूमिका काय असणार आहे?

समान नागरी हा कायदा देशाच्या एकतेसाठी महत्वाचा टप्पा आहे, हे काँग्रेस पक्षाला मान्य आहे की नाही? तेंव्हा काँग्रेसने 'भारत जोडो'साठी समान नागरी कायदा हा एकमेव पर्याय आहे की नाही? हे स्पष्ट करावे.

भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीपासून समान नागरी कायदा (UNIFORM CIVIL CODE) असावा की नसावा, याची चर्चा सतत आली आहे. १९३७ मध्ये अखिल भारतीय महिला परिषदेत धर्मांचे वैयक्तिक कायदे देशातील महिलांवर अन्याय करणारे आहेत. तेंव्हा प्रथम सामान नागरी कायद्याची मागणी करण्यात आली. त्यानंतर घटना समितीत या विषयावरून चर्चा झाली. डॉ.आंबेडकर दि. २३ नोव्हेंबर १९४८ रोजी बोलतानाच 'नागरी कोडच्या बाबत कायदे आधीच तयार केले आहेत. तेंव्हा कलम ४५ बाबत अपेक्षित विवाह आणि वारसा हक्काबाबत खोलवर चर्चा झाली नाही. देशातील महिलांना पुरूषांप्रमाणे समान हक्क मिळावेत यासाठी त्यांनी प्रयत्न केले. यासाठी कोणताही धर्म ठेकेदारांनी यात अडथळा आणू नये म्हणून घटनेत कलमांची तरतूद केली. घटनेच्या चौथ्या खंडात मागर्दशक तत्वे अंतर्भूत कलम ४४ वे कलम समावेश केला गेला. याबाबत कलम ३७ मध्ये सविस्तर उल्लेख आहे. या समान नागरी कायद्याची रचनेची जबाबदारी भविष्य काळातील सरकारवर सोपविले गेले आहे. भारत सर्व प्रदेशांतील नागरिकांसाठी एकच समान नागरी कायदा करणेबाबत सरकार प्रयत्नशील राहील, असे वचन केंद्रात सत्तेत काँग्रेसने दिलेले आहे. घटना समितीत चर्चेच धर्मनिरपेक्ष देशात विवाह, वारसा आदी सबंधित व्यक्तीगत कायदे धर्मावर अधिष्ठीत असू शकत नाहीत. तेंव्हा ऐक्यासाठी सामान नागरी कायदा आवश्यक आहे, यावर भर दिला गेला. यात १९९५ मध्ये सरला मुद्दगल प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने घटनेच्या ४४ व्या कलमानुसार जबाबदारी कोणीची? असा प्रश्‍न विचारत याबाबत प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश दिले होते. तसेच महमुद अहमद खान विरूध्द शायबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायायालयाने चिंता व्यक्त केली होती. न्या.कृष्णा अय्यर यांनी तर केंद्र सरकारने या कायदा करण्याबाबत टाळटाळ करणे, हे समर्थनीय ठरू शकत नाही, असे म्हंटले आहे. तसेच घटनेतील कलम २५ नुसार धर्म स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला असला तरी कलम २५ (२) धर्मनिरपेक्ष कृती सबंधात एखाद्या धार्मिक रूढीच्या विरोधात कायदा करण्याचा सरकारला अधिकार आहे. काँग्रेस सरकारने या कलमाचा वापर करत हिंदु धर्माच्या विरोधात वापर केला. यातून हिंदु विवाह कायदा१९५५, हिंदु वारसा हक्क १९५६, हिंदु दत्तक आणि पोटगी कायदा १९५६ असे विविध कायदे केले.तर दुसरीकडे मुस्लिम समाज नाराज होणार याची काळजी घेतली कारण 'हॉटबँक' काँग्रेसने हातातून जाईल, याची काळजी होती. त्यासाठी काँग्रेस नेत्यांनी तुष्टीकरणाचे राजकारण सुरु केले. त्यासाठी केवळ मुस्लिम समाजाच्या हितासाठी अल्पसंख्याक आयोग, वक्फ बोर्ड, मुस्लिम पर्सनल लॉ. बोर्ड अस्तित्वात आणले गेले. मुस्लिस समाजातील कट्टर मौलवी, नेते काँग्रेस





सरकारवर सतत दबाब आणत गेले. यातून १९८५ मध्ये काँग्रेसचे नेते व तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्याकडे पाशवी बहूमत होते. जेंव्हा शहाबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायायलाने पोटगी देण्याचा निर्णय दिला तेंव्हा मुस्लिम ठेकेदारांनी दबाब आणला.राजीव गांधी सरकारने संसदेत मुस्लिम महिला संरक्षण कायदा आणून सर्वोच्च न्यायालयाचा आदेश नाकारला. शायराबानो प्रकरणात तीन तलाक हे घटनाबाह्य असल्याचा निकाल १८ मे २०१७ मध्ये न्यायालयाने दिला. त्यावेळी काँग्रेस पक्षाचे नेते मुस्लिम ठेकेदाराची वकीली घेतली होती, त्यांनी चौदाशे वर्षापूर्वीपासून चालत असलेली प्रथा घटनाबाह्य कसा प्रश्‍न उपस्थित केला होता. काँग्रेसने सरकारने तीन तलाक विरोधात कायदा करण्याचे धाडस केले नाही. केंद्रात मोदी व भाजपा सरकार सत्तेत आल्यानंतर २०१८ तीन तलाक विरोधी कायदा आणला. पण भाजपा सरकार हे इस्लाम धर्मात हस्तक्षेप करत आहेत, असा आरोप मुस्लिम नेते तर करत होते, त्याला काँग्रेसचा पाठिंबा होता.

इस्लामिक लीगल फिलोंसॉपी या पुस्तकात इस्लामिक कायदा हा अपरिर्वतनीय आहे. यात बदल करण्याचा अथवा फेरफार करण्यास मनाई आहे. कारण कायदेशीर बदल घडवून आणण्यासाठी योग्य पध्दती इस्लाम धर्माने विकसीत केली नाही.शरियत आणि धर्मनिरपेक्ष यातील मूलभूत फरक हा आहे की, शरियत कायदा हा अल्लाच्या आज्ञेवर आधारलेला आहे. त्यामुळे भारतीय कायद्याने मुस्लिमा समाजाच्या कायद्याने दुरूस्ती करणे, हीच संकल्पना इस्लामिक कायद्याला मान्य नाही. त्यामुळे कट्टर मुस्लिम मौलवी, नेते भारतातील कट्टर मुस्लिम नेते याच मानसिकतेतून विरोध करत आहेत.काँग्रेस धर्मांम मागणीला बळ देत आली आहे. भारतात ब्रिटीशांनी 'फूट पाडो राज्य करो' या नीतीचा अवलंब केला. काँग्रेस पक्षाची हीच विचारधारा आहे.सत्तेसाठी व व्हॉट बँकेसाठी काँग्रेस दाढ्या कुरवळण्याचेच काम करत आलेला आहे.

भारतात राष्ट्रीय नागरिकता नोंदणी (NRC) कायदा १९५५ व २००३ नुसार प्रत्येक नागरिकास नोंदणी करणे अनिवार्य आहे.नागरिकत्व दुरूस्ती कायदा (CAA) तसेच हिजाबचे समर्थन, लोकसंख्या नियंत्रण कायदा, सामान नागरी कायद्याला यातून कट्टर इस्लामिक धर्मगुरू व नेते विरोध केला जात आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तर संसद आणि केंद्र सरकारने समान नागरी कायदासबंधात तरतूद असताना कोणतेही पाऊले उचलेले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. काँग्रेसने १९७६ मध्ये घटनेशी छेडछाड केली. यात धर्मनिरपेक्ष (सेक्यूलर) हा शब्दाचा समावेश केला. राज्य घटनेत तरतूद या कायदा नमुद असताना काँग्रेसने भीजत घोंगडे का ठेवले? देशात प्रथम छत्तीसगडच्या भाजपा सरकारने समान नागरी कायदा आणण्यासाठी एका समितीचे गठण केले आहे. आता या समितीचा अहवाल यावयाचा आहे. भाजपाने निवडणूक जाहीरनाम्यात या कायदा करण्याचे वचन दिले ते पाळत आहे. आता गुजरात राज्य सरकार या कायद्याबाबत पाऊले टाकत आहे, त्यासाठी निवृत्त उच्च न्यायालयाचे न्यायाधीश समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला आहे. लगेच कोल्हेकुई सुरु झाली! गुजरात निवडणुक तोंडावर भाजपाचा निर्णय घेतला, असे वृत्त दिले! मग काँग्रेसला हा कायदा का आणला नाही? मग हे बोरू बहाद्दर का विचारत नाहीत. आम आदमी पक्ष प्रत्येक राज्याच्या निवडणुकीत छप्परफाड घोषणा करत आहे, पण त्यास विरोध केला जात नाही. काँग्रेसने घटनेतील २५ (२) कलमाचा आधार घेत हिंदु विरोधात कायदे केले. मग मुस्लिमासांठी या कायद्याचा वापर का केला नाही? तेंव्हा काँग्रेस सरकारची न्याय, समता आणि बंधूभाव या तत्वावर आधारलेल्या भारतीय घटनेशी ही कृती सुसंगत नव्हती, असे दिसून येते.काँग्रेसचे ही नीती घटनेला, धर्मनिरपेक्ष तत्वाला छेद देणारी नाही काय? भारतीय घटनेप्रमाणे देशात सर्व कायदे आणले जात असताना भाजपा व मोदी सरकार सरकार मुस्लिमांना लक्ष्य करत आहे, असा अप्रचार जाणीवपूर्वक केला जात आहे. उलट काँग्रेसची नीती ही हिंदू संस्कृतीच्या विरोधात सुरुवातीपासून म्हणजे १९५१ पासूनची आहे. सोमनाथ मंदिर पुनर्बांधणीनंतर उद्घाटनाला तत्कालिन राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांना जाण्यासाठी अडथळा आणणे, प्रभू रामचंद्र हे कल्पनिक आहेत, असे म्हणत राम मंदिराला विरोध करणे, बाबरी ढाच्याचे समर्थन केले गेले. तसेच मुस्लिमांना खूष करण्यासाठी १९९१ चा धर्मस्थळाचा बाबतचा कायदा करण्यात आला. आता मुस्लिम नेते काशी व मथूरा मंदिर प्रकरणात या कायद्याचा आधार घेत आहेत. काँग्रेसने धार्मिक दंगलीत बहुसंख्य हिंदुंना जबाबदार धरुन कारवाई करणारा कायदा संसदेत आणला होता, तो कायदा भाजपाने विरोध केल्याने संमत झाला नाही. काँग्रेसचा हिंदू महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपाला विरोध व लक्ष्य करत आहेत.हिंदु अतिरेकी, मुस्लिम ब्रदरहूडची आरएसएसशी तुलना केली गेली, २००४ मध्ये तर शंकराचार्य जितेंद्र सरस्वती यांना हिंदुना अपमानित करण्यासाठी अटक करण्यात आले होते. या घटनेचा उल्लेख तत्कालिन राष्ट्रपती प्रणब मुखर्जी यांनी 'द कोलिशन इयर्स' १९९६-२०१२ या पुस्तकात केला आहे. त्यात षडयंत्र रचले गेले हे दिसून येते. परवा नुकतेच भगवतगीते मधील श्रीकृष्णाच्या उपदेशाला 'जिहाद'शी तुलना काँग्रेस नेत्याने केली. २०१४ लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा पराभव होण्यास तुष्टीकरण व हिंदु विरोधी भूमिका कारणीभूत असल्याचा अहवाल काँग्रेस वरिष्ठ नेते ए. के.एंटोनी समितीने दिला होता त्या अहवालाकडे गांधी परिवाराने दुर्लक्ष केले व आजही हिंदु संस्कृतीवर प्रहार करणे चालूच ठेवलेले आहे. देशाच्या संपत्तीवर पहिला हक्क मुस्लिमांचा असे कोण म्हणाले? देशाचे धर्माच्या आधारावर विभाजन कोणी केले? विभाजनाची मागणी हिंदु नव्हे मुस्लिम नेत्यांने मागणी केली. तरीही काँग्रेसने धर्माचा आधारावर मुस्लिम समाजाचे चोचले पुरवित आहे. काँग्रेसचे मुस्लिम स प्रेम तर हिंदूसमाजाबद्दल घृणा का? हे व्देषाची बी कोण पेरले? देशात सर्वधर्मियांना समान न्याय, समता ऐकता, बंधूभाव निर्माण व्हावा, हे काँग्रेसचे धोरण का नाही? काँग्रेसचे हे छूपे व दुटप्पी धोरण देश जोडण्यासाठी नव्हे,तर तोडण्यास घातक ठरत आहे.

---

आधुनिक केसरी



## लय भारी सुगरण

सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

## वरणाचे पराठे

कधी कधी स्वयंपाकाचा अंदाज चुकतोकधी भात उरतो तर कधी भाजी तर कधी वरण ! खरंतर ते वाया घालवायचे नसतं पण तो पदार्थ शिळा म्हणून खायला नाक मुरडतात. मग त्याचं बेमालूम रूपांतरण करण्यात आम्ही बायका हुशार! मग फोपो, फोभा, थालीपीठ, कटलेट, फ्रँकी सगळे पदार्थ ट्राय करून होतात तरी काहीतरी नवीनच हवं असतं, पण ते कुणाला कळायला नको ! ही मोठी भूमिका त्या गृहिणीला पार पाडावी लागते.

बऱ्याचदा शिजवलेली डाळ जास्त होते, उरते. अशी उरलेली डाळ दुसऱ्या दिवशी खाण्याचा सगळ्यांनाच कंटाळा येतो आणि डाळ वाया जाते. मुळातच डाळीचे वरण, आमटी या पौष्टिक असतात. ते उरले तरी त्या वाया जात नाही. ते आणखी पौष्टिक आणि चविष्ट करुन खाण्याचा पर्याय आहे.

वरण किंवा आमटी जास्त झाल्यास दुसऱ्या दिवशी सकाळी त्याचे चविष्ट आणि पौष्टिक पराठे तयार करावेत. हे पराठे इतके खमंग होतात की डाळींना नाक मुरडणारेही ते आवडीने खातात. मग घ्या लिहून साहित्य आणि कृती.

साहित्य : दोन वाट्या कणीक, एक वाटी वरण, चवीनुसार मीठ, साखर, आवडीनुसार तिखट किंवा अगदी बारीक चिरलेली हिरवी मिरची, घरात असेल तो मसाला एक छोटा चमचा, दोन तीन ठेचलेल्या लसणाच्या कुड्या, तेल, तूप धूवून बारीक चिरलेली कोथिंबीर.

कृती : पसरट भांड्यात कणिक घेऊन त्यात वरण आणि बाकीचे पदार्थ त्यानंतर एक छोटा चमचा तेल घालावं. पीठ चांगलं मऊसर मळून घ्यावं. जर पीठ थोडं कोरडं/घट्ट वाटलं तर त्यात अंदाजे पाणी घालावं.

पीठ मळून झाल्यावर ते 15-20 मिनिटं झाकून ठेवावं.

त्यामुळे पीठ चांगलं मुरतं. पीठ मुरलं की पराठे करताना हातावर थोडं तेल घेऊन पीठ आणखी मऊ मळून घ्यावं आणि आपल्या आवडीच्या आकाराचे गोल, त्रिकोणी, चौकोनी पराठे करुन घ्यावेत. पराठे हळुवार लाटावेत आणि थोडे जाडसर ठेवावेत. तूप लावून ते मध्यम आचेवर भाजावेत. असे हे उरलेल्या वरणाचे मसालेदार



# भारतातील रोजगार प्रश्न : स्वरूप आणि समस्या



डॉ. आर. बी. भांडवलकर
अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद

आधुनिक केसरी

**मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४५ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन जालना येथे ५, ६ व ७ नोव्हेंबर रोजी आर. जी. बगडिया कला, एस. बी. लखोटिया वाणिज्य व आर. बेझंजी विज्ञान महाविद्यालय, जालना येथे संपन्न होत आहे त्यानिमित्त अध्यक्षीय भाषणाचा सारांश.**

भारत हे एक तरूण राष्ट्र म्हणून उदयास येत आहे.देशात सन २०३१ पर्यंत तरुणांची लोकसंख्या ४९ कोटी असेल तर २५-३४ वयोगटातील तरुणांची संख्या २४.५ कोटी असेल. स्वाभाविक या तरुणाईला उत्तमातील उत्तम शिक्षणाच्या संधी आणि सर्वोत्तम रोजगार याबाबीची अपेक्षा आहे.भारतात सरकारी पातळीवर ज्या योजना राबविण्यात येतात त्यातील बहुतांश योजना या ग्रामीण भागातील विकासाच्या असल्यातरी त्या संपूर्णतः श्रमावर आधारीत असतात. तर दुसरीकडे शेती व्यवसाय करणाऱ्या बऱ्याच शेतकऱ्यांना आपल्या मुलांनी शेतकरी व्हावे असे अजिबात वाटत नाही. वास्तविक शहरी भागात ग्रामीण भागापेक्षा जास्त बेकारी आहे. आणि पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये बेकारीचे प्रमाण जास्त आहे. तसेच उच्चशिक्षितामध्ये बेकारीचे प्रमाण जास्त आहे. मनरेगा सारख्या योजनामध्ये कोणत्याही राज्यात स्त्रियांना १०० दिवस रोजगार देण्यात येत नसल्याने ग्रामीण भागातील अधिकाधिक स्त्रिया बेरोजगारच आहेत. संघटित क्षेत्रातील रोजगार अतिशय कमी झाला आहे. सरकारी नोकऱ्यांना मर्यादा आहेत. औद्योगिक उत्पादनांचा प्रश्न आता स्थानिक राहिलेला नाही.

आज भारतातील बेरोजगारी शिखरावर आहे. त्यामुळे छोटे- छोटे उपाय योजत शासकीय सहकार्य देऊन रोजगार वाढीसाठी प्रयत्न व्हायला पाहिजेत. असंघटित क्षेत्रातील रोजगार निर्मितीच्या दृष्टीने विकासाच्या योजना महत्वाच्या ठरतात. त्यामध्ये १) अवर्षण क्षेत्र विकास कार्यक्रम DRAP (२) ग्रामीण रोजगार धडक योजना CSRE (३) कामाकरीता अन्न कार्यक्रम NFWP (४) सुशिक्षितासाठी व तंत्रज्ञासाठी रोजगार कार्यक्रम (५) रोजगार हमी योजना EGS (६) पंतप्रधान रोजगार योजना PMRY (७) आश्वासित रोजगार योजना (८) सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना (९) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना SGSY (१०) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (११) वाल्मीकी आंबेडकर आवास योजना VAMBAY (१२) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (१३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना MNREGS. इत्यादी योजनांचे मुख्य उद्दिष्ट रोजगार निर्मिती व दारिद्र्य कमी करणे हे आहे. त्या संपूर्णतः श्रमावर आधारीत ग्रामीण भागातील विकासाच्या योजना ठरल्यामुळे भारतामध्ये अशाप्रकारच्या योजनामधून ग्रामीण विकासाचे स्वप्न सरकारला साकारण्यात यश आले नाही.

**मेक इन इंडिया :**

भारत सरकारच्या मेक इन इंडिया उपक्रमात संपूर्ण भर संघटित निर्माणी उद्योगाची स्थापना करून आर्थिक वृद्धी दरात वाढ करणे यावर अधिक आहे असे दिसून येते. मेक इन इंडिया हा कार्यक्रम भारत सरकारने एका स्वदेशी चळवळीच्या स्वरूपात दि. २५ सप्टेंबर २०१४ रोजी सुरू केला. यामध्ये अर्थव्यवस्थेतील मुख्य २५ उद्योगाचा समावेश आहे.

भारतात रोजगार आणण्यासाठी पंतप्रधानांनी केलेला प्रयत्न आहे.तर भारताला जागतिक दर्जाच्या उत्पादनाचे पॉवर हाऊस बनवणे हा उद्देश आहे. भारतात १० दशलक्षाहून अधिक रोजगार निर्माण होईल असा अंदाज आहे.

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

**स्टार्ट अप इंडिया :**

रोजगार निर्मिती आणि संपत्ती निर्माण करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. दि. १६ जानेवारी २०१६ ला योजना सुरू झाली. सन २०१६ मध्ये ४७१ होती ३० जून २०२२ पर्यंत ७२,९९३इतकी वाढली. स्टार्टअप देशातील ६४९ हून अधिक जिल्ह्यामध्ये पसरले आहे. त्यातून ७.५ लाखाहून अधिक नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत असा दावा वाणिज्य व उद्योग मंत्रालयाने केला आहे.

भारतात सर्वात जास्त स्टार्टअप महाराष्ट्रामध्ये आहे. सन २०१६ मध्ये ही संख्या ८६ होती तर जून २२ मध्ये अवघ्या सहा वर्षात १३५१९ इतकी लक्षणिय वाढली आहे. महाराष्ट्रानंतर कर्नाटक, दिल्ली, उत्तरप्रदेश आणि गुजरातचा क्रमांक लागतो. सन २०२०-२१ वर्षाच्या कालावधीत मान्यताप्राप्त स्टार्टअप्सद्वारे सुमारे १.७ लक्ष रोजगार निर्मिती झाल्याचा दावा केला जातो. टार्टअप म्हणजे दुसरे गुगल किंवा ॲमेझॉन आहे नव्हे तर भारतीय स्टार्ट अप जगाच केंद्रच होणार असे सांगितले जात होते.

**आत्मनिर्भर भारत रोजगार योजना :**

आत्मनिर्भर भारत रोजगार योजनाची घोषणा दि. १२ नोव्हेंबर २०२० रोजी देशाच्या अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण यांनी अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी कोविड- १९ नंतर रोजगार निर्मिती वाढवण्यासाठी आणि सामाजिक सुरक्षा लाभासह नवीन रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि रोजगाराची हानी पुर्नसंचयित करण्यासाठी करण्यात आली. पंतप्रधान आत्मनिर्भर भारत योजना संघटित क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना रोजगार देण्यासाठी सुरू केली आहे. भारतीय अर्थव्यवस्थमध्ये ३५ टक्के हिस्सा हा लघुउद्योगाचा आहे.जोपर्यंत लघुउद्योग सक्षम होणार नाहीत तोपर्यंत बेरोजगारी कमी करणे शक्य नाही.

कोविड -१९ च्या कालावधीत कामावरून परत आलेल्या स्थलांतरीत कामगारांसाठी रोजगार आणि उपजिविकेच्या संधींना चालना देण्यासाठी गरीब कल्याण रोजगार अभियान जून २०२० मध्ये सुरू करण्यात आले. त्यामध्ये २५ लाख चलित कामावर लक्ष्य केंद्रीत करण्यात आले. सहा राज्यातील ११६ जिल्ह्याच्या ग्रामीण भागात रोजगार आणि पायाभूत सुविधा निर्माण करणे ५०,००० कोटी रूपयांचा संसाधन निधी स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी निर्माण करण्यात आला. दीनदयाल अंत्योदय योजनाचा उद्देश गरीबासाठी शाश्वत सामुदायिक संस्था निर्माण करून ग्रामीण गरीबी दूर करण्याचा प्रयत्न करणे आणि सुमारे ९ ते १० कोटी कुटुंबांना बचत गटामध्ये एकत्रित करण्याचे ह्या योजनेचे लक्ष्य आहे.

आर्थिक वाढीचा रोजगार निर्मितीवर सकारात्मक परिणाम होतो. संघटित क्षेत्रातील नोकऱ्यांची नोंदणी, नोंदणीकृत नवीन कंपन्यांच्या संख्येत वाढ, स्टार्ट अप्सची वाढ, युनिकॉर्नच्या संख्येत झपाट्याने वाढ, एआय क्वाऊड कॉम्प्यूटिंग यासारख्या नवीन क्षेत्रामध्ये रोजगारांच्या संधीची वाढ यासारखे डेटा ॲनालिटिक्स, आय.टी/आयटीईएस अंतर्गत ऑटोमेशन इत्यादी क्षेत्रात नोकऱ्याच्या निर्मितीमध्ये वाढ करेल असे सांगितले जात आहे. नीती आयोगाच्या भाकितानुसार गीग इकॉनॉमीमध्ये कोट्यावधी रोजगार वाढणार असल्याचे आणि बेरोजगारी कमी करण्यास हातभार लावणारी अर्थव्यवस्था असे म्हटले आहे.थोडक्यात आज अर्थव्यवस्थेला उभारी देण्यासाठी येणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये ग्रामीण भागामध्ये पायाभूत सुविधावरचा खर्च वाढविणे आणि ग्रामीण व कृषिक्षेत्रातील खर्च वाढविणे गरजेचे आहे. कारण खरा विकास हा रोजगार देणारा असतो. असंघटित क्षेत्रातील कामगारांना संघटित क्षेत्रात समाविष्ट करणे गरजेचे आहे. खऱ्या अर्थाने मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती ही संघटित क्षेत्रात व्हायला पाहिजे परंतु नियोजनकार आणि नीती आयोगाच्या अपयशामुळे तसेच शासनाच्या उदासीन धोरणामुळे भारतात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातही रोजगाराची स्थिती समाधानकारक नाही. साधारणपणे १.८ कोटी रोजगार निर्मिती करण्याची आज गरज निर्माण झाली आहे. परंतु भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धीदर स्थिर नाही हे बेरोजगारीचे कारण आहे. एकंदरीत आजचा काळ रोजगारीच्या दृष्टीने अस्थिर काळ आहे. रोजगाराचे स्वरूप अत्यंत झपाट्याने बदललेले आहे व बदलत आहे. बेरोजगार झालेल्या लोकांनी आता रोजगाराची अपेक्षाच सोडून दिली आहे. ते आता रोजगाराच्या स्पर्धेतून बाहेर पडले आहेत. वास्तविकपणे रोजगार विश्वात जर योग्य आणि तरूणांना संधी मिळाली तर भारतीय तरूण देशाच्या आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणात हातभार लागू शकतील कारण रोजगार वाढीशिवाय आर्थिक वाढ ही निकोप असूच शकत नाही.बेरोजगारी आणि वाढती महागाई देशापुढील दुहेरी संकट एकाच वेळी आले आहे. यामध्ये सरकार फारसे काही करू शकेल असे दिसून येत नाही. दुसरीकडे भारतात वेगवेगळ्या प्रकारच्या बेरोजगारीमध्ये प्रचंड वाढ होत आहे. बहुतांश मनुष्यबळ असुरक्षित असल्यामुळे त्यांच्या अस्तित्वाचाही प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

# नेटिझन्स - जनरेशन-झी आणि जनरेशन-अल्फा

आधुनिक केसरी

**(मागील अंकावरून)**

ही अट अत्यंत छोटीशी आहे आणि याच्यातून कोणालाही कोणत्या प्रकारची हानी नाही त्यामुळे याला कोणाचा विरोध असण्याची शक्यता क्वचित असेल त्यामुळे सरकारने आणि कंपन्यांनी याचा विचार आवश्य करावा.

तिसरी अट म्हणजे नेटिजन्सच्या आवडत्या कृत्यावर फास! यामध्ये प्रत्येक इंटरनेट यूजर साठी एक "ग्लोबल युनिक आयडी" असेल ज्याद्वारे त्या व्यक्तीला लॉगिन केल्याशिवाय इंटरनेट सेवा वापरता येणार नाही. हा आयडी म्हणजे इंटरनेट वापरण्याची बेसिक पात्रता असेल जो मिळवण्यासाठी उपभोक्त्याला एखादी पात्रता परीक्षा लेखी आणि प्रात्यक्षिक द्यावी लागेल ज्याप्रमाणे आपण वाहनाच्या परवान्यासाठी परीक्षा देतो अगदी त्याचप्रमाणे. याचा वापर करून काही अंशी हे ठरवता येईल की उपभोक्ता इंटरनेट वापरण्याच्या पात्र आहे किंवा नाही. ही अट बेसिक पात्रता यासाठी की याशिवाय कोणतेच अकाउंट साइन अप करणे अशक्य असेल आणि हा आयडी मिळवण्यासाठी तुम्हाला तुमचे आधार अनिवार्य असेल.

पुढील अट म्हणजे सिंगल अकाउंट सिस्टम. सध्या नेटिजन्स मध्ये मल्टिपल अकाउंट आणि फेक अकाउंट तयार करण्याचे क्रेझ सुरू झालेले आहे यामुळे एकाच व्यक्तीच्या नावावर अनेक अकाउंट उपलब्ध आहेत तसेच काही नागरिक दुसऱ्याच्या नावाने दुसऱ्याच लिंगाने अकाउंट बनवून इतर लोकांना फसवण्याचे काम करत असतात व बऱ्याचदा याच अकाउंट वरून लोकांना अश्लील छायाचित्र आणि संदेश पाठवले जातात. एवढेच नव्हे तर जास्तीत जास्त लोक हे त्यांचे अकाउंट आणि पासवर्ड लक्षात ठेवत नसल्यामुळे त्यांना बऱ्याच प्रसंगी नवीन अकाउंट तयार करावे लागतात परंतु ते करत असताना हे नेटिझन्स जुने अकाउंट बंद करून डिलीट करायला विसरतात आणि याचाच फायदा हॅकर्स आणि आतंकवादी संघटन घेताना दिसतात. तुमचे हे जुने अकाउंट हॅक करून त्या अकाउंट वरून इतर कोणाला धमकी देणे, व्हायरसच्या लिंक पाठवणे इत्यादींसारखे गुन्हे या नेटिझन्सच्या नावावर केले जातात आणि जर एखादी कार्यवाही झाली तर सामोरे तुम्हाला जावे लागते त्यामुळे "सिंगल अकाउंट सिस्टम" हे या प्रकारच्या गोष्टींना दाबण्यासाठी फायदेशीर ठरू शकते.

इंटरनेट हे ग्लोबल प्लॅटफॉर्म असल्याने याच्यावर येणारी माहिती ही कितपत खरी आणि खोटी असेल ते सांगता येणे कठीणच आहे. अशी अविश्वसनीय माहिती दिशाभूल करणारी ठरू शकते त्यामुळे प्रत्येक समाज माध्यमांनी आणि संकेतस्थळांनी त्यांच्या प्रोग्रामिंग मध्येच अशी एक प्रणाली विकसित करावी ज्याद्वारे त्यांच्या जवळ येणारी माहिती खरी असेल तर त्यावर विश्वासनीयतेसाठी एखादी खून जसे की ग्रीन लेबल आणि अविश्वासनीयतेसाठी रेड लेबल असायला पाहिजे. इंटरनेट एवढा मोठा व्यवसाय आहे त्यामुळे ही प्रणाली विकसित करून यासाठी लागणारे प्राविण्यशिल लोक उपलब्ध करून घेणे न परवडण्यासारखी बाब नाही. माहितीची विश्वासार्हता हीच पाचवी अट असेल कारण चुकीची किंवा अर्धवट माहिती सुद्धा व्यक्तीसाठी हानिकारक असते.



पुढची अट अशी की गेम्स हे फक्त खेळण्याचे साधन असावे पैसे कमवण्याचे आणि जीव घेण्याचे-देण्याचे नाही. तसेच ऑनलाईन सट्टा म्हणून ओळखले जाणारे ॲप्स ज्याद्वारे क्रिकेट वर सट्टा लावता येतो त्या सर्वांना तात्काळ बॅन करण्यात याव्या. मान्य आहे की यांचा वापर करून बऱ्याच लोकांनी पैसे कमवले परंतु त्यापेक्षा हजार पटीने लोकांनी पैसे गमवले. सरकार गावातील शहरातील क्लब व सट्ट्याच्या ठिकाणावर कायदेशीर कार्यवाही करतात आणि इकडे ऑनलाईन साठी मुक्त पद्धतीने परवाने वाटतात. त्यामुळे ही सरकारची जबाबदारी आली पाहिजे की हे ॲप्स, गेम्स वर कायद्याची एक चौकट असली पाहिजे व शक्य झाल्यास पूर्ण बंदीच घातली पाहिजे. सरकारला महसूल आणि कर याच्याही पलिकडे जाऊन नागरिकांचा विचार करावा लागेल.

सर्वात शेवटची अट म्हणजे "एथिकल हॅकर्स". आज ज्याप्रमाणे आपल्या सीमांचे रक्षण जवान करतात, आपल्या देशांतर्गत समाजातील लोकांचे रक्षण पोलीस यंत्रणा करते अगदी त्याचप्रमाणे हे नेटिझन्स सुद्धा ऑनलाईन राष्ट्राचे नागरिक आहेत त्यामुळे त्यांचे संरक्षण करणे ही सरकारची जबाबदारी येते आणि या ठिकाणी सरकार पुर्णपणे अपयशी ठरलेली दिसते. सरकारवर ही अट असायला पाहिजे ज्याद्वारे जास्तीत जास्त एथिकल हॅकर्सना सरकारी यंत्रणेत सामील करून त्यांचे एक स्वतंत्र खाते तयार करावे आणि नेटिझन्सला सामाजिक तसेच "वर्चुअल जगामध्ये" सुरक्षा प्रदान करावी. याद्वारे त्यांच्यावर होणारे अन्याय तसेच त्यांच्याकडून कळत-नकळत होणारे गुन्हे देखील कमी होतील यात शंका नाही. इंटरनेट ही क्रांती नसून उत्क्रांती आहे ही बाब शक्य तेवाढया लवकर कळणे-वळणे गरजेचे आहे. क्रांती चे दमण बलाने अथवा बोलाने करता येते परंतु उत्क्रांती ही नैसर्गिक प्रक्रिया आहे, तिला दाबता येणे असंभव आहे त्यामुळे तसा कोणी प्रयत्न देखील करू नये! हो, ह्या उत्क्रांतीला आपण रानघास उगल्या प्रमाणे देखील वाढू देऊ शकत नाही त्यासाठी जो पर्यंत आपल्या जवळ वेळ आहे तेव्हाच आपण तणनाशक फवारलेले बरे! त्याच्यासाठी ह्या संवादातील अटी, मार्गदर्शक तत्वे, मूल्ये आणि नियम हे तणनाशक म्हणून काम करतील. यातील काही मुद्दे हे वरवर बघता पुरोगामी दिसतात कारण ते आहेतच! परंतू दूरगामी विचार केला तर चित्र बऱ्यापैकी स्पष्ट दिसते. तर काही मुद्दे हे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर अंकुश लावल्यासारखे आहेत पण मी ह्या विचाराचा आहे की जर त्या अभिव्यक्तीने समाजाचा तोल बिघडून अविपरित घडत असेल तर अशा अभिव्यक्तीवर अंकुश घालण्यात चुकीचे काय! इंटरनेट ही सेवा आहे आणि सेवा मिळणे हा मूलभूत अधिकारच आहे परंतु मला त्या अधिकारावर वयाचे बंधन घालण्यात वाईट असे काही वाटत नाही. तुम्हीच बघा ना, हॉटेल ही सेवा देणारी संस्था, त्यात मिळणारे भोजन आणि मद्य ही सेवाच, मग का मद्यपान करण्यासाठी आपण त्याठिकाणी वयाची अट घालतो! उद्देश फक्त एकच की येणारी पिढी ही निरोगी आणि निर्व्यसनी असायला हवी. अगदी त्याच उद्देशाने ही वयाची अट घातलेली आहे कारण जगामध्ये सर्वात अधिक सर्च केली जाणाऱ्या वेबसाईट्स पैकी नंबर चार वरती एक पॉर्न साईट आहे आणि त्याच 100 पैकी 10 साईट्स ह्या पॉर्न साईट्स आहे. पहिल्या व दुसऱ्या क्रमांकावर अनुक्रमे यूट्यूब आणि फेसबुक येतात परंतु ह्या साईट्स वरती पॉर्न फिल्टर सारखी चाळणी नाही म्हणजे तुम्हाला यावरही अश्लील सामग्री बघता येईल. एका अहवाानुसार लॉकडाऊन मध्ये पॉर्न बघणाऱ्यांची संख्या भारतामध्ये 30% वाढली! विचार केला तर सहज लक्षात येते की हे नवीन युजर्स कोण असतील? लॉकडाऊन मध्ये ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी नव्याने स्मार्टफोन्स तसेच इंटरनेट डेटा विकत घेणाऱ्यांची संख्या होती ती जनरेशन-झी व जनेरेशन-अल्फा! जर ह्या एका अटीने कमीत कमी दोन पिढ्या "पॉर्न एडिक्शन" पासून वंचित राहतील तर अडचण काय आहे? काय फरक पडतो जर यांच्या मूलभूत हक्कावर तात्पुरता अंकुश लावून त्यांचेच येणारे आयुष्य अधिक सुपीक बनवले तर!



अमोल सोनाजी मोकासे
संपर्क क्र. 9730781775

इंटरनेट म्हणजे जाळं, अस जाळं जे परस्परांना जोडण्यासाठी वापरतात परंतु हे दुधारी शस्त्र आहे हे नक्की एकीकडे तुम्ही याचा वापर खूप चांगल्या कामांसाठी करू शकता जसे मंगळ ग्रहावर यान पाठवणे आणि दुसरीकडे याच्यावर भटकण्याचे प्रमाण खूपच अधिक आहेत, इतके अधिक की तुम्ही चांगला वापर करत असतानाच मध्येच काही तरी तुमच्या कामाच्या व्यतिरिक्त एखादी विंडो उघडेल जी तुम्हाला भटकण्यास प्रवृत्त करण्याइतपत प्रभावी असते. इंटरनेट, जनरेशन-झी आणि जनरेशन-अल्फा हे तिघे एकाच त्रिकोणाच्या तीन बाजू आहेत त्यामुळे यांना वेगळे करणे जवळजवळ अशक्यच, वेगळं करण्याची तशी गरजही नाही उलट याचा आपल्या कामात प्रभावी उपयोग करून स्वतःची व समाजाची प्रगती कशी साधता येईल याचे शिक्षण विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच दिले गेले तर आम्ही काळासोबत चालतो हेच खरे. भाषा विषय, सामाजिक शास्त्रे, गणित, विज्ञान असे बरेच विषय शाळेत शिकतो त्याच बरोबर वेळोवेळी सामाजिक शास्त्रांना अभ्यासक्रमातून काढण्याचे युक्तिवाद सुध्दा ऐकायला व वाचायला मिळतात कारण त्यांचे जीवनात काही उपयोजन नाही म्हणे असे ते बुद्धिजीवी सांगताना दिसतात मात्र इंटरनेट सारख्या विषयावर हे लोक तोंड शिवून घेतात. उलट हा विषय अभ्यासक्रमात कसा घेता येइल याची चर्चा लोकसभेच्या आणि विधासभेच्या मंचावर झाली पाहिजे कारण मुळात विषय आहेच तेवढा सर्वव्यापी. जे प्रौढ आहेत ते थोडा मर्यादित वापर करण्यात यशस्वी झालेले दिसतात मात्र ह्या दोन्ही जनरेशन्स सरसपाट नापास झालेल्या आहेत. यातील जास्तीत जास्त युजर्स साठी इंटरनेट म्हणजे व्हिडिओ बघणे, सोशल मीडिया वापरणे आणि ऑनलाईन गेम्स खेळणे ही व्याख्या रुळलेली आहे! हे रुळलेल वळण खंडित करणे अत्यंत गरजेचं आहे अन्यथा परिणाम खूप भयंकर होतांना दिसतात. हल्ली ऑनलाईन गेम्स खूपच प्रचलित व लोकप्रिय झालेले आहेत आणि यांना बळी पडणारे 90% युजर्स अल्पवयीन गटातील, ही चिंतेची बाब नाही का! कारण हे गेम्स पैसे लावून खेळल्या जातात अगदी ज्याप्रमाणे जुने लोक पत्त्यांचा डाव मांडायचे तसेच. मग ह्या जनरेशन्स च्या समस्याही यांच्या एवढ्या अडवान्स झाल्या जसे आईच्या खात्यावरील सर्व रक्कम रातोरात गायब होणे, बाबांच्या आयुष्यभराच्या मेहनतीची पेन्शन एका क्लिक मध्ये नाहीशी होणे, मुले रागीट व उग्र होणे, डिप्रेशन सारख्या स्थिती निर्माण होणे. त्यांनी त्यांचे एक स्वतंत्र विश्व किंवा त्यांच्याच भाषेत सांगायचे तर एक "स्पेस" तयार केले आणि त्याच्या बाहेर येऊन जगणे त्यांना थोडे कठीणच दिसते. त्यामुळेच की काय ह्या दोन जनरेशन मध्ये मानसिक तणाव, शारीरिक दुर्बलता, निद्रानाश, कमी वयात डोळ्यांच्या विविध समस्या, चिंता, अंतर्मुखपणा इत्यादी समस्या जास्तीत जास्त उद्भवतात.

(उर्वरित उद्याच्या अंकात)

# “सर जो तेरा चकराये...”

आधुनिक केसरी

**जॉनीचे ओठचं नाही तर डोळेही बोलायचे. त्याच्या चेहऱ्यातच नाही तर अवघ्या देहांत अभिनय भरलेला होता. एखादं वास्तव सुद्धा एवढं शाश्वत सच्च नसावं एवढा त्याचा अभिनय कडक असायचा. चाहत्यांचा आवडता अभिनेता तर तो होताच, शिवाय विनोदाचा बादशहाही होता. मी तर त्याला अभिनयाचं चतुरस्त्र भंडार म्हणेन !**

“अरे, कौन है ये? निकाली इसे बाहर... और यूं शराब पी के; ऑफिस के अंदर आने की इसकी हिम्मत कैसे हुई?” गुरु दत्त एकदम ओरडून उठले. मुंबईतील आपल्या ऑफिसमध्ये बसून ‘बाजी’ चित्रपटावर ते काम करीत होते की, पिऊन तर्रर्र झालेला एक फुटपाथ छाप माणूस त्यांच्या ऑफिसमध्ये अचानक घुसला होता. ऑफिसचा शिपाई त्या दारुड्याला धरणार एवढ्यात,
“अरे छोडो भई, काहे पकड़ रहे हो,” शिपयाचा हात झटकून “हम तो इहाँ गुरु दत्तजीसे मिलने आये है,” बोलता बोलता “क्या, आप उनके सेक्रेटरी है?” असं म्हणून टेबलासमोरील खुर्चीवर बसलेल्या गुरु दत्तनाच दारुड्याने विचारलं.
आता मात्र गुरु दत्तचा पारा सातव्या आसमानवर पोहचला. बखोट धरुन त्यांनी त्या दारुड्याला ऑफिसच्या दारापर्यंत नेलं.
“निकलते हो, या धक्के मार के...” गुरु दत्त बोलतच होते की एवढ्यात,
“माफ़ करना गुरु दत्त साब?’ अचानक शिस्तीत येवून तो दारुड्या एखाद्या सभ्य माणसासारखा बोलू लागला. गुरु दत्त एकदम चमकले.
“बलराजजीने मुझे आपसे मिलने को कहाँ था, और वो भी इसी अंदाज में,” त्याचं ते बोलणं ऐकून गुरु दत्त तर क्षणभर अवाकच झाले!
“यकीन मानो; मैंने पी नहीं है, यह एक्टिंग थी,” पुन्हा त्यानं असं म्हणताच गुरु दत्त त्याच्या अगदी गळ्यातच पडले. गुरु दत्तच्या ऑफिसमध्ये घुसलेला तो दारुडा; दुसरा तिसरा कुणी नाही तर आम्हा सगळ्यांचा चहेता अभिनेता जॉनी वॉकर होता.
त्याचं असं झालं की, बलराज साहनी एकदा बेस्ट बसने प्रवास करीत होते. प्रवासात त्यांनी बघितलं की, बसचा कंडक्टर फावल्या वेळात एखाद्या जोकर सारख्या नकला वगैरे करुन बसमधल्या प्रवाशांचं छान मनोरंजन करतोय. त्यांना एकदम आठवलं - गुरु दत्तना ‘बाजी’ चित्रपटासाठी अशाच एका अदाकाराची गरज आहे. ‘बाजी’ची स्क्रिप्ट बलराज साहनीची स्वतःचीच असल्यानं चित्रपटाच्या कॅरेक्टरसाठी हा कंडक्टर त्यांना फिट वाटला. आणि त्या नुसार त्या कंडक्टरला त्यांनी गुरु दत्तना भेटण्याविषयी सांगितलं सुद्धा!
जॉनीचं ‘जॉनी वॉकर’ हे नाव गुरु दत्त यांनीच त्याला बहाल केलं होतं. त्या काळी जॉनी वॉकर नावाच्या व्हिस्कीची चांगलीच चलती होती. आणि जॉनीच्या अदाकारीला या पेक्षा आणखी दुसरं नाव परफेक्ट असूच शकत नाही, असं गुरु दत्तना वाटलं. दहा भावंडांमध्ये दुसऱ्या नंबरवर असलेल्या जॉनीचं खरं नाव बद्रुद्दीन जमालुद्दीन काझी. मध्यप्रदेशातील बारवानी जिल्ह्यातील सेंधवाजवळील मेहतगोव्ह येथे एका मुस्लिम कुटुंबात त्याचा जन्म झाला होता. स्वातंत्र्या आधीचा तो काळ! वडील एक सामान्य गिरणी कामगार. त्यात गिरणी बंद झाल्यामुळे त्याची नोकरी गेलेली. पोटापाण्यासाठी ते कुटुंब नाईलाजानेच मुंबईला आलं. परिस्थितीनं जॉनीला लवकरच समज दिली. चित्रपटांमध्ये काम करण्याचं स्वप्नं डोळ्यांत घेऊनच जॉनीने मुंबईत पाय ठेवला.
आपलं प्रेरणास्थान नूर मोहम्मद चार्लीसारखं (चार्ली चॅपलिन) त्यालाही नकलाकार बनायचं होतं. चार्लीचा अभिनय, त्याच्या




नकला लहानपणासूनच जॉनीच्या भेजात सरसरायच्या. जेमतेम सहावी शिकलेल्या जॉनीने वडिलांसोबत मग स्वतःच्या कुटुंबाची जबाबदारी स्विकारली. भीडभऱ्या मुंबईत कधी बटाटे, कधी कुल्फी, कधी फळं, भाजीपाला; मिळेल ते विकून जॉनीने पैसे कमावले. बऱ्याचशा प्रयत्नानंतर पुढे त्याला बेस्टमध्ये कंडक्टर म्हणून नोकरी मिळाली. बस जेव्हा लांब रूटला असायची तेव्हा फावल्या वेळात जॉनी नाना नकला करुन प्रवाशांचं मनोरंजन करु लागला. त्याला मनोमन वाटायचं की, मी करीत असलेल्या या नकला सिनेसृष्टीतील उद्योगाशी संबंधित एखादी बडी आसामी कधीतरी बघेल, आणि




मला चान्स मिळेल. आणि खरोखरंच; त्याच्या स्वप्नांचा बंद दरवाजा बलराज साहनी यांनी त्याला उघडून दिला होता.

जॉनी होताच तसा अवलिया! अभिनयात जान ओतणारा. तो पडद्यावर दिसताच चाहते टाळ्या पिटायचे, शिट्ट्या वाजवायचे. चेहऱ्यावरच्या आठ्या गायब होऊन मनातला ताण-तणाव कुठच्या कुठे पळून जायचा. कारण, जॉनीचे ओठचं नाही तर डोळेही बोलायचे. त्याच्या चेहऱ्यातच नाही तर अवघ्या देहांत अभिनय भरलेला होता. एखादं वास्तव सुद्धा एवढं शाश्वत सच्च नसावं एवढा त्याचा अभिनय कडक असायचा. चाहत्यांचा आवडता अभिनेता तर तो होताच, शिवाय विनोदाचा बादशहाही होता. मी तर त्याला अभिनयाचं चतुरस्त्र भंडार म्हणेन!
चित्रपट सुरु होताच पडद्यावर मुख्य अभिनेत्यासोबत जॉनीचंही नाव असायचं. चित्रपटात त्याच्यासाठी गाणं असावं म्हणून, निर्मातेही तशी शिफारस करायचे. दिलीप कुमार आणि गुरु दत्तचे चित्रपट नक्कीच अभिजात होते पण त्यातला आशय बऱ्याचदा डोक्यातला ताण वाढवणारा असायचा. अशावेळी मग रसिक श्रोत्यांचा मूड रिफ्रेश करण्यासाठी, विनोदाची हलकीशी फुलझडी उडवून देणारा जॉनी तिथं हमखास लागायचा. मात्र, त्याकाळी जॉनीचा रोल नुसता हसण्या, हसवण्यापुरता मर्यादित नसायचा. त्या पलीकडे मुख्य अभिनेत्यासोबत तो रिलेट झालेला दाखवला जायचा. त्यामुळे चित्रपटाचं कथानक तर छान फुलायचं, आणि प्रवाही होऊन पुढेही सरकायचं. दारुड्याचा अभिनय, हरकती तर इतक्या सहजतेने सादर करायचा जॉनी की, त्याच्या त्या रसाळ अभिनयाच्या रसात भले भले लोट पोट व्हायचे. त्याच्या चेहऱ्यातच शेकडो हास्यरंग दडलेले होते.
चित्रपटातल्या त्याच्या भुमिकाही तशाच अविस्मरणीय होत्या. कधी तो प्रेमाचे रंगच न कळलेला भाबडा तेजू झाला. (शिकार), तर कधी बिरबलाच्या हुशारीने हेलनकडून पान विकवून घेणारा छैला (मिलन की रात), तर कधी लालाला बनवून फुकट मिठाई खाणारा गुलाम रसुल (आदमी और इन्सान). कित्ती त्याची ती अफलातून रुपं! भुमिका छोटी असो वा मोठी जॉनी भाव खाऊन जायचा. हिंदी सिनेसृष्टीतला खरा कोहिनूर होता तो!
खरं तर, हिंदी सिनेसृष्टीत विनोदी कलाकारांना मुख्य नायकाइतकं मानधन देण्याची परंपरा नाही, पण तीनशे पेक्षा जास्त चित्रपटात काम करणाऱ्या या अवलियाची लोकप्रियता जेव्हा एका वेगळ्या उंचीवर होती, तेव्हा मुख्य चित्रपटाच्या अभिनेत्याइतकंच मानधन त्याला मिळायचं. त्याच्यासाठी खास चित्रपटांची निर्मिती केली गेली. ‘छूमंतर’ १९५६, ‘जॉनी वॉकर’ १९५७, ‘खोटा पैसा’ आणि मिस्टर कार्टून एम. ए.’ १९५८. तो एकटाच असा अभिनेता आहे ज्याच्या नावाचा चित्रपट आहे. सेक्रेटरी आणि मॅनेजर ठेवण्याची सुरुवात त्यानेच केली होती.
जॉनीला भले ही देव, दिलीप, राज या त्रिमूर्तीशी स्पर्धा नसेल करता आली, पण त्याच्या खुमासदार अभिनय शैलीने चित्रपटांना नक्कीच फायदा व्हायचा. गुरु दत्तसोबत जॉनीची तर आजीवन मैत्रीच झाली होती. ‘साहिब बीबी और गुलाम’ वगळता गुरु दत्तच्या जवळजवळ सर्वच चित्रपटांमध्ये जॉनीने भुमिका साकारल्या होत्या. विनोदी अभिनेत्यावर गाणं फिल्मांकित करण्याची परंपराही बहुदा गुरु दत्तनेच १९५४च्या ‘आरपार’ या चित्रपटापासून केली होती. जॉनीच्या अभिनयाप्रती गुरुचा आत्मविश्वास जबरदस्त होता, आणि जॉनी सुद्धा आपल्या आवडत्या दिग्दर्शकासाठी आपल्या नायाब शैलीतल्या खास बाबी राखून ठेवायचा.
गुरु दत्तच्या बॅनर बाहेरही जॉनीने बरेचसे चित्रपट केले. बिमल रॉय दिग्दर्शित दिलीप कुमार-वैजयंतीमालाच्या ‘मधुमती’ (१९५८) चित्रपटातील चरनदासच्या भुमिकेसाठी, जॉनीला सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर ‘शिकार’ (१९६८) या चित्रपटातील तेजूच्या भुमिकेसाठी सर्वोत्कृष्ट विनोदी कलाकाराचा पुरस्कारही त्याने पटकाविला होता. आणखी एक सन्मान जॉनीच्याच नावावर आहे, इतर अभिनेत्याच्या तुलनेत रफ़ी साहेबांनी त्याच्यासाठी जास्त गाणी गायलीयेत. रफींची ती गाणी इतकी श्रवणीय आहेत की; पुनःपुन्हा ऐकत राहावी वाटतात. ‘मैं बंबई का बाबू...’ नया दौर / ‘ये दिल है मुश्किल जीना यहाँ...’ सी.आय.डी. / ‘सर जो तेरा चकराये...’ प्यासा / ‘जंगल में मोर नाचा...’ मधुमती / ‘ऑल लाईन किलिअर...’ चोरी चोरी / ‘जाने कहाँ मेरा...’ मिस्टर एंड मिसेस ५५ ! या व्यतिरिक्त आणखीही कितीतरी अफलातून गाणी जॉनीने आपल्या हरफनमौला शैलीने अजरामर केलीयेत.
आजही मनात विचार येतो; हा चुलबुला कॅरेक्टर सिनेसृष्टीत आलाच नसता’ तर अशा हटके गाण्यांची रफ़ी साहेबांकडून आणि संगीतकारांकडून निर्मिती झाली असती का? जॉनीच्या जीवंत अभिनयाने बरेचसे चित्रपट असेच यादगार होऊन गेलेयेत. ‘नया दौर’, ‘मेरे मेहबूब’, ‘प्यासा’, ‘सी.आय.डी.’, ‘मधुमती’, ‘आरपार’, ‘टॅक्सी ड्राईव्हर’, ‘देवदास’, ‘मेरे हुजूर’, ‘शिकार’, ही यादी तशी न संपणारीचंय!
कोणीसशे चौसष्ठला गुरु दत्तसारख्या मित्राचं अकाली जाणं जॉनीला फार मोठा धक्का देवून गेलं, तरीही त्याने ‘गोपी’ आणि ‘आनंद’सारख्या चित्रपटात आपल्या अभिनयाची चमक दाखवलीच! ‘आनंद’मधला इसाभाई सुरतवाला तर जॉनीने असा काही रंगवलाय की, त्याच्या अभिनयासमोर सुपरस्टारही लक्षात राहेनासा होतो. पुढे; १९७२ला आलेल्या धर्मेंद्रच्या ‘राजा जानी’ या चित्रपटानंतर मात्र जॉनीचा दौर संपायला आला. कालानुरूप कॉमेडीच्या व्याख्याही बदलू लागल्या होत्या. विनोदाचा बाजही जरा अश्लीलतेकडे झुकला. त्यात; अभिजात विनोदी भुमिकाही नावापुरत्याच येवू लागल्या होत्या. १९८०ला आलेल्या ‘शान’ नंतर तर जॉनीला चित्रपटात काम करण्याची इच्छाच राहिली नव्हती. निराश झाला होता तो! म्हणायचा - आधी चित्रपटाच्या कथानकानुसार अभिनेत्यांची निवड व्हायची, आता खूप सारे अभिनेते आहेत; कथानक मात्र शोधलं जातंय.
एकोणीसशे एक्कावन्नपासून सुरु झालेला जॉनीचा प्रवास म्हटलं तर १९८८ला थांबला होता, मात्र १९९७ला आलेला कमल हसनचा ‘चाची ४२०’ हा त्याचा शेवटचा चित्रपट ठरला. कुटुंबातल्या विरोधाला न जुमानता जॉनीने अभिनेत्री शकिलाची बहीण नूरजहांशी लग्न केलं होतं. तीन मुलं, तीन मुलींच्या आपल्या परिवारात जॉनी समाधानी होता. दारुड्याची भुमिका साकारणाऱ्या या अवलियाने कधीच मद्यपान केलं नाही हे विशेष! चलतीतही रविवारला काम न करणारा हा एकमेव अवलिया २९ जुलै २००३ला दिर्घ आजाराने हे जग सोडून गेला. मात्र, त्याचं ते हसऱ्या चेहऱ्याचं वरदान लाभलेलं रुप आजही हजारों चाहत्यांच्या मनात एखाद्या उसांडणाऱ्या धबधब्यासारखं नित्य खळाळतंय.
डाव्या खांद्यावर खुर्ची लटकावून, मान डोलवत, खांदे उडवत मॉलिशच्या बाटल्यांचा ट्रे हातात घेवून मुंबईच्या फुटपाथवरुन, ‘मॉलिश, तेल मॉलिश, चम्पी... या...
सर जो तेरा चकराये...’ म्हणत हवेच्या झुळकेगत लहरणारा असा हा दिलकश अवलिया आता पुन्हा होणे नाही एवढं मात्र खरं!

**संदर्भ: विकिपिडीया, यु-ट्युब, फिल्मफेअर.**

# आर्थिक सुधारणांना हवी गती



आशिष निनगुरकर
मोबा. 9022879904

आधुनिक केसरी

**स्वातंत्र्यापूर्वी मागास राष्ट्रांमध्ये गणल्या जाणाऱ्या भारताने त्यानंतरच्या साठ वर्षात नेत्रदीपक म्हणावी अशी प्रगती केली आहे. परंतू आपल्या देशातील विकासाचा आलेख वाढायला हवा, अशी कायम ओरड होत असते. ही ओरड खरी आहे कारण आपली वाटचाल अतिशय संथ गतीने सुरू आहे. समर्थ भारताच्या प्रगतीचा आलेख वाढण्यासाठी त्यासमोरील आव्हानांचा हा आढावा घेऊन त्यावर विकासात्मक दृष्टीकोन तयार करून अविरत काम करणे गरजेचे आहे.**

देश स्वातंत्र्य झाला तेव्हा आपल्याकडे देशवासीयांना पुरवता येईल एवढे अन्नही नव्हते. म्हणून नंतर डॉ. स्वामीनाथन यांच्या नेतृत्वाखाली हरितक्रांती घडविण्यात आली. त्यामुळे उत्पादन वाढले आणि भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. आज दुष्काळ पडला तरी उपासमारीने गरीब मरतील अशी स्थिती नाही. हे हरीतक्रांतीचे यश आहे.या संपूर्ण काळात जगभरात उलथापालथ झाली. साम्यवादी राजवटी कोसळून पडल्या. शेजारच्या पाकिस्तानात हुकुमशाही राजवट आली. अनेक ठिकाणी बंड, उठाव झाले. वेगवेगळ्या भाषा, बोली, वेगवेगळ्या समस्या, वातावरण असूनही भारतात मात्र लोकशाहीवरचा लोकांचा विश्वास अभंग राहिला. दुष्काळावर मात करण्यात आपल्याला गेल्या काही वर्षात यश मिळाले आहे. वाढत्या औद्योगिकरणामुळे रोजगार उत्पन्न होऊन निम्म्यापेक्षा जास्त गरीबी कमी झाली आहे. त्याचवेळी साक्षरताही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. आरोग्य व्यवस्थाही सुधारली आहे. अगदी खेड्यातही आज किमान प्राथमिक आरोग्य केंद्राद्वारे उपचार मिळू शकतात. इतकेच काय पण आता परदेशातील लोक उपचारासाठी भारतात येऊ लागले आहेत. गेल्या काही वर्षांपासून देशाच्या आर्थिक विकासाचा दर आठ टक्क्यांहून जास्त आहे. जगात सर्वांत वेगाने विकसित होणारी भारताची अर्थव्यवस्था आहे. माहिती आणि तंत्रज्ञानात जगात भारताचे नाव आज घेतले जाते. भारतीय बुद्धिला मिळालेली ही जगन्मान्यता आहे. त्यामुळेच बीपीओ, टेलिकम्युनिकेशन्स, आणि फार्मास्युटीकल्समध्ये भारताचा दबदबा आहे. जगात सध्या भारतीय अर्थव्यवस्था चांगल्या क्रमांकावर आहे.पण यात समाधानी न राहता आणखी दमदार वाटचाल करणे गरजेचे आहे.

विकासाच्या वाटेवर चालताना देशातल्या देशात अनेक विषमता निर्माण होत आहेत. 1990 नंतर देश वेगाने विकास करत असताना उत्पन्नात मोठी वाढ झाली. मात्र श्रीमंत आणि गरीब, शहरी आणि ग्रामीण भाग, विकसित आणि अविकसित भाग, कुशल कामगार आणि अकुशल कामगार यातील दरी मात्र वाढली आहे. यातून नवी विषमता जन्माला आली आहे. त्यामुळे अनेक सामाजिक प्रश्नही निर्माण झाले आहेत.भारतातील शेती विकासाचा दर अत्यंत कमी आहे. अद्यापही दोन तृतीअंश भारतीय शेतीवर अवलंबून आहेत. पण शेतीतून मिळणारे उत्पादन आणि उत्पन्न अत्यंत कमी आहे. आर्थिकदृष्ट्या ती परवडणारी नाही. अनेक ठिकाणी ती पारंपरिक रितीने केली जाते. शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या योजनाही जुन्याच आहेत. शेतमाल बाजारपेठेत नेण्याची योग्य वाहतूक व्यवस्था नाही. मार्केटपर्यंत जायला रस्ते नाहीत. शेतकरी बाजारही नियमांच्या कचाट्यात आणि मक्तेदारीच्या जाळ्यात अडकले आहेत. याचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही. सेवा क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध होत असताना दुसरीकडे बेरोजगारांचा आकडाही वाढत आहे. त्यातही अकुशल कामगारांना हा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावतो आहे.ढोबळमानाने, सन 1950 च्या दशकात भारताच्या पूर्व क्षेत्रातील विवादित भाग भारताने ठेवावा आणि भारताच्या उत्तर क्षेत्रातील विवादित भाग चीनला मिळावा असे चीनचे म्हणणे होते. त्यानंतरच्या दोन दशकांमध्ये चीनने संपूर्ण विवादित भागांवर आग्रही हक्क सांगण्याचे धोरण अवलंबले होते. मात्र सन 1978 मध्ये डेंग शिओपिंगने 'चीनचा शांततापूर्ण उदय' घडवून आणण्याचा संकल्प केल्यानंतर सीमाप्रश्न सोडवण्यासाठी चीनने पुन्हा देवाणघेवाणीच्या सूत्राचा पुरस्कार केला.



भारताने जागतिक शक्ती होण्यासाठी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय धोरणांमध्ये चीनचे अनुकरण करावे असा मतप्रवाह आपल्या देशात वाढू लागला आहे. चीनमध्ये 'लोकशाही' व्यवस्था नसल्यामुळे या देशाने पद्धतशीर विकास घडवून आणला आहे ज्यातून भारताने धडा घेण्याची गरज आहे, अशा प्रकारची मते अधूनमधून व्यक्त होत असतात. भारतीयांना स्वतःच्या राजकीय व्यवस्थेऐवजी स्पर्धक/शत्रू राष्ट्राची राजकीय व्यवस्था अधिक चांगली वाटू लागणे हे चीनने भारतापुढे टाकलेले तिसरे आव्हान आहे. आर्थिक विकासाच्या क्षेत्रात चीनने भारतापेक्षा मोठी झेप घेतली आहे आणि भारताच्या तुलनेत मोठया प्रमाणात गरिबीचे निर्मूलन केले आहे, हे खरे असले तरी अर्धसत्य आहे. चीनमधील सध्याची पिढी भारतीयांपेक्षा सुस्थितीत असली तरी मागील 70 वर्षांमध्ये नेहमीच अशी परिस्थिती नव्हती. समाजवादी गणराज्याच्या सुरुवातीच्या तीन दशकांमध्ये चीनने मोजलेली मानवी किंमत प्रचंड मोठी आहे. या काळात भारतात झालेल्या मानवी मूल्यांची स्थापना आणि या मूल्यांच्या जोपासनेसाठी निर्मिलेल्या लोकशाही संस्था भारताचे दीर्घकालीन भांडवल आहे. संसद, सरकार आणि न्यायसंस्था यांच्यातील अधिकार वाटणी, पंचायती राज संस्थांचा विकास, प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य आणि वैविध्यतेचे एकात्मतेत गुंफलेले सूत्र इत्यादी बाबतीत भारताकडून शिकण्याचा चीनचा प्रयत्न आहे. या क्षेत्रांमध्ये चीनचे लोकमत प्रभावित करण्याची भारताची क्षमता आहे. असे असताना आपल्या राजकीय पद्धतीबाबत दुस्वास दाखवत चीनबाबत आकर्षण निर्माण होणे हे हाराकिरीचे लक्षण आहे.

नजीकच्या भवितव्यात चीनमधील राजकीय व्यवस्था कोलमडून आर्थिक व सामाजिक अनागोंदी माजल्यास त्याचे भारतावर काय परिणाम होतील याचा विचार अद्याप करण्यात आलेला नाही. मुळात, चीनमध्ये अराजक पसरण्याची शक्यता कितपत आहे? चिनी राज्यकत्रे आणि समाजातील अभिजन वर्ग नेहमीच राजकीय अराजकतेच्या भीतीने धास्तावलेला असतो. ही भीती मुख्यतः दोन बाबींमुळे आहे. एक, तिबेट आणि शिन्जीयांग प्रांतातील प्रचंड असंतोषाचे रूपांतर जाहीर उठावात झाल्यास त्याचे चीनच्या इतर भागांमध्येसुद्धा पडसाद उमटू शकतात. असे झाल्यास, इतर प्रांतातील वांशिक अल्पसंख्याक समूह साम्यवादी पक्षाचे नेतृत्व झुगारून देऊ शकतात, ज्याचा परिणाम साम्यवादी पक्षाची सत्तेवरील पकड सल होण्यावर होऊ शकतो. दोन, चीनमधील प्रचंड आर्थिक दरीमुळे 'नाही रे' वर्गात असंतोषाने मुळे धरली आहेत. या असंतोषामुळे चीनमधील मोठ्या वर्गाला साम्यवादी पक्षाबद्दल आदर वाटेनासा झाला आहे. याचे रूपांतर वेगवेगळ्या स्तरांवर स्थानिक सरकारी अधिकारी तसेच पक्षाचे स्थानिक पदाधिकारी यांच्याविरुद्ध विविध रूपांत जाहीर विरोध प्रदर्शनांमध्ये होते आहे. एका वर्षांत घडणाऱ्या अशा प्रदर्शनांची संख्या लाखोंमध्ये आहे. विरोधाच्या या ठिणग्या एकाचवेळी प्रज्वलित झाल्यास साम्यवादी पक्षाच्या हाताबाहेर परिस्थिती जाण्याचा धोका आहे. यातून उद्भवणारा संघर्ष पुन्हा एकदा चीनला अराजकतेकडे घेऊन जाईल.

कोरोनाने भारतासमोर सर्वच आघाडयांवर आव्हाने उभी केली. एकीकडे कोरोनाची मोठी रुग्णसंख्या तर दुसरीकडे मंदीचे संकट, अशा दुहेरी पेचात भारत अडकला होता. हे सगळे सुरु असतांनाच चीनच्या सीमेवर तणाव होता तर देशातही अस्वस्थतेचे वातावरण होते.कोरोना येण्याआधीपासूनच आर्थिक आव्हानांचा डोंगर वाढत चालला होता. अनियंत्रित बँकिंग व्यवस्थेत आर्थिक अस्थिरता होती तर निश्चलीकरणाच्या दणक्यामुळे आर्थिक सुधारणांचा वेग मंदावला होता. मधल्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हातात सत्तेचे केंद्रीकरण होण्याची प्रक्रिया सुरुच होती. काश्मीरमध्ये लावण्यात आलेले निर्बंध हे त्यातले एक उदाहरण. या सगळ्या काळात 'इंडो पॅसिफिक' ही भौगोलिक आणि भूराजकीय संकल्पना म्हणून आकाराला आली आणि त्यातून भारताकडे लक्ष वेधले गेले. एक आर्थिक महासत्ता म्हणून चीनची ताकद वाढत असतांना भारताचीही आर्थिक प्रगती होणे आणि भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया या देशांचा समावेश असलेल्या 'क्वाड्रिलॅटरल' किंवा 'क्वाड' च्या माध्यमातून प्रादेशिक सुरक्षा मजबूत होण्याकडे अनेक जण आशेने बघत आहेत.हे सगळे घटक एकत्र आल्यामुळे भारताचे महत्व वाढले आहे. बदलत्या भूराजकीय वातावरणात स्पर्धेत टिकून राहण्यासाठी कोरोनावर मात करणे आणि आर्थिक सुधारणांना गती देणे भारताला फार महत्वाचे आहे. जलद गतीने प्रगती साधण्यासाठी हे करणे अत्यावश्यक आहे. देशाची आर्थिक स्थिती सुधारली तर भारताला इतर देशांची अधिक व्यापकपणे धोरणात्मक संबंध ठेवता येतील. आर्थिक प्रगतीला चालना दिल्याचा फायदा मुंबईसारख्या प्रादेशिक केंद्रांनाही मोठा लाभ होणार आहे.

कोरोनावर तातडीने मात करणे, हा भारताचा सगळ्यात महत्वाचा प्राधान्यक्रम हवा. महामारी आटोक्यात आल्यास आर्थिक नुकसान कमी होऊन आर्थिक स्थैर्य येण्यास मदत होईल. 2020 च्या पहिल्या आणि दुसऱ्या तिमाहीत अर्थव्यवस्थेची घसरण झाली. वाईट काळ संपला आहे, अशी चिन्ह दिसत असली तरी अजूनही अर्थव्यवस्थेची स्थिती गंभीरच आहे. अर्थकारणाला गती द्यायची असेल तर कोरोनाचा फैलाव कमी व्हायला हवा. सरकारची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने सरकारच्या आर्थिक मदत देण्याला मर्यादा आहेत. त्यामुळेही कोरोना नियंत्रणात येणे आर्थिक प्रगतीसाठी गरजेचे आहे. आर्थिक पडझडीची तीव्रता कमी करणे आणि आर्थिक स्थिती सुधारणे हे लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठीच नाही तर आर्थिक प्रगतीसाठीही अत्यावश्यक आहे.येत्या काळाचा विचार करता भारताने योग्य पावले उचलत आर्थिक प्रगतीचा वेग तातडीने वाढवायला हवा. पूर्व आशियाई देशांमध्ये जणू एखादा चमत्कार घडावा अशा पद्धतीने आर्थिक विकास झाला. त्या तुलनेत भारताचा शहरीकरणाचा आणि आर्थिक विकासाचा वेग कमी आहे.भारताने 1991 मध्ये उदारीकरणाची 'बिंग बँग' म्हणून ओळखली जाणारी मोठी सुधारणा केली तर दुसरीकडे आर्थिक प्रगती साधणाऱ्या देशांनी विविध प्रकारच्या सुधारणांची जणू मालिकाच गुंफली. भारतात पायाभूत आणि संस्थात्मक सुधारणांना अजुनही फार मोठा वाव आहे. लोकसंख्या हे भारताचे बलस्थान असले तरी संरचनात्मक बदल जलद आर्थिक प्रगतीसाठी महत्वाचे आहेत.

जलद गतीने आर्थिक प्रगती केल्यास भारताला आकार आणि सुभगता अशा दोन्ही आघांडयावर चीनला गाठता येईल.

भारताला जागतिक महासत्ता होण्यासाठी आर्थिक प्रगती करणे अधिकच महत्वाचे आहे. आकाराने भारत मोठा असल्याने शेजारी देश नैसर्गिकपणे भारताकडे आकर्षिले जातात. व्यापाराच्या माध्यमातून आर्थिक प्रगती साधल्यास प्रादेशिक व्यापक आर्थिक भागीदारी( आरसीईपी ) बाबत कोणताही भूमिका घेतली तरी भारताचे महत्व वाढतच जाईल. आर्थिक गुंतवणुकीचे केंद्र म्हणून मुंबईसारख्या शहरांचे महत्व यामुळे वाढेल. आपल्या सत्तेचा वापर करण्याचे भारताचे पर्याय यामुळे अधिक व्यापक होतील. पंचतंत्रातील कासव आणि सशाच्या गोष्टीची तुलना करता भारत कासव आहे तर चीन ससा! भारताची कवचकुंडले प्रचंड मजबूत आहेत, निर्धार पक्का आहे आणि आयुष्य दीर्घ आहे. वेगाने पुढे जाणाऱ्या सशावर नजर रोखत कासवाला स्वतःची वाटचाल अविरतपणे सुरू ठेवण्याची गरज आहे. समर्थ व उज्ज्वल भारताच्या विकासासाठी सर्वच क्षेत्रे पादाक्रांत करणे गरजेचे आहे. भविष्याच्या दृष्टीने हीच महत्वाची गरज आहे.

# हास्यातून प्रबोधनाची परिणामकारकता साधणाऱ्या कथा



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195


आधुनिक केसरी

**आपल्या घराच्या, कुटुंबाच्या भल्यासाठी, उद्धारासाठी देवाला साकडे घातले जाते. 'नवसाची बायको' असे कधी आपण ऐकले आहे का? 'बंड्या बोर्डात आला' आणि 'बंडूचे वधू संशोधन' या विनोदी कथासंग्रहाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर लेखक सुनील पांडे नवाकोरा विनोदी कथासंग्रह वाचकांच्या भेटीस घेऊन आले आहेत. कथासंग्रहाचे नाव आहे 'बायको माझी नवसाची' .. नावातच गंमत आहे ! एकूण १४ कथांचा हा संग्रह असून प्रत्येक कथा ही जितकी मनोरंजक आहे तितकीच निखळ हास्य खुलवणारी आहे.**

आपल्या सर्व इच्छा- आकांक्षा पूर्ण व्हाव्यात, असे प्रत्येकाला वाटत असते. आपल्या इच्छापूर्तीसाठी माणूस प्रयत्न ही करतो. पण प्रत्यत्नाअंती काही साधलं नाही तर देवाचा आधार वाटू लागतो आणि मग देवाला नवस केला जातो. 'माझी अमुक इच्छा पूर्ण केलीस की तुला तमुक वस्तू तुला अर्पण करेन' अशा पध्दतीने श्रद्धेने लोक देवाला शरण जातात, त्याला वेठीस धरतात. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगातही अडचणी आल्या, संकटे आली, मनात नकारात्मकता निर्माण झाली तरी निर्गुण निराकार परमेश्वराचा केवढा आधार वाटतो मनाला ! ही श्रद्धा जगण्याची उमेद वाढवण्याचं कार्य करत असते.

आपल्या आजूबाजुला अनेक घटना घडत असतात. त्या घटनांकडे बारकाईने पाहणं, निरीक्षण करणं आणि त्यातील विसंगती विनोदी अंगाने कथेच्या रूपात सादर करणं यासाठी जी कल्पकता, आकलनशक्ती, निरीक्षणशक्ती विनोदी लेखकाकडे असणे आवश्यक असते ती लेखक सुनील पांडे यांच्याकडे पुरेपुर असल्याचे जाणवते. या कथासंग्रहातील कथा वाचताना जाणवते की ओढून - ताणून या कथा लिहिलेल्या नाहीत तर त्या सहजपणे लेखणीतून उतरल्या आहेत. साधी - सोपी भाषाशैली, रचना, उत्तम कथाबीज मांडणी, ओघवती निवेदनशैली आणि संवाद यांच्या सुरेख मांडणी तसेच कथासंग्रहाचे समर्पक मुखपृष्ठ ही या कथासंग्रहाची वैशिष्ट्ये आहेत. या कथांमधील पात्रे इतक्या सहजतेने लेखकाने रंगवली आहेत, की त्या पात्रांचं व्यक्तिचित्रण, पात्रांच्या तोंडी असलेली भाषा, हजरजबाबीपणा आणि विविध स्वभाववैशिष्ट्ये , पात्रांची सोपी - सूटसुटीत नावे यामुळे ही पात्रे जवळची वाटू लागतात.

या कथासंग्रहातील पहिली शीर्षक कथा 'बायको माझी नवसाची'. या कथेतील गण्याचं लग्न जमत नसल्याने तो देवाकडे लग्न होऊ दे म्हणून चक्क नवस करतो. गण्याचं नवस पूर्ण होतो का ? की पुन्हा त्याच्या पदरी निराशा येते,याची उत्कंठा निर्माण करणारी ही कथा. माणुस हा किती महत्वाकांक्षी असतो, आपल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी तो देवाला वेठीस धरतो. पण तो समाधानी होतो का ? हा प्रश्न उपस्थित होतो.




'एका लग्नाची गोष्ट' कथेतील प्रा. राजू तांबे आणि प्रा. राणी लोखंडे कोणालाही न दुखावता आपल्या हुशारीने आणि चतुराईने कसे लग्न करतात, याची ही गोष्ट आहे.लग्न जमवताना आजही व्यक्तिचं दिसणं, स्वभाव, गुण यापेक्षा धन- संपत्ती आणि पद याकडे पाहिले जाते, हे वास्तव या कथेतून मांडले आहे.

मेहनतीने शिक्षण घेऊनही सुयोग्य नोकऱ्या सुशिक्षितांना मिळत नाहीत. वशिला आणि पैशांने अनेक जागा भरल्या जातात आणि योग्य उमेदवार हा नोकरीपासून वंचित राहतो, याची कहाणी विशद करणारी 'मुलाखत' ही कथा आहे. आपल्या व्यवस्थेची अशी अवस्था आहे जिथे भ्रष्टाचार , लाचखोरी हे प्रकार दिसून येतात , पण हे प्रकार थांबवण्यासाठी कोणते प्रयत्न होताना दिसून येत नाहीत. बेरोजगारी ही माणसाला कशा प्रकारे चुकीचे काम करायला भाग पाडते, याची प्रचिती देणारी 'दयानंद महाराज' ही कथा डोळ्यात अंजन घालणारी आहे.

तुकाराम भोसले हा सुशिक्षित असला तरी नैलाजास्तव बुक बाइंडिंगचं काम करणारा. त्याच्या कामाच्या स्वरुपाकडे पाहून लग्नासाठी अनेक नकार मिळाले. योग्य शिक्षण असूनही नोकरी मिळत नाही , नोकरी नाही म्हणून लग्न जुळत नाही अशाने कित्येक जण अविवाहित राहतात, त्यांचे प्रश्न, त्यांच्या वेदना , समस्या मांडणारी 'तुकाराम बाईंडर' ही कथा आहे. या आणि आणखी कथा जितक्या वाचनीय , मनोरंजक आहेत तितक्याच ज्वलंत विषय सहजपणे विस्तृत करणाऱ्या आहेत. हसवता हसवता समाजाचं खरे रूप दाखवणाऱ्या आहेत.

या विनोदी कथांच्या माध्यमातून निखळ हास्य निर्माण करून सामाजिक विसंगतीवर प्रकाश टाकला आहे. बेरोजगारी, अंधश्रद्धा, लाचखोरी, ठराविक विचारप्रवृत्ती घेऊन जगणारी माणसे इत्यादीचं दर्शन या विनोदी कथांमधून लेखकाने घडवले आहे.

मनोरंजन आणि प्रबोधन अशी दुहेरी परिणामकता साधणाऱ्या या कथा नक्की वाचा. आयुष्य जगताना सुख- दुःख तर एकामागून एक येत राहतात पण यातूनच चार आनंदाचे क्षण आपण शोधायचे असतात. हे आनंदाचे क्षण अनुभवण्यासाठी 'बायको माझी नवसाची' हा विनोदी कथासंग्रह नक्की वाचा.

**(बायको माझी नवसाची- विनोदी कथासंग्रह / लेखक सुनील पांडे / प्रकाशक : स्नेहवर्धन प्रकाशन / मूल्य : १५० रुपये )**

# 'स्व'सोबत चालणारा माझा संवाद

आधुनिक केसरी

नसतो तोपर्यंत सगळे ठीक असते, पण जेव्हा आपल्याला नक्की काय हवेय, याचा शोध लागतो. तिथून पुढे समानधर्मीयांचा शोध सुरू होतो. तो शोध संवादाची भूक वाढवणारा असतो. अस्वस्थ करणारा असतो. कलावंताच्या या अस्वस्थ मनःस्थितीबद्दल आसपासची दुनिया फार काळ विचार करीत नाही. त्यांचे असे म्हणणे आहे की, कलावंतांना निर्मितीच्या वेदना या असतातच आणि त्यांनी त्या स्वतःच निर्माण केलेल्या असतात. काही अंशी ते खरेही आहे. सूर्योदयाची चाहूल पाखरांना
जशी सर्वात अगोदर लागते तशी संकटाची चाहूल प्राण्यांना मग इतरांना सूचित करण्यासाठी त्यांची जशी धडपड चालते, अगदी तशीच काहीशी अवस्था अतितीव्र संवेदनशील, सृजनशील मंडळींची झालेली असते. काळाच्या उदरात काय दडलेय हे सांगायचे सामर्थ्य त्यांच्याकडे असते आणि म्हणूनच कवी, लेखक, कलावंत अनिष्ट चालीरिती, दांभिकतेवर, समाजातील व्यंगावर बोट ठेवून दिशादर्शनाचे काम आपल्या साहित्याच्या कलेच्या माध्यमातून करून समाज मनाला सजग करण्याचे काम करत असतात. एक प्रकारे समाजाप्रती जागल्याची भूमिका पार पाडत असतात. जे जे आपणाशी ठावे ते ते जनास सांगावे । शहाणे करोनि सोडावे सकलजन।।
व्यक्त होण्याच्या या उत्कट अनुभूतीमागे हेच मुख्य कारण असते. साहित्यनिर्मितीतील एक उदाहरण पाहण्यासारखे आहे. रामायण लिहून पूर्ण झाल्यावर वाल्मिकींनी ते नारदाला दाखवले. नारदाने ते वाचले पण त्याचे समाधान झाले नाही. ते म्हणाले की, 'हनुमानाचे रामायण यापेक्षा चांगले आहे.' हनुमानानेही रामायण लिहिले आहे हे वाल्मिकींना माहीत नव्हते. ते त्यांच्या शोधात निघाले. दोघांध्ये कोणाचे रामायण खरे आहे, हे त्यांना जाणून घ्यायचे होते. कर्दळी वनामध्ये केळीच्या झाडावर सात मोठ्या पानांवर लिहिलेले रामायण त्यांना सापडले त्यांनी ते वाचले आणि ते सर्वोत्कृष्ट असल्याचे आढळले. व्याकरण आणि शब्दसंग्रह, श्लोक आणि लय याचा मोठा समतोल त्यांच्याकडे होता. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. हे पाहून हनुमानाने विचारले, तुम्ही का रडत आहात? वाल्मिकी म्हणाले, तुमचे रामायण इतके सुंदर आहे की, आता माझे रामायण कोण वाचणार?
हे ऐकून हनुमानाने ती पाने फाडून टाकली आणि ते म्हणाले, 'आता हनुमानाचे रामायण कोणी वाचू शकणार नाही.' वाल्मिकी स्तब्ध झाले. त्यांनी हनुमानाला असे का केले, असे विचारले. त्यावर हनुमान हसले आणि म्हणाले, तुम्हाला माझ्यापेक्षा तुमच्या रामायणाची जास्त गरज आहे. जगाला वाल्मिकी आठवावेत म्हणून तुम्ही रामायण लिहिले. तेव्हा वाल्मिकींना कळले की आपले रामायण हे महत्त्वाकांक्षेचे फळ आहे. तर हनुमानाचे रामायण भक्ती आणि आपुलकीचे फळ आहे. अगदी आजही हनुमानासारखे आत्मसन्मानासाठी कार्य करणारे आणि लिहिणारे लोक आहेत.
लेखकाने आपल्या शब्दांखाली सगळ्यांना झाकून घ्यावे. सर्वांना मायेची उब द्यावी. चांगल्या-वाईटाला आईच्या मायेने निस्तरावे. सावरावे. सगळ्यांची माऊली व्हावे, दुःखावर, फाटकेपणावर हळुवार फुंकर घालावी. हताश, निराश, पोळलेल्या जीवांना भर जिव्हाळी नजरेने पाहावे. एकटेपणात, संकटात सोबतीची हमी देऊन मानसिक, भावनिक बळ द्यावे. वेळप्रसंगी अवखळपणाचा कान पकडून वठणीवर आणावे. दीन-दुबळ्या, शोषित, पीडित दुःखी जीवांच्या इच्छांचा हुंकार व्हावे तर वेळप्रसंग विचारांची मशाल पेटवून लढण्याचे सामर्थ्य निर्माण करावे. लेखकाच्या कलाकृतीने, साहित्याने समाजात निर्माण झालेली पोकळी अशा रितीने भरून काढण्याचा प्रयत्न करावा. तुकारामांना जसं बाप होता आलं आणि ज्ञानेश्वरांना माऊली! तसे कारण लिहिताना केवळ शब्द किंवा वाक्येच महत्त्वाची नसतात तर त्यातल्या रिकाम्या जागासुद्धा महत्त्वाच्या असतात. त्या वाचता आल्या पाहिजेत. हे वाचता येणे म्हणजेच जगणं समजून घेणं आहे. आणि मला आनंद आहे की, प्रत्येक कालखंडात त्या त्या वेळच्या बदलत्या जीवन जाणिवा समर्थपणाने साहित्यातून व्यक्त झाल्या आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात वेगवेगळ्या पातळीवरून झालेल्या जनजागृतीमुळे साहित्यात खुपे नवे प्रवाह निर्माण झाले. खूप वेगळ्या आणि नव्या जाणिवा मोकळेपणाने कथा, कविता, नाटक, आत्मकथन आणि कादंबरीतून मांडल्या जाऊ लागल्या आहेत. अनेक युगांपासून दबलेल्या आणि दाबलेल्या मुक्या भावना त्यामुळे उसळी मारून वर येत आहेत. यात स्त्रियांचे आणि दलितांचे, भटक्या-विमुक्तांचे साहित्य मोठ्या प्रमाणावर आहे.
पण या सगळ्यांसोबत आज इतक्या वर्षांच्या माझ्या या प्रवासात काही गोष्टी मनाला खटकतात, त्रास देतात, त्याबद्दल बोलणेही गरजेचे आहे, असे मला वाटते. प्रगल्भ मांडणीमुळे त्या नव्या प्रवाहांची नोंद घेण्यासाठी सोयीचे व्हावे म्हणून अभ्यासकांनी दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, ग्रामीण अशी त्याची विभागणी केली. पण हळूहळू ही विभागणी आमच्या मानसिकतेत फूट पाडण्यासाठी कारणीभूत ठरली. यातून पुन्हा स्त्रियांचे साहित्य, दलितांचे साहित्य, अशी वर्गवारी समोर आली. गटातटाचे राजकारण तयार होऊन एक वेगळीच कंपूशाही निर्माण झाली. एकमेकांचे वाचणे, चर्चा करणे, मत मांडणे, खोडणे या वाङ्मयीन आनंदाचे पार वाटोळे झाले.
साहित्यामध्ये पुरस्कारांसाठी लॉबिंग सुरू झाले. अगदी महत्वाचे, सन्मानाचे वाटणारे पुरस्कारही गेल्या काही वर्षांत असेच मिळताना उघडपणे दिसत आहेत. गटागटाने राहणारे हे लेखक दुसऱ्या गटातील लेखकाचा दुराग्रह करताना दिसतात. कुणाचे पुस्तक पाडायचे आणि कुणाचे उचलायचे. चर्चेत आणायचे हे सर्व आजूबाजूला घडताना दिसत आहे. एखाद्या चांगल्या लेखकाचा द्वेष कर कलाकृतीचे मूल्यहनन करणे, उपेक्षा करणे, अनुल्लेखाने मारणे हे वाङ्मयवाह्य वर्तन करून खुनर्स' काढण्यात धन्यता मानू लागले आहेत. आणि सगळ्यात वाईट गोष्ट काय तर ज्यांना समाज चांगला लेखक 7/ वाचताच त्य समजतो असे चांगले लेखक गलिच्छ मतप्रवाहाचे नेतृत्व कधी उघड तर कधी अंधारातून करताना दिसत आहेत. चांगला लेखक सर्वांचे, मानवी मनाचे प्रतिनिधीत्व करत असतो. त्याची मांडणी ही सर्वसमावेशक असावी, अशी अपेक्षा असते. तो कुण्या एका जातीचा, धर्म, प्रांत, प्रदेशाचा नसतो. दुर्दैवाने याचे भान आजच्या मराठी वाङ्मयविश्वातील काहींना राहिले नाही. याची खंत वाटते, जातीचे आणि विचारांचे अस्तित्व टिकविण्यासाठी या लेखकांनी अनुयायी तयार केले आहेत. ते विरोधात मांडणी करणाऱ्यांवर तुटून पडतात. पाहता पाहता आमच्या लेखकांचे 'नेते' कधी झाले कळलेच नाही.' त्यामुळे चांगल्या-वाईटाचा लेखनातील कसदारपणाचा, दर्जाचा विचार न करता 'तो आपला आहे ना!' या 'आपलेपणाची' बाधा मराठी साहित्याला झाली आहे. ही दुर्दैवाची बाब आहे. खरे तर, लेखक समाजाला दिशा दाखवण्यासाठी असतो. त्याचा समाजाला धाक वाटला पाहिजे. पण
आता असे स्वतःच बाधीत झालेले लेखक समाजाला काय 'ढेकळं' दिशा दाखवणार? अलीकडच्या दहा वर्षांत समाजात पुन्हा जे मोठ्या प्रमाणावर जात-पात-धर्म यांचे राजकारण आणि अवडंबर माजले आहे, ते या अशा स्वतःची पोळी भाजून घेणाऱ्या बुद्धिजीवींमुळेच आहे, असे मला मनापासून वाटते. मित्रहो ! सत्तेच्या माध्यमातून नेहमीच शोषणाचीही नवनवीन बेटे आकाराला येत असतात. त्यामुळे आजच्या लेखकांनी, वाचकांनी, कलावंतांनी समाजाची सर्वार्थी उंची खुजी होताना पाहून आपले मौन सोडले पाहिजे. वैयक्तिक हितसंबंध बाजूला ठेवून सत्याच्या बाजूने उभे राहिले पाहिजे. या सर्व पार्श्वभूमीवर स्त्रियांच्या साहित्याबद्दल आपण थोडक्यात मागोवा घेण्याचा प्रयत्न करू या!


प्रा. डॉ. संजीवनी तडेगावकर
अध्यक्ष, 17 वे राज्यस्तरीय लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन 2022

**17 वे राज्यस्तरीय लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन नरसी, ता.नायगाव, जि. नांदेड येथे सुरू आहे. त्यानिमित्त अध्यक्षीय भाषणांचा सारांशांचा उर्वरित भाग.**

संत कवयित्रींच्या काव्यापासून लिखित साहित्याचा विचार केला तर भक्ती मुक्तीच्या जीवनरसात चिंब भिजलेली स्त्री कविता जनाबाई वेगळ्या वळणावर घेऊन जातात. 'डोईचा पदर खांद्यावर घेऊन जाईन मी बाजारात!' होय निघाले आहे मी देवाचे घर! असे जनाबाईस उद्वेगाने म्हणायला लावणारी आमची समाजव्यवस्था. हिची पाळेमुळे समजून घेताना ताराबाई शिंद्यांइतकीच माझीसुद्धा दमछाक होते. 'हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियले जैसे मज झाले पांडुरंगा' असे काकुळतीला येऊन कान्होपात्रेला का म्हणावे लागले असेल? असा प्रश्न आमच्या भक्ती-मुक्तीच्या कल्पनेत रमलेल्या समाजाला का पडला नसेल बरे! की स्त्रियांच्या दुःखाला गृहीत धरून ईश्वरभक्ती विरहाच्या त्यागमूलक सिद्धांताच्या नावाखाली कान्होपात्रेचे दुःख अभ्यासकांनी, संशोधक, समीक्षकांनी जाणिवपूर्वक दुर्लक्षित ठेवले. प्रवचन, कथा, कीर्तनांतून या स्त्रियांच्या दुःखाचे, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे नेहमीच दैवतीकरण होताना दिसते.
जनाबाई, कान्होपात्रेपासून सुरू झालेला स्त्री कवितेचा हा सशक्त प्रवाह आजच्या कवयित्रींनी अधिक जोमदारपणे प्रवाहीत केल्याचे दिसते. छंदातून, मुक्तछंदातून आपल्या भावनांना वाट मोकळी करून देताना कधी संयमाने तर कधी आक्रमक होत जाब विचारित स्त्रियांनी अभिव्यक्ती केलेली आहे. स्त्रियांच्या लेखनावर नेहमीच 'रडकं' साहित्य 'पानाफुलांचे' साहित्य म्हणून टीका होते. पण या टीकेला बाजूला सरकवून स्त्रिया सतत लिहीत आहेत. विविधांगी अनुभव, आशयपूर्ण मांडणी करत त्यांचा लेखन प्रवास अडीअडचणींवर मात करत सुरू आहे. काहीसा इंदिराबाई म्हणतात, या न्यायाने
'कुणी निंदावे त्यालाही करावा मी नमस्कार कुणी धरावा दुरावा त्याचा करावा सत्कार काही वागावे कुणीही मीच वागावे जपून सांभाळण्यासाठी मने

माझे गिळावे मीपण...
आज २१ व्या शतकातील समाजातील स्त्रिया मोठा संघर्ष करून प्रत्येक क्षेत्रात मुद्रांकित होण्यासाठी धडपडत आहेत. त्यांना समाजाच्या वैचारिक, आर्थिक, सामाजिक विचारांचे भान आले आहे. या सामाजिक रचनेत स्वभिमानाने जगायचे असल्यास मुख्य प्रवाहात यावे लागेल. या ठिकाणी युगायुगांपासून सत्तास्थानी असणाऱ्या पुरुषांनी आपल्याकडून कपट कारस्थान करून ही सत्ता हिसकावली आहे, हेही स्त्रियांना आता पुरते समजले आहे. जगण्याची झालेली कोंडी, संकोच यातून मार्ग काढण्यासाठी त्या सत्तेच्या केंद्रस्थानी येऊन निर्णय प्रक्रियेत सहभाग नोंदवू लागल्या आहेत. आणि ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. यातही त्यांचे चारित्र्यहनन होईल, आरोप होतील. अपमान केले जातील. टीका सहन करावी लागेल. पण हे सारे सोसून काम केले, करीत राहिले तरच असहाय्य दुबळ्या स्त्रीचे चित्र पुसले जाऊन खंबीर, करारी, स्वाभिमानी स्त्रीचे प्रसन्न असे नवे चित्र रेखाटता येईल. पुनःपुन्हा तुडवली जाऊनही उभी राहत आपल्या असण्याची घोषणा करणारी ताठ कण्याची हरळीसारखी स्त्री ही येत्या काळात स्त्रियांची आयडॉल असली पहिजे. आमच्या आदिवासी स्त्रिया गवतसदृश्य वनस्पतीला उगीच मैत्रीण (गोईण) म्हणत नाहीत. सुख-दुःखात मदत करणाऱ्या मैत्रीण मैत्रिणींइतकेच महत्त्व या वनस्पतींचं त्यांच्या जीवनात असते.
मित्रांनो, माझ्यासारखा कवी, लेखक जेव्हा एका मोठ्या अवकाशाच्या कॅनव्हॉसवर छोट्या-मोठ्या नोंदी घेऊ पाहतो तेव्हा भोवतालाबद्दल त्याला काही एक प्रश्न पडतात. त्या प्रश्नांच्या उत्तराचा शोध घेण्याचा माझ्या अल्पमतीप्रमाणे मी इथे प्रयत्न केला आहे.
मला जाणवलेल्या आजच्या परिस्थितीला अनुसरून, मला आलेल्या कडू-गोड अनुभवावरून ही माझी मते तयार झाली आहेत. मला अजूनही लख्खपणे आठवतेय पाच-सहा वर्षांची चिमुरडी पोर चार आण्याच्या लिमलेटच्या गोळ्या हातात गच्च धरून दगडधोंड्यांच्या गल्ली-बोळातून धावताना ठेचाळून रक्तबंबाळ होणारी... सतत काही तरी शोधण्यासाठी धडपडणारी कधी रंगीबेरंगी नाजूक सुवासिक फुले तर कधी रंग उडालेल्या जाड्याभरड्या आयुष्याला रंगविताना इवली इवली मेंदीची पाने... कधी भोळ्याभाबड्या लोकांच्या श्रद्धांची जागा तर कधी अभावग्रस्त वास्तवात हिरवळीची जागा! आपल्या कलागुणांच्या माध्यमातून जगावर अधिराज्य गाजवणाऱ्या थोर माणसांबद्दल मनात प्रचंड कुतुहल घेऊन ही पोर सतत कशाच्या तरी शोधात होती. तिचा 'तो' शोध अजूनही संपलेला नाही. हा ! तिच्या फ्रॉकच्या खिशात अनुभवातून शहाणपणाच्या मिळालेल्या चार-दोन गोष्टी मात्र नक्कीच जमा झालेल्या आहेत, हे मात्र खरे! आपल्यासारख्या गुणीजनांच्या, ज्ञानीजनांच्या सभेत शेवटी इतकेच म्हणेन,
चांदणे नेसून आले दुःख माझे कोवळे
मांडले मी काळजाच्या । अक्षरांचे सोहळे...
धन्यवाद!

# जीवनाचा प्रवास


दुशांत बाबुराव निमकर
संपर्क क्र. 9765548949

आधुनिक केसरी

**जीवनात जगलेल्या प्रत्येक क्षणाच्या आठवणी म्हणजे अथांग सागर..जीवनातील कडू-गोड आठवणींचा खजिना. एकमेकांवर दोषारोप करून इतरांपेक्षा आपण वेगळे असल्याची भावना निर्माण करणे. यात आपण किती वर्षे जगलो, यापेक्षा कसे जगलो याला खूप महत्व आहे. जीवनात अनेक गोष्टीला,समस्येला मित्र मंडळींच्या मांडीयाळीत जगत असतो. कुणाशी बोलतांना वा वागतांना कोण कसले वागले हे सर्व कळत असते पण एखाद्याने आपल्याशी वाईट वृत्ती ठेऊन कुटनीती वापरली तरी या साऱ्या जीवनातील प्रवासाची दखल निर्माता घेतच असतो त्यामुळे जीवनाचा प्रवास संपला तरी कायमस्वरूपी आपल्या जगण्याचे विचार इतरांना प्रेरणादायी ठरेल अश्याप्रकारे जीवनाचा प्रवास असायला हवा तेव्हाच माणूस म्हणून जगण्याचा सार्थ अभिमान आपल्याला मिळेल यात शंका नाही.**

खरे तर पृथ्वीवरील प्रत्येक जीवाच्या जीवनाच्या प्रवासाची सुरुवात आईच्या उदरापासूनच सुरू होत असते. आईला या साऱ्या आनंद यातना जाणवत असते पण पोटात वाढणाऱ्या गर्भाला मात्र पुसटशी कल्पना देखील नसते. जेव्हा जन्म म्हणून पृथ्वीवर आल्यावर असलेल्या परिस्थितीशी जीवन जगण्याची धडपड चालू असते. उदरात असतांना असलेला प्रवास हा आईच्या आधाराने पूर्णतः चालत असतो तर बालपणाचा पूर्व कालखंड देखील आईच्या अमृतरुपी दुधाचे प्राशन करीत होत असते.जीवनाच्या प्रवासातील हा सुखद-दुःखद घटनेचा प्रवास असतो. दुःखद यासाठी म्हणेन की, जन्म होत असतांना आनंदरूपी यातना, वेदना सहवत नसतांना देखील आनंदाने स्वीकारत असते त्यामुळे आईची माया, ममता कधीही विसर न पडणारा अनुभव आईला मिळत असतो. जन्मानंतर वयाच्या शाळेत जाईपर्यंत देखील अतूट जोड दिसून येते.त्यानंतर जीवनाच्या प्रत्येक प्रवासात निस्वार्थी भावनेने साथ देणारी 'माऊली' म्हणजे आईच असते.
जीवनाचा प्रवास करीत असतांना आपल्या अवतीभवती कुटुंबातील प्रत्येक सदस्य,रक्ताचे नाते नि शेजारची माणसे यामुळे आपल्या जडणघडणीत फरक पडत असतो.
बालपणातील खेळ, गमती-जमती, मित्रपरिवार यांच्याशी खेळले गेलेले मैदानी खेळ, कधी रुसवा-फुगवा देखील जीवनातील प्रवासाचा भाग असतो.वडीलधाऱ्या मंडळींची आज्ञा पाळायला हवी, त्यांचे मोलाचे सहकार्य लाभत असते.जीवनात आपल्याला चांगले संस्कार मिळावे यासाठी आजी-आजोबा यांच्या मुखातून निघालेल्या संस्कारमय कथा या पुढील जीवनात प्रेरणादायी ठरत असतात.जीवन जगत असतांना अनेक चांगले-वाईट अनुभव आपल्याला मिळत असतात.अनुभवातून माणूस शिकत जातो.बालपणीचा उंबरठा ओलांडल्यावर शाळा,विद्यालय,महाविद्यालय यातून ज्ञानाचे डोज पाजण्यात अग्रेसर असणारे गुरुवर्य यांना देखील महत्वाचे स्थान जीवनाच्या प्रवासात देणे अगत्याचे आहे.
आपल्याला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जायचे असल्यास प्रवास हा करावाच लागतो.तात्पुरता प्रवास असला तरी तेथे मिळणारी माणसे ही कायमस्वरूपी आपल्याशी राहीलच हे सांगता येत नाही कारण ज्यांचा जिथे थांबा असतो त्या ठिकाणी थांबवेच लागते.अगदी त्याचप्रमाणे जीवनाचा प्रवास असतो. जन्म-मृत्यू मधील अंतर म्हणजे जीवनाचा प्रवास म्हटल्यास चुकीचे होणार नाही.जीवन म्हणजे सायकलच्या चाकाप्रमाणे आहे.सायकलचे चाक केव्हा पंक्चर होईल हे सांगता येत नाही,तसेच कधी स्फोट होईल हे ही सांगता येत नाही.अगदी तसेच मानवाची जीवन श्रुखलेचा प्रवास कधी थांबणार हे कोणालाच माहिती नसते.जीवनाचा प्रवास हा संघर्ष गाथा म्हटलं तर चुकीचे होत नाही.प्रत्येक व्यक्तीला वा जीवाला जम बसविण्यासाठी संघर्ष करावाच लागतो.आलेल्या संकटांना तोंड देऊन जीवनाचा प्रवास गाडा हाकावा लागत असतो.जीवनात काही मोजकेच प्रवासी आहेत की,जे तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेले आहे त्यांनाच फक्त संघर्ष न करता आपोआप मिळत असते तेव्हा अधिकाधिक उधळपट्टी न करता



त्याला वाढ कशी करता येईल याचा विचार करायला हवा. तरुणपणात शिक्षण पूर्ण करून नोकरीची अपेक्षा असतेच.नोकरी जरी मिळाली नाही तर उदरनिर्वाहासाठी कोणता ना कोणता रोजगार जीवनात करावेच लागते कारण वय झाल्यावर विवाह संस्कारात अडकल्यानंतर संसार चालविण्याची जबाबदारी येऊन पडत असते त्यामुळे जीवनाचा गाडा हाकत असतांना वेगवेगळ्या टप्प्यावर वेगवेगळ्या भूमिका पार पाडावे लागते. मुलं झाल्यानंतर त्यांचे शिक्षण,स्वतःचे आरोग्य जपण्यासाठी शारीरिक, मानसिक योगा हा देखील जीवनाचा प्रवास आहे. जीवनातील प्रवासाचा शेवटचा टप्पा म्हणजे म्हातारपण.. म्हातारपण हा देखील बालपण आठवण्याचा कालखंड आणि पुन्हा बालपण आल्याचा अनुभव मिळत असतो. जीवनात जगलेल्या प्रत्येक क्षणाच्या आठवणी म्हणजे अथांग सागर.. जीवनातील कडू-गोड आठवणींचा खजिना. एकमेकांवर दोषारोप करून इतरांपेक्षा आपण वेगळे असल्याची भावना निर्माण करणे. यात आपण किती वर्षे जगलो, यापेक्षा कसे जगलो याला खूप महत्व आहे.जीवनात अनेक गोष्टीला,समस्येला मित्र मंडळींच्या मांडीयाळीत जगत असतो. कुणाशी बोलतांना वा वागतांना कोण कसले वागले हे सर्व कळत असते पण एखाद्याने आपल्याशी वाईट वृत्ती ठेऊन कुटनीती वापरली तरी या साऱ्या जीवनातील प्रवासाची दखल निर्माता घेतच असतो त्यामुळे जीवनाचा प्रवास संपला तरी कायमस्वरूपी आपल्या जगण्याचे विचार इतरांना प्रेरणादायी ठरेल अश्याप्रकारे जीवनाचा प्रवास असायला हवा तेव्हाच माणूस म्हणून जगण्याचा सार्थ अभिमान आपल्याला मिळेल यात शंका नाही.

## माणुसकी

अटळ  आहे  मरण ही भीति व्यर्थचि जाणा
मरावे परि किर्तीरूपे उरावे, ठेवा हा बाणा
तुजसाठि मरण ते जनन
तुज सकल चराचर शरण
स्वतःच करिती पशुतुल्य भक्षण
माणूसच मरतो, करीत माणुसकीचे रक्षण

या उदारतेची करि सरस्वती वाखाणणी
त्या उदारतेची कृतज्ञता स्वीकारते धरणी
त्या उदारतेचा महिमा सदैव जिवंत राहील
आणि सारेविश्व त्या उदारांची पूजा करील
अखंड आत्मभाव  जगात भरून उरला.
तो माणूसच माणुसकीसाठी मेला.

बुभूक्षित रंतिदेवांनी आपले ताटही दिले
आणि दधीचीनीं परमार्थासाठी हाडे दिली
उशिनर क्षितीशनेही स्वतःचे मांस दान केले
आनंदाने वीर कर्णाने आपली चामडीदान दिले
मग अशाश्वत शरीरासाठी शाश्वत आत्मे का घाबरतात
करीत माणुसकीचे रक्षण माणसेच मरतात

सहानुभूतीची गरज आहे, ते व्यक्तिमत्व आहे महान
प्रतिपक्ष  बुद्धाच्या दयेच्या प्रवाहात जातो वाहून
नम्र जनता अहंकारापुढे कधीही झुकत नाही
सोशिक धरणी  कोणाला वश होत नाही
अहाहा! तो परोपकारी उदारही  आहे
माणुसकीसाठी मरणारा माणूसच आहे

"माणसाला   बांधव माणणे यात मोठे पण आहे.
पुरणपुरुष  स्वयंभू ब्रम्हा चेही मोठेपण आहे.
फलानुसार, कर्माचे बाह्य भेद नक्कीच आहे.
पण अंतरंगात अस्सल वेद आहेत.
भावाने भावांच्या दुःख दुर न करणे हे केवळ दुर्दैव आहे.
माणुसकीसाठी मरणारा माणूसच आहे

कविः आहेर  वा.र.नासिक 9958782982

## निसर्ग म्हणजे शाळा

निसर्ग म्हणजे
बिनभिंतीची शाळा
ना ईथे पुस्तक
ना ईथे फळा

मुंगीपासून मिळते
कष्टाची शिकवन
इवल्याशा तोंडी आणते
अन्नाचा कण

कुत्र्यापासून शिकूया
प्रामाणिकपणाचा धडा
घराची राखन करताना
चोरांचा लावतो छडा

एकजुटीने पोळे बनवूनी
मधमाश्या करी कष्ट
पाहून त्यांची चिकाटी
आळस होई नष्ट

भल्या पहाटे
कोंबडा आरवतो
वेळेची महती
सर्वांना सांगतो

वृक्ष देतो छाया
उन्हाच्या कळा सोसूनी
परोपकार करा नित्य
जणू सांगतो हसूनी

– रवींद्र व्ही. चालीकवार
मो.9011559106



## ती स्त्री आहे म्हणून

हॉलमध्ये पुरुषांची चर्चा कुंकू
आणि टिकली वर रंगलेली
आणि किचनमध्ये ती स्वयंपाकात
रमलेली

खरंतर स्वयंपाकघरातला आक्रोश
हंबरडा होऊन कधी बाहेर आलाच
नाही उंबरठा ओलांडून ती गेली
खरी पण,जाताना उंबऱ्यावर श्वास
ठेवूनच बाहेर पडली

ती गुदमरली ती दमली ती थकली
पण पुन्हा आई होऊन रमली हे ही
तितकंच खरं कुणी तिला बुरख्यात
लपवली तर कुणी पदराखाली
झाकली पण तिने तिचा गर्भ
बदलला नाही बुरख्यातली ती माँ
झाली पदराखाली आई झाली
पण तिचं बाईपण संपलं नाही

तुमच्या मात्र मिशा वाढल्या
आणि कुणाच्या मिशी विना
दाढ्या वाढल्या या मिशा आणि
दाढ्या तुमचा धर्म घेऊन वाढल्या
आणि तिने मात्र ममतेचा झरा
अजूनही आटू दिला नाही

ती आजवर गुलाम म्हणूनच
झिजली पण, अजून कुठवर
झिजेल याचा अंदाज नाही
पण एक मात्र लक्षात ठेवा
ती आहे म्हणून मी आहे
तुम्ही आहात आपण आहोत
आणि हे जग सुद्धा
दंगलकार नितीन चंदनशिवे
मु.पो.कवठेमहांकाळ
जि.सांगली
संपर्क 7020909521

## सिमेंटच्या घरात

झोप कशी येते तुला
सिमेंटच्या घरात
माय  थंडीने मरतेय
झोपडीच्या दारात
तू बघतोय पाऊस बसून
खिडकीत मायबाप ओलेचिंब
गळक्या झोपडीत
विसरला कसा आई बाबाचे
उपकार उभ्या जीवनात
बापानं वाहिला भार
फाटकी बंडी होत त्याच
फाटक धोतर पोरा  का
केलया त्याच्या जीवनाच
मातेरं नऊ मास मायेन उदरात
वाढविले मीठ भाकर खाऊन
तुला मोठे हो केले
आज तिच्या नयनी अश्रू हो
सोडविले पोटच्या गोळ्याने
तिला  घरात वेगळे केले
माय करती मजुरी, बाप
वळतोय गुरं पोर  रे आरामात
फिरताय बिनघोर पोर असती
म्हातारपणीचा आधार
जन्मदात्यास नाक काढू हो
घराबाहेर माय बाप असती ती
हो देवासमान नका देऊ कष्ट,
त्यांचा ठेवा हो सन्मान
पोर तुमची देखती ठेवुनी
उघडे नयन देव न करो तुम्हा
कधी हो असा दिन झोप कशी
येते तुला सिमेंटच्या घरात
माय बाप थंडीने मरताय
झोपडीत
संदिप नानासाहेब वाकडे
मो. 9766992776

## 'सुसाट'

वाहत्या नदीशेजारी स्तब्ध एक
काठ आहे
अस्थिर मनाला सत्य तोच पाठ
आहे
विरळ झाडांपुढे पिकांचा मळा
दाट आहे
नम्र इसमाच्या इभ्रतीचा बाणा
ताठ आहे

अर्धा पेला पाण्याचा अर्धा हवेने
काठोकाठ आहे
विचारांच्या सकारात्मकतेची
हीच खरी लाट आहे

मातीने बनलेला मातीतच
मिळणारा माठ आहे
क्षणभंगुर जीवनाचा हाच खरा
थाट आहे

निळे निळे दिसणारे आभाळ
अफाट आहे
वाढत्या कर्तृत्वउंचीने
जीवनगाडी सुसाट आहे

मनोज शोभाबाई प्रकाश
अग्रवाल, औरंगाबाद



## ओला दुष्काळ...!

चोहीकडे पडला पाऊस भरपूर,
ओढे- नदी, नाल्यांना आला महापूर.

सडक-रस्ते, पुल गेले हे पाण्याखाली,
प्रवास करणाऱ्यांची तारांबळ झाली.

यंदा आली होती सगळी पिके चांगली,
त्यात काही पिके पाण्यावर तरंगली.

अगोदर कोरोना, आता आभाळ फाटले,
पुरग्रस्तांच्या डोळ्यामध्ये अश्रु दाटले.

महापुराने चिकार नुकसान केले,
माणसे- गुरेढोरे पुराने वाहून नेले.

दयाघना, आता बरसने बंद कर,
राहण्यास बांधु दे, घर आणि छप्पर.

हे देवा ! असा कोणता केला होता गुन्हा,
अशी संकटे पाठवु नको, पुन्हा-पुन्हा...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४



## एकटा

कोण कुठला कसा आहे
बोलणारा एकटा, जगात
या रामाविना कोण जगला
एकटा, तुम्हासवे असतानाही
पडेल कोण एकटा,
रामराया सर्वस्व असा देव
जाणे एकटा, आयुष्याच्या
वाटेवरती पथीक असतो
एकटा, सोबत ती क्षणीक
असली तरी शेवटी एकटा,
एक एकटा एक एकटा
म्हणे कोण एकटा, गर्दीत
राहून निजणारा तो मुडदाच
असे एकटा, एक शरीर एक
आत्मा चितेवर त्या एकटा,
मोक्षासाठी वाट धरणारा
तोच केवळ एकटा, जाता
येता राहणारा उरलेला
एकटा, रामनाम साधन आहे
मानणारा एकटा
– स्वरानंद



## सोंगट्याचा खेळ

काळ्या मातीत पेरतो
काळ्या बियासंगे मन
औतामागे गुणगुणे
सपनातलं हिरवं गानं

रोज मातीत खेळती
हट्टी अंगणात पोरं
सारे जीवन कष्टात
जशी राबताती ढोरं

गाभुळल्या मातीमध्ये
मिळे पाण्याचे तुषार
हात जोडूनिया निघे

हिरवे नाजूक अंकुर
हिरवे अंकुर पाहुनी
एकटा मनात नाचला
खर्च वजा शिल्लकीचा
पाढा मनात वाचला

जुगाराला नाही पाढा
नसतो आकड्यांचा मेळ
आसमानी सुलतानी
शेती सोंगट्यांचा खेळ

डॉ. शिवप्रसाद मीननाथ घोडके
पालखेडकर, ता. वैजापूर





## मन चक्षु ..

सजीवा पेक्षा भली असे पांढरी  काठी
बने  लाडका सखारे अंध व्यक्तीसाठी

जणू कुटुंब  सदस्य सदैव  राहते  पाठी
स्वावलंबन जागृत मिळते  दिव्य  दृष्टी

एखादअवयव नसे कशास व्हावे कष्टी
भविष्य  लिही नवे काळीभोर  रे पाटी

काही कमी जास्ती असे हरेक ललाटी
कोण  कसा योध्दा ते पाहतो जगजेठी

जागी करे  डोळसा घणाण वाजून घंटी
दोष देती नशिबास काही  अशी
करंटी

कुणी नाही सर्वक्षम अहंकारवृत्ती
खोटी पहावे अंधारापुढचे उघडा
मनाची ताटी
– हेमंत मुसरीफ पुणे
973030696.

## ॥ शब्द गंध ॥

ऐहिक साऱ्या त्या सुखांना
अलगद मागे सारले
अन् शब्दातीत आनंद मी
शब्दात शोधत राहीले...

अंतरीच्या तिव्रं आर्ततेला
अंतरातच गाढले बोचऱ्या या भावनांना
मनमंदिरी बंद केले...

लडिवाळशां शब्द नगरी जाऊन आता
राहिले सुख दुःख जाणिवा त्या
पाठीचं सारे सोडले...

माझे ज्यांना म्हणत होते  सारे परके ते
निघाले गुदमरल्या जीवनास या
मीच माझे सावरले...

सरत आले श्वास अवघे आयुष्य हे
सांजावले शब्द फुलांचा गंध ठेवूनी
आनंद वाटेवर निघाले...
©® ज्योती ज.आळंदकर
लातूर

## प्रीत

तुझी माझी प्रीत सजना
सांग कधी कळणार
तुला,
वेडावणाऱ्या
वाऱ्यावरती
उमलणाऱ्या प्रीत फुला
.......१

चंद्र सुर्य नभी शोभती
धरती अवनिची जोडी
तुझी माझी प्रीत सख्या
लावीली मनांस गोडी
.......२

शशीच्या शीतल
छायेत
प्रीत फुलली जीवनात,
अजुनही आठवांच्या
बहरती तुझ्या प्रेमात
......३

धुंदीत तुझ्या बहरल्या
भाव प्रीतीचे हृदयातले

कळल्याच नाही कधी
तुला
शल्य माझ्या
मनातले........४

नाही कळली प्रीत
माझी
कळली नाही तुझी
रीत ,
होणार कधी सांग
सख्या
आपल्या प्रीतीची जीत
......५

सौ. सुवर्णा पवार ,
इचलकरंजी

## बांधलो मी वेसणीला

बांधलो मी वेसणीला, खूप झाले दिस
त्याला खूप केला यत्न जरी,सोडविण्या
वेसणीला.

नाही सुटली अजून, गाठ भारी वेसणीची
नाही तोडून तुटली, दोरी भाळी शोषणाची.

गेली अर्धी जिंदगाणी,उरे दिस आता किती
आयुष्याची माती होता,तुडविल्या गेलो
किती.

किती पडून उठावे,किती उठून लढावे?
शीण आला जगण्याचा,तरी युद्ध रोज नवे.

मातीमध्ये मरून ही,का नव्याने अंकुरावे?
सुर्यासम रोज इथे, सांगा मीच का उगावे?

अन तापून जगी या,दूत उजेडाचा  व्हावे
आलो जन्मास म्हणुनी,काम पुण्याचे
करावे.

ज्ञानेश्वर गायके, कन्नड
मो. ९४०३३८४८८९

तुकारामनीती
भाग 32

# नाहीं आम्हां ज्यावें मरावें लागत



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**जिवंतपणी ज्यांच्या लेखणीने त्यांचा भोवताल भारावून गेला आणि उपेक्षितांपासून ते प्रस्थापितांपर्यंत ज्या शब्दांनी नखशिखांत क्रांती घडवून आणली असे अनुभूतीपूर्ण लोककवी म्हणजे संत तुकोबाराय! तुकोबा म्हणजे कुणाच्याही पायावर तुकणारे, झुकणारे अतिसामान्य व्यक्तिमत्व! तुकोबा म्हणजे कुणीही हातात घेऊन स्वच्छंदाने वाजवावा असा टाळ, आपल्या मांडीवर प्रेमाने ठेवून सुमधुर टणत्कार काढावा अशी वीणा आणि आपल्यासमोर ठेवून मस्त तालात वाजवत दंग व्हावे असा सुरेल मृदंग! त्यामुळेच त्यांच्या एकनिष्ठ शिष्या बहिणाबाई शिऊरकर तुकोबांविषयी तुकोबांचे हात लिहिताती जे जे। ते ते सहजे पांडुरंग।। बहिणी म्हणजे लोक बोलती सकळ । तुकोबा केवळ पांडुरंग।। असे लिहून लोकांना तुकोबांच्या चरित्र-चारित्र्याचे संक्षिप्त दर्शन घडवतात. आपल्या जगण्या-मरण्याने अनेकांना हलवून-हेलावून गेलेले, अजून आपल्यामध्ये अभंग शब्दरूपाने नित्य प्रवाही असणारे तुकोबा!**

काळ अत्यंत खडतर, तरीही त्यांनी तत्कालीन व्यवस्थेवर आपल्या चरित्र आणि शब्दप्रहारांनी प्रस्थापितांना नामोहरम केले. प्रस्थापितांनी तुकोबांना लाठ्या-काठ्यांनी मारले, त्या माराला तुकोबांनी आपल्या जीवन आणि शब्दांनी घायाळ केले! शेवटी काठ्यांचा मार विरून गेला आणि शब्दांच्या वाराचा गाथा झाला! अंगावरच्या माराने तुकोबांचे शब्द अजरामर झाले, एवढेच काय मारणारे सुद्धा त्यांच्यासोबतच अजरामर झाले! ही तुकोबांची विमलकीर्ती केवळ त्यांच्या काळापुरती सीमित न राहता तिने नंतरच्या अनेक शतकांचा तळ अक्षरशः ढवळून काढला! स्वयंघोषित विद्वजनांना सुद्धा त्यांच्या अभंगांवर लिहायला वाटणे हा तुकोबांचा निर्वाणोत्तर असणारा निखळ-निका, स्वच्छ परमार्थ! याचाच परिपाक म्हणजे १६५० साली निर्वाण झालेल्या तुकोबांच्या अभंगांनी पांडुरंग बापू जोशी यांना प्रभावित करून जोशींनी सलग १८४४-४५ सालातज्ञानचंद्रोदयया मासिकांत तुकोबांचे पत्रिकेचे ६५ आणि वस्त्रहरणाचे २५ अभंग प्रकाशित केले. वारकऱ्यांना मुखोद्गत असलेले आणि काही प्रमाणात मूळ लिहिलेले अभंग तुकोबांच्या निर्वाणानंतर तब्बल दोनशे वर्षांनी पुन्हा लोकांसमोर यायला लागले.

त्यानंतर मात्र एक एक संशोधकाने तुकोबांच्या अभंगांचे शोधन करायला सुरु केले. तुकोबांचे १८७३ साली अभंग प्रकाशित करतांनानिबंधमालाच्या अंकात महाराजांविषयी कृतज्ञता व्यक्त करतांना श्री कृष्णशास्त्री चिपळूणकर लिहितात, "असें होतां होतां कांही काळानें...जो बिचारा शूद्रकवी आपल्या लंगोटेबहादर व घोंगडीवाल्या भक्तमंडळीतच काय तो रमायचा, किंवा फार झालें तर हरदासांच्या कथाप्रसंगी सत्कार पावायाचा, त्यास एकाएकी आरबी गोष्टीतील अबू हसनासारखें मोठें ऐश्वर्य प्राप्त झाले! इंदुप्रकाश मुद्रणयंत्रालयांतील मुक्ताफळें आंगभर उधळलेली, महावस्त्रांत शरीर लपेटलेलें, व युनिवर्सिटीचे शानदार झगे घातलेले तरुण विद्वान डोक्यावर मोर्चेले उडवताहेत व चिवऱ्या ढाळताहेत अशा थाटानें तुकाराम महाराज फारा दिवसांनी आपल्या अभिधानाची सार्थता पावून विराजमान झाले. महाराष्ट्र देशाच्या पहिल्या अधिपतीनें पाठवलेलें ऐश्वर्य परत लावून वरील कवीनें जी आपली हानी करून घेतली होती, तिची भरपाई दोन शतकांनंतर त्याच देशाच्या परद्वीपस्थ प्रभूनें करण्याचे मनांत आणलें की काय कोण जाणे! असो; झाली ती गोष्ट बरीच झाली." अशाप्रकारे तुकोबा पुन्हा वाचकांच्या दृष्टीस पडू लागले. त्यानंतर अनेकांना तुकोबांच्या अभंगांनी भुरळ घातलेली पहावयास मिळते.



जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा परमार्थ आणि भक्ती किती सरळ आणि दिव्यत्वाची प्रतीती देणारी होती ( ?) हे त्यांच्या अनेक अभंगांवरून दृगोचर होते. ते सहजतेने वाचक आणि श्रोत्यांच्या मनी-मानसी उतरतात, याचे कारण म्हणजे तुकोबा आपले शब्द अनुभव लीलया आणि सर्वांना समजेल अशा भाषेत व्यक्त होतात. त्यांना आपल्या अभंगात

**कांहींच मी नव्हें कोणिये गांवींचा । एकट ठायींचा ठायीं एक ॥१॥**
**नाहीं जात कोठें येत फिरोनियां । अवघेंचि वांयांविण बोलें ॥धृ॥**
**नाहीं मज कोणी आपुलें दुसरें । कोणाचा मी खरें कांहीं नव्हे ॥२॥**
**नाहीं आम्हां ज्यावें मरावें लागत । आहों अखंडित जैसे तैसे ॥३॥**
**तुका म्हणे नांमरूप नाहीं आम्हां । वेगळा या कर्मा अकर्मासी ॥४॥(शा.अ.गाथा अ.क्र. ५५६)**

असा सरळ-साधा परमार्थ आपल्या लेखनातून लोकांसमोर आणायचा होता. त्यांना कुणाकडून काहीच अपेक्षित नव्हते. अत्यंत कमी वयात समाजाच्या सर्वच स्तरातील विविधांगी अनुभव घेऊन ते समृद्ध झाले होते, परिणामी ते वरीलप्रमाणे अभंग लिहू शकले. एखादा माणूस का लिहितो? आजकाल लिहिण्यामागे अनेक कारणे आहेत. मात्र तुकोबा आपले अभंग ठरवून लिहित नसावेत, कारण "आपुलिया बळे नाही बोलवत। सखा भगवंत वाचा त्याची॥" असे चरण वाचल्यानंतर त्यांचे लेखनामागील उद्देश उघड होतात. ते लिहित नव्हते तर त्यांची कविता "आली मुखावाटे अमृतवचने" या न्यायाने सहजच बाहेर येत असावीत. आपल्या अभंग लेखनाच्या किंवा गायनाच्या होणाऱ्या कोणत्याही परिणामाशी त्यांना काहींच सोयिर-सुतक नसायचे. कडेकोट चातुर्वर्णव्यवस्था, यवनांच्या सत्तेत नुकतीच पाळंमुळं धरणारी शिवशाही आणि समाजमनात धर्ममार्तंडांचा प्रचंड दरारा! अशा खडतर परिस्थितीत तुकोबा क्रांतिकारी शब्द बोलतात-लिहितात. कीर्तनातून तत्कालीन व्यवस्थेशी दोन हात करण्याचे धाडस दाखवतात. खरंच हे सामान्य माणसाचं काम नाही! जी माणसं घरावर तुळशीपत्र ठेवून बाहेर पडतात तीच वेडी माणसं असं लिहिण्याचं धाडस करू शकतात! त्यामुळेच तुकोबा या अभंगात मी काहीच नाही, कुणीही नसून मला नाव-गाव काहीही नाही. मला जात वगैरे काहीही नसून माझ्यासोबत माझ्या परिचयाच्या संदर्भाने कुणीही बोलू नये. मी कुणाचा नाही आणि कुणी माझे नाही. मी मरणारही नाही आणि मी जिवंतही नाही. असेच माझे अखंड जीवन असून मी दिसतो हा खरा नाही. मला कोणते नाव नाही आणि माझी सर्व कर्म अकर्म झाली आहेत. माझ्या कोणत्याही कामाची कुणीही नोंद घेऊ नका. कुणीही माझी ओळख ठेवू नका. एवढ्या प्रचंड टोकाच्या अवस्थेला पोहोचलेल्या तुकोबांना कुणी मारले काय किंवा त्यांचे कुणी पूजन केले काय? याचा त्यांना काहीच फरक पडत नव्हता. बहुतेक यालाच स्थितप्रज्ञ अवस्था म्हणता येईल?

वाचक-सृजन-सज्जनांनो, आज आपण लोकशाहीची पंचाहत्तरी मोठ्या जल्लोषात घरोघरी तिरंगा लावून साजरी करत असतांना तुकोबांएवढ्या परखड, रोखठोकपणे लिहू शकतो का? समोर, भोवताल अन्याय-अत्याचाराचे तांडव सुरु असतांना उच्चविद्याविभूषित माणसं मुग गिळून गप्प आहेत. स्वातंत्र्यात असूनसुद्धा तुकोबांसारखे कुणीही लिहू अथवा बोलू शकत नाही. बोलले-लिहिले म्हणून तुकोबांना मारले, आजही थोड्याफार फरकाने तेच सुरु आहे. हल्ली तुकोबा कधी कधी फारच त्रास देऊन जातात. त्यांचं जगणं-लेखन वाचून मन विषन्न होतं. आपला आपल्यालाच प्रश्न सतावतो, "तू का लिहितोस?" भोवताल मिडीयावर खूप लेखक-कवी क्रांतीची, बदलाची भाषा करतांना वांझ झाडासारखे भासतात. त्यांचं आणि माझं मलाच हसू येतं आणि रडूही येतं! लिहिण्याचा उद्देशच संपला आहे! भोवताल माणसं केवळ जिवंत आहेत. त्यांच्यातील स्वातंत्र्य-क्रांती-धाडस केंव्हाच मेले आहे! सगळी माणसं मृतप्राय होऊन भुकेच्या दावणीला करकच्चून बांधलेली जनावरं झाली आहेत? हे खूपच भयंकर आहे! जो तो फक्त पैसा, सत्ता या मागे रात्रंदिवस धावतांना आपण कुणाला तुडवून पुढे जातोय याचे भान ठेवतोय का? सत्य, अहिंसा, नीती, धर्म, मानवता, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी फक्त कागदावरच शिल्लक आहे! बरेच माय-बाप वृद्धाश्रमात रडताहेत, काहींची वाटणी झाली आहे तर अनेकांना रस्त्यावर सोडून दिले आहे! सर्वत्र भयंकर परिस्थिती आहे! खरंच, हे चित्र बदलेल का? खरंच क्रांती असते का? खरंच बंद, बंड, संप आणि न्यायालयात न्यायाला न्याय मिळतो का? न्यायाला न्याय मिळेल का? का सगळ्यांचीच अवस्था बलात्कार झालेल्या म्हातारी सारखी झाली आहे, जिच्यावर वयाच्या अठराव्या वर्षी बलात्कार झालेला असतांना तिला ऐंशीव्या वर्षी न्याय मिळतो. खरंच हा न्याय आहे का? का न्यायाच्या नावाखाली घोर अन्याय? न्यायालयाचा जय जय कार असो! हे आणि यापेक्षाही भयंकर आहे वर्तमान!

अशा या खडतर काळात तुकोबा आणि त्यांचे अभंग कुठेतरी सुकाणू म्हणून बुडत्याला काडीचा आधार देतांना दिसतात. त्यांचा संघर्ष, जीवन आणि त्यांचे लेखन सर्वांना जागृत करून जाते. त्यांचे लेखन त्यांनाही अनोळखी करून टाकते. असे असले तरी कुठेतरी आशेचा किरण जिवंत आहे. मित्रांनो, नियती कुठेतरी शिल्लक आहे. त्याचाच परिपाक म्हणजे माणूस अत्यंत कमी वयात जीवघेण्या, भयंकर व्याधींनी ग्रस्त आहे. अगदी तुकोबांच्या भाषेतच सांगायचे तर,
तुका म्हणे पापे । येती रोगाचीया रूपे ॥
प्रमाणे सृष्टीचे संतुलन ठेवण्याचे कार्य सातत्याने सुरु आहे. एवढं सारं असतांना, "पुढे हुशार थोर आहे ओळसा गा" प्रमाणे मृत्यु नावाचा जिवलग प्रत्येकाला भेटणार असून ज्याच्या त्याच्या कर्मांचा हिशोब तिथे नक्की होणार आहे. त्यासाठी माय-बाप वाचकांनो, तुमच्या पायांवर मस्तक ठेवून विनंती की; कुणालाही विनाकारण त्रास होईल असे वागू नका. सगळ्या जगाचे कल्याण होण्याचे "विश्वस्वधर्म सूर्य पाहण्याचे" आनंददायी, चिरस्थायी तत्व आपल्या जीवनात उतरवण्यासाठी तुकोबांच्या गाथ्यातील अभंगांचे नित्य-नित्य वाचन-चिंतन-मनन करावे. व्यसन आणि कुसंगतीपासून दूर राहून स्वतःसह आपला भवताल आनंदी ठेवण्याचा सतत प्रयत्न करूयात. यातून नक्कीच मनाला समाधान लाभून इथे प्रत्येकजण भयंकर, जीवघेण्या शारीरिक व्याधीपासून आपला बचाव करू शकेल. सगळे आनंदी होतील! असे झाल्यास तुकोबांच्या अभंगांचे आणि काहीप्रमाणात तुकाराम नीतीचे सार्थक होईल! जय तुकोबाराय!

# अश्रू....

आधुनिक केसरी



आसुसलेल्या डोळ्यांतला तो एक अश्रू च काय तो तिचा आधार होतो, तुडूंब साचलेल्या भावनांचा निचरा करून पुन्हा नव्याने उभे राहण्यासाठी बळ देऊन जातो. काल राष्ट्रीय गृहिणी दिवस म्हणून... सहज ओघळणारे दोन अश्रू पाहून मनावर आवर घालता घालता...

खरं सांगायचं तर नेहमी एक प्रश्न मनाला पडतो,का ? कशासाठी ?' ती ' लाचं का? गृहीत धरलं जातं.

बरं ठीक आहे,कर्तव्य म्हणून असेलही,पण कर्तव्याच्या पुढे जावून ही काहीतरी असते. प्रत्येक आई ,बहीण,बायको किंवा अन्य इतर नाती,अर्थात बऱ्याच स्त्रिया म्हणजे १०० टक्के नसेलही,पण तरीही...

भावनेच्या या गुंत्यात घरातल्या स्त्री ला गृहीत धरलं जातं, मुळात विचार करायचा म्हटल तर स्त्री ही पुरुषापेक्षा भावना प्रधान असते, याचा अर्थ पुरुष नसतात असे अजिबात नाही.आणि कोणालाही गृहीत न धरता कोणावर रोष ही नाही.आणि ती धरायचाही नाही. स्त्री जास्त भावना प्रधान असते असे आत्तापर्यंतच्या निरीक्षणात तरी आलेय आणि का असू नये! ही निसर्ग दत्त देणगी निसर्गाने च बहुदा दिली आहे किंवा निसर्गचक्र साठी असावी. असे मला वाटते.

पण म्हणून त्याचा गैरवापर करावा का ? गैरवापर अस ही नाही म्हणणार,पण मग हे गृहीत धरन नाही तर मग काय,आणि पुढे जाऊन मी म्हणते धरू ही द्या पण तिच्या ही मनाचा भावनांचा सहनशीलतेचा आदर किंवा विचार सर्वांनीच करायला हवा.

सहनशीलतेचा असं नाही . एक छोटे उदाहरण आहे.म्हणजे बऱ्याच स्त्रिया स्वतःच्या शरीराकडे दुर्लक्ष करतात किंवा काही कारणाने दुर्लक्ष होते. किंवा अन्य कारण असेल. कधीतरी जमेल तितकं तेवढं कोणतीही स्त्री असो किंवा बऱ्याचशा स्त्रिया प्रतिकार शक्ती ने असो नाहीतर जबरदस्तीने असो, किंवा काही कळतच नाही च्या लेबलं मध्ये फसते.आणि दुखणे अंगावर काढतात,पण एका मर्यादेपलीकडे गेल्यानंतर त्याचा अतिरेक होतो. नि मग..नी मग... त्याच्यावर तेव्हा मार्ग काढला जातो. पण त्याच्यानंतर ही प्रत्येकाच्या अपेक्षेपूर्ती अगोदर च ...प्रत्येकाची अपेक्षेच्या कटक्षाखाली पुन्हा एकदा 'ती' दबून जाते. नि मग काय..? म्हणजे पुन्हा एकदा येरे माझ्या मागल्या...

पण हे असच चालणार का ? परंपरेने म्हणा भावनेने म्हणा किंवा संस्काराच्या शिकवणी ने म्हणा म्हणजे उदाहरण म्हणून फक्त ( पूर्वी आजी आई किंवा वडील धारी माणसं एखाद्या नववधूला लग्न करून सासरी जाणाऱ्या नववधूला सांगायचे सर्वांच्या मनासारखे वागायचे किंवा कोणाला काय हवे नको ते बघायला सांगायचे .असे...) हे चांगलेच आहे,किंवा गरजेचे ही आहे, पण असा तिचा ही विचार त्या आजूबाजूच्या लोकांनी ही करायला हवा . अर्थातच यात कोणाला दोष द्यायचा नाही.

'स्त्री पुरुष समानता' असं म्हणतात ना! मग ते कितपत आमलात येते. ठीक आहे खूप स्त्रिया अग्निदिव्यातून ही जातात.अगदी थोडेफार काही केले म्हणून अग्निदिव्य झाले असे म्हणायचे नाही बोलण्याचा एक भाग म्हणून असा याचा अर्थ..पण का किती दिवस चालणार हे!

©वैशाली महाडिक
मो. ९७६७४३७९२३

आज स्त्रिया सुशिक्षित झाल्यात, कर्तुत्वाच्या उंच शिखरावर ही पोहचल्यात. पण जेव्हा मन भावनेचा प्रश्न येतो तेव्हा मात्र ...?

पण याचा अर्थ असा नाही की दुसऱ्याकडून च अपेक्षा करावी,पण निसर्गाने दिलेले हे सुंदर आयुष्य आहे.त्याचा आनंद आपला आपल्याला ही घेता आला पाहिजे. अगदीच दुसऱ्यासाठी नाही पण कधीतरी स्वतःसाठी वेळ द्यायला शिकले पाहिजे .किंवा जगायला शिकले पाहिजे. रुढी परंपरां आहेतच. तसेच नव्या जुन्याचा मेळ घालून योग्य मार्ग काढता आला पाहिजे. हे तिच्याच हातात आहे. हे सगळ तितकसं सहज शक्य नाही, पण तरीही प्रयत्न करूनच त्यावर पर्याय निघेल असे मला तरी वाटते. फक्त त्याचा अतिरेक न होता एवढेच...

खूप काही आहे,पण शब्दांनाही कोडं पडावं,असच काही... किती लिहिणार कसं लिहणार,पण...या सर्वांच्या ही पुढे जाऊन मी म्हणते जाणीव हा एक च शब्द आहे. शब्दापेक्षा ती जेव्हा आतून येईल , जाणिवेच्या एका स्पर्शातून ही तिला दहा हत्तीच बळ तिच्या अंगात संचारेल नि मग सारच कस सुखद होईल अशी अपेक्षा वाटते.

कोणी तिच्यावर लादले आहे असंही नाही म्हणणार, पण एक वाटते की अपेक्षा रुपी काट्याच्या त्या हेलातून ' ती ' मोकळी व्हायला हवी.नी मग त्याच काट्याच्या हेलातून ही एखादी वेलं...

जाणिवेच्या वेलीवर उमल नारी भावना रुपी कळी निश्चितच सुंदर असे संसार रुपी फुल उमलून स्वत्वाचा आनंद घेत इतरांनाही आनंद देईल. आणि त्याच्यावरचा अश्रुरुपी दवबिंदू सूर्याच्या सोनेरी किरणांत नक्कीच आनंदाश्रु रुपी चमकू लागेल. असे मला वाटते.

# 'शेतीमाती : बळीराजाच्या व्यथेचं महाकाव्य'



ज्ञानेश्वर गायके
मो.नं. 9403384889

आधुनिक केसरी

**'शेतीमाती' हा सुप्रसिद्ध कवी अशोकजी गायकवाड (शेतीमातीकार )वैजापूर यांचा महाराष्ट्र शासनाच्या नवलेखक अनुदान योजनेतुन प्रकाशित झालेला कवितासंग्रह. मराठवाड्यातील सदा दुष्काळाच्या छायेत असणाऱ्या वैजापूर तालुक्यातील शेती व शेतकऱ्यासोबत समाजातील विविध प्रश्नांची सखोल चर्चा करणारा चिंतनशील,आशयसंपन्न,ग्रामीण भागातील सर्व समस्या मांडणारा एकूण ७३ कवितांचा संग्रह म्हणजे अस्सल काळ्या मातीला सुटलेला मृगाच्या पहिल्या पावसाचा मृदगंध असून प्रसिद्ध कवी प्रा.डॉ.ललित अधाने यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना या संग्रहाला लाभली आहे.हा संग्रह 'अक्षर ओळख नसताना कवीच्या हाती लेखणी देणाऱ्या आईच्या वात्सल्यरूपास व तिच्या गायींच्या चरणी.. आणि..वडिलांच्या पावन स्मृतीस...सहृदयी अर्पण' केला आहे.**

पाखरांचा 'थवा' गोड रानमेवा खाण्यासाठी रानात घिरट्या घालण्यापासून ते लेकीबाळींच्या वटीत जीवाचे 'दान' मिळेपर्यंतचा कवितेचा प्रवास शेतशिवारातून गावाच्या आधुनिक काळातील अनेक समस्या, खाउजा धोरणाचे दुष्परिणाम,हुंडाबळी,गुराख्याचं जगणं,महिलांचा छळ, अडते व व्यापारी यांनी केलेली बळीराजाची फसवणूक आणि वावरात पिकलेल्या शेतमालाचे कायमच पडणारे भाव या अशा अनेक प्रश्नांचा उहापोह या संग्रहात केला आहे.

कवी भोगलेल्या वेदना मांडताना 'साप' या कवितेत आपला बाप रात्री रानात पाणी भरताना सापाच्या दंशाने जीवानिशी गेला हे सांगतो तेव्हा अंगावर काटा उभा राहतो व समस्त शेतकऱ्याचं भयंकर जिणं डोळ्यासमोर येतं.

***'रात्री भरताना पाणी***
***पायाखाली आला साप***
***गेला काळजाचा ठोका***
***ओठी आला मेला बाप.'***

हे वाचताना आजही दिवसा वीजपुरवठा बंद असल्याने रात्री भयाण काळोखात शेतकरी जीव मुठीत धरून पिकांना पाणी भरतो हे पाहून खरंच हा देश कृषीप्रधान आहे का हा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.

आज प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कार्यरत असतांना इथं खेड्याकडे 'रितं'या कवितेत सांगितल्याप्रमाणे'तिला मारले धन्याने/ घराबाहेर काढून/गाव शिकविते रितं/जगं बाईच म्हणून../'तसेच 'शिदोरी'कवितेत 'छळ सोसत जगते/ जसा ऊस चरख्यात/हाल लेकीचे पाहून/तीचं काळीज तुटतं../'तसेच 'बाईपन'या कवितेत

***' लग्न म्हणजे संसार,जीवनाचं सुख गं..***
***हे बोलायला सोपे,पचवायला विख गं..***
***डोक्यावर पदर,मर्यादाचं दुख गं..***

जगणे चुलमूल नि नवऱ्याची भूक गं...'मध्ये आज ही महिलां गुमानपणे अन्याय ,अत्याचार सोसत असल्याचे पाहून कवीमन हळहळते.

कवीची अख्खी हयात रानात कष्ट करण्यात गेली असून त्याच्या साऱ्याच पिढ्या मातीत खपल्या आहे म्हणून शेतकऱ्यांच्या समस्या मांडण्यास त्याची लेखणी सज्ज होऊन लिहिते की,'रानी उभे धसकट', 'जेव्हा फाशी सुन्या रानी, मड बापाचं झुलतं','डोई कर्जाचा डोंगर','शिळ्या भाकरीत देव', 'वरणालाच दाळ नाही','शिखार भिकार कांद्याच,पीक भावावाचून रडत','भाकरीवाचून भूक खळगी गं','दुष्काळात गाव आहे','दुसाट्याला बैलासंगे, पुन्हा माणसं जुपले','कष्ट ओढल्या देहाचा','होरपळ काळजाची,रक्त पेटता वणवा', 'हाडमासं झिजल्याने'अशा अनेक दुःखांचा डोंगर चढून कवी व्यवस्थेला प्रश्न विचारतो आहे. जसे..'लूट' कवितेत

***'तुमचं हायटेक गेलं चुलीत***
***माझ्या घामाचं दाम दया.***
***चक्राला शंभर मीच देतो***
***औकात असेल तर मातीत या'.***


हे सांगून पिकाला योग्य भाव मागतो आहे.

कवी बळीराजासाठी पावसाला विनवतो..'भर पावसात यावे सारे नक्षत्र घेऊन/शेती मातीच्या राजाला द्यावे सुख वरदान',तेव्हा संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

कवीच्या कविता रानात बहल्यामुळे निसर्गसौंदर्य झाडे,पक्षी,वेली,वारा, सांजवेळ इत्यादी रूपे 'थवा',' तळे',' पाऊस','पक्षी' या कवितेत अलगत येतात.

कवी देवाला भजतो तरी..सारं घरदार उभं/पसाभर दाण्यासाठी/देव पूजतो भजतो/तरी कृपा ही वांझोटी/. ही कटू परिस्थिती 'कृपा'या कवितेत व्यक्त करतांना जगाला ठणकावून सांगतो की,'तुम्ही खाता ती भाकर/ माझ्या रानातून येते.'/

पूर्वीचा गाव हरवल्याचे दुःख व्यक्त करतांना गावात नेमका काय फरक पडला हे..'गाव'या कवितेत सांगताना कवी म्हणतो .. 'गाव हरवला माझा/जगी डिजिटल गड्या/नातीगोती हरवली/उभ्या ढासळून गड्या'/.तसेच जातीधर्मावरून गाव वाटल्या गेला




हे सांगतांना.. 'गल्ली कॉलनी होऊन/जाच गटारीचा झाला/घरोघरी वाटे झाले/झेंडा जातीचा रोवला/'.

ह्या विपरीत परिस्थितीत ही कवीला त्याचे बालपण आठवते.जसे...'साऱ्या काटेरी वनात/गाव हरवून गेला/ काळ बालपणीचा तो/डोळे पाणवून गेला'/.

शेतकरी राजा संघटित नसल्याने त्याच्या पिकाला हक्काचा भाव मिळत नाही.कांद्याचे भाव थोडे वाढले की सर्वत्र बोंबाबोंब होते तेव्हा कवी लिहितो की,

***'कोणाला काय म्हणू,***
***आमचेच गडी शूर नाही.***
***कितीही लुटलं बेईमानींन***
***तरी हुं का चूं नाही..'***

जगाचा पोशिंदा म्हणवून घेणारा कष्टकरी शेतकऱ्यांचे वाईट परिस्थितीचे वर्णन करतांना कवी म्हणतो..

***'पायी तुटकी चप्पल***
***डोई फाटकीच टोपी'.***

त्याचप्रमाणे चांगले पीकपाणी आल्यानंतर नवं घर बांधायचं स्वप्नं पाहणाऱ्या बळीराजाचे चित्रण पुढील ओळीत येते..

***'मृग नक्षत्री आशेने,रानी लावला कापूस.***
***केली करणी भरणी, आला सुखाचा***
***हा दिस, घर नवं बांधण्याचे, स्वप्नं***
***डोळ्यात दिसते जिद्द संसाराची तिला,***
***धन्या राबण्या सांगते.'***

तसेच आईचा महिमा गाताना कवी म्हणतो की.'एक आईच म्हणून/देव दिसे मंदिरात/ तिने लावल्या दिव्याने/घरदार प्रकाशात'./ तसेच लहानपनी बाप वारल्याचे दुःख 'बाप'या कवितेत पुढीलप्रमाणे येते की..

'ज्याचा बाप गेला
***तो अर्धाच जगला.***
***जगाच्या गर्दीत***
***वनवासी राहिला.***
***वनवासी राहिला.***

तसेच 'जवाना' या कवितेत देशातील सर्वात मोठी कीड..भ्रष्टाचारावर निशाणा साधताना..

***' किती जवाना तूच होशील शहीद***
***येथे हरामी गद्दार फार झाले.***
***सीमेवरती शत्रू तू टिपशील***
किड्यांचे जाळे आत फार झाले.' हे चिंताजनक चित्र डोळ्यासमोर उभे राहते.

'मधुचंद्र' या रचनेत,स्वप्नातील त्या मधुचंद्राचं! धनी सांगा झालं काय ?हा प्रश्न खरंतर इथल्या व्यवस्थेला नागड करण्यास पुरेसा ठरतो.

कवी जरी छंद म्हणून कवितेकडे वळला असेल तरीही कविता लिहिण्याचा उद्देश 'वावर'या कवितेत दिसून येतो जसे,

***'शेतीमालाला भाव पाहिजे***
***कवितेला भाव देऊन काय उपयोग***
***कविताही रडली पाहिजे***
***तेव्हाच होईल उद्रेक***
***माझ्यातील नपुंसक विचारांचा***
***नि कष्टणाऱ्या हातांचा..'***

अन् पुढे जाऊन आपल्या विकासाच्या वाटा बंद करणारे खेकडे धरून हाणले पाहिजे असे त्यांना वाटते तेव्हा उत्स्फूर्तपणे पुढील ओळी बाहेर पडतात..

***'ढोरागुरागत कष्ट ओढून***
***जगायची पंचाईत करणाऱ्या***
***विचारांच्या खेकडांना***
***एकदा रुमण्याचा इंगा दाखवायला हवा.'***

अशाप्रकारे शेतीमातीच्या वेदना तिथं राबणाऱ्या हाताचे दुःख,मोत्यावानी येणाऱ्या पिकांचा मातीमोल भाव,माहेरवाशीण लेकीचे दुःख,बाप वारल्यानंतर आईने एकटीने हिंमतीने केलेला संसार, आधुनिक वाऱ्यामुळे बदलेलेले व जातीपातीच्या विळख्यात सापडलेले डिजिटल गाव...अशा प्रकारच्या विविध विषयांच्या कविता कोणत्याही प्रतिमांचा अतिरेक न करता साध्या सोप्या प्रासादिक भाषेत व अष्टाक्षरी छंदात गुंफल्या आहेत.

कवितासंग्रहात शेतकरी विश्वाचा समग्र धांडोळा घेतला असून कवी अशोकजी गायकवाड सर स्वतः कष्टाची शेती करत असल्याने त्यांचे अनुभव आपोआप कवितेत उतरून वाचकाला विचार करण्यास प्रवृत्त करतात.

**शेतीमाती(कवितासंग्रह)**
**कवी-अशोक गायकवाड**
**मुखपृष्ठः-जयदीप कडू**
**गमभन प्रकाशन, पुणे.**
**प्रथमावृत्तीः-ऑक्टोबर.२०१७**
**पुष्ठे-९६,किंमत-४८ रुपये.**

# संत साहित्यात व्यक्तिमत्त्व विकास



संदीप ढाकणे
मो.नं. 7588512467

आधुनिक केसरी

**मी आनंदी आहे का ?खरं तर हा प्रश्न नाही.निरंतर शोध आहे सुखाचा.आनंदी होण्यासाठी माणूस सतत धडपड करत असतो. दुःखी मन माणसाच्या अधोगतीचे कारण असते. जबाबदारी,संकट,अनारोग्य,यातना,त्रास ताणतणाव या समस्येमुळे मन दुःखी होते. पण हे दुःख तर सगळ्यांच्याच वाट्याला येते, त्यातून वाट काढली तर आनंदाची वहिवाट सापडते नसता आयुष्याची वाट लागते. अडचणी पासून कोणीही सुटलेला नाही. अडचणी शिवाय जीवन नीरस आहे. अडचणी खाली मन मारुन जगण्यापेक्षा मनाला तारुन अडचणीवर मात करण्यात खरी प्रसन्नता असते. मनावर सत्ता मिळवून अनेक साधुसंत, ऋषींमुनींनीं आपल्या समोर आदर्श प्रस्थापित केला आहे. आपले जीवन सुखकर होण्यासाठी संत साहित्याचा विशेष उपयोग होऊ शकतो.व्यक्तिमत्व विकासात संतसाहित्य एखाद्या दिपस्तंभासारखे कार्य करते.**

सुख पाहता जवा पाडे दुःख पर्वताएवढे।।

अशा अल्पअक्षरात सुद्धा जीवनात दडलेले सत्य दिसून येते. संत साहित्यातून आत्मबोध,आत्मशोध आत्मज्ञान, सामाजिक व्यवस्थापन आरोग्य यांचा विचार मांडलेला दिसून येतो. प्रापंचिक व सामाजिक जीवन जगताना मनस्थिती शांत ठेवून प्राप्त परिस्थितीला सामोरे जाण्याचे व्यवस्थापन संत तुकाराम महाराजांच्या साहित्यातून मिळते. मनाचे व्यवस्थापन हे तुकोबांनी मनाला स्पर्श करणाऱ्या शब्दातून सहजतेने समाजापर्यंत पोहोचवले आहे. चित्त समाधानी न ठेवता आणि निरर्थक चिंता केल्याने आयुष्याची चिता व्हायला वेळ लागत नाही. त्यामुळे आलेल्या संकटाचा सामना आनंदाने करून त्यावर मात करावी. यासाठी मन प्रसन्न असावे. तरच जीवनात सुख आणि समाधान प्राप्त होते.प्रत्येक व्यक्तीच्या यशाचे रहस्य शांत वृत्ती धारण केलेले मनच असते.

***ज्याचे जया ध्यान तेचि होय मन ।।"***

***आपण जसा विचार करतो तसेच आपले मन तयार होते. त्यामुळे दुसऱ्याला दोष देऊ नये. आपले गुणदोष युक्त मनच आपले सुख आणि दुःख ठरवत असते.***

***"सत्य असत्याशी मन केले ग्वाही***
***मानले नाही बहुमता ।।"***

दरवेळी बहुमत सत्य असेल असे नाही. ऐकावे जनाचे करावे मनाचे ते यामुळेच म्हटले जाते. अंतर्मनाचा आवाज प्रामाणिकपणे ऐकावा. कारण मन सत्याच्या बाजूने असते. सध्याच्या तणावग्रस्त व महामारीच्या काळात कोणता निर्णय घ्यावा. हे ठरवता येत नाही. निर्णय क्षमता कशी वाढवावी यासाठी संत साहित्य आचरणात आणणेआवश्यक आहे.

मन चिंती ते वैरी न चिंती" त्यामुळे मनावर संयम महत्त्वाचा आहे. व्यक्तीच्या विचारातूनच त्याचे वर्तन होत असते. म्हणून मनाला वाईट विचारांपासून दूर ठेवणे आवश्यक असते. सात्विक विचाराच्या वृद्धीसाठी संतसाहित्य आचरणात आणणे आवश्यक आहे. ज्ञानोबा तुकोबा हे संत केवळ दैववादी नव्हते तर पारमार्थिक क्षेत्रातही त्यांनी प्रयत्नवादला महत्व दिले आहे. संत तुकाराम महाराज म्हणतात,

**ओले मूळ भेदी खडकाचे अंग**
**अभ्यासाची संग कार्यसिद्धी।।"**

वृक्षाचे मूळ खडकाचे कठीण आवरण भेदून पुढे सरकते. कठीण खडकाच्या तुलनेत मूळ अत्यंत सामान्य व नाजुक असते. परंतु आपला मार्ग ते केवळ प्रयत्न आणि अभ्यासाच्या जोरावर शोधते. अर्थात कोणतेही अशक्यप्राय कार्य करायचे असेल तर त्याला सातत्य आणि अभ्यासाची जोड दिली तर निश्चितच यश मिळते. त्यामुळेच संत तुकाराम महाराज म्हणतात,

***"असाध्य ते साध्य करिता सायास***
***कारण अभ्यास तुका म्हणे।।"***

कोणताही विषय कितीही कठीण, अशक्य असला तरीही सातत्याने शिस्तबद्ध प्रयत्नाने शिकता येतो. खूप खतपाणी घालून सुद्धा अनेक रोपे जास्त पाण्यामुळे नष्ट होतात. पण एखादया खडकाळ माळरानावर एखादे रोपटे खडकाला भेदून आपल्या जगण्यासाठी व दुसऱ्याला सावली देण्यासाठी सतत प्रयत्न करतात. आणि यासाठी निरोगी मन असणे आवश्यक आहे. तरच व्यक्तिमत्व विकास सहज साध्य होतो. मनाचे आरोग्य उत्तम असेल तर व्यक्ती सुखी आणि निरोगी शरीर धारण करते.

संत तुकाराम महाराज आपल्या अभंगात सांगतात सर्व सिद्धी प्राप्त करण्याचे साधन म्हणजे मन आहे.मन प्रसन्न असणे आवश्यक आहे.

**मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण ।**
**मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ।।**



थांबला तो संपला या भ्रमात दुनिया सतत पळत आहे. हातात स्मार्टफोन असताना माणूस जगाशी कनेक्ट झाला. परंतु स्वतःच्या मनाशी संवाद मात्र तुटलेला आहे. "या हृदयाचे त्या ऱ्हदयाशी" संवाद घडत नाही. स्पर्धा आणि पैशाची हाव यात माणूस गुरफटून गेला आहे. कधी स्वतःच्या अपयशाने माणसे येथे खचून जातात आणि दुसऱ्याचे यश पाहूनही जळत राहतात. इतरांशी तुलना न करता आपण कसे वागतो याचा विचार करणे आवश्यक आहे. आपल्या वृत्ती अहंकार विरहीत करण्यासाठी संत एकनाथ महाराज मनाला प्रसन्न करण्याचा उपदेश करतात.

***"मन मनासि होय प्रसन्न तेंव्हा वृत्ती होय निरभिमान."*** मन प्रसन्न असेल तर वृत्ती स्थिर असते आणि अहंकाराचा लवलेश मनाला लागत नाही. अतिरिक्त अपेक्षा आणि लोभ धरला तर माणसाचे अहित होते. मनाचा समतोल, संयम व मनाला लावलेले योग्य वळण कधीही फायदेशीर ठरते. कारण मन हे अस्थिर असते. प्रकाशाच्या वेगापेक्षा अधिक मनाचा वेग आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी म्हणतात, ***"मन मोकाट मोकाट त्याले ठायीं ठायीं वाटा, जशा वाऱ्यानं चालल्या पान्यावऱ्हल्यारे लाटा."*** अशा सतत धावणाऱ्या मनाला प्रसन्न कसे करावे. आपल्या क्षमता जाणून घेतल्या पाहिजे. सकारात्मक विचार करावा. ज्याची जशी श्रद्धा तसे तो बनत जातो. कल्पवृक्षाची गोष्ट खूप समर्पक आहे. एक संशयी मनुष्य तळपते ऊन सहन न झाल्याने एका झाडाखाली जाऊन बसला. मनात म्हणाला, 'इथे पाणी असते तर किती बरे झाले असते.' तोच त्याच्या दृष्टीस एक झरा पडला. मोठया आनंदाने तो तिथे गेला. थंडगार पाणी पिऊ लागला. पाणी पिताना त्याच्या मनात विचार आला, 'या वेळी आपल्याला कोणी फळे आणि मिठाई आणून दिली तर'.. आणि काय आश्चर्य त्याच्या समोर एक फळांचे व एक मिठाईचे ताट आले. तो खूश झाला. त्याचा आस्वाद घेताना त्याच्या मनात विचार आला, 'हा भुताटकीचा प्रकार तर नसावा?'.. आणि ताबडतोब भूतांच्या नाचण्याचा आवाज त्याचा कानी पडला. तो घाबरून गेला आणि त्याच्या मनात विचार आला की एखादे भूत माझ्यासमोर येऊन उभे तर नाही राहणार?' तोच एक भूत डोळे वटारून जीभ बाहेर काढून त्याच्या समोर येऊन उभे राहिले..भिऊन त्याने डोळे मिटून घेतले. "हे भूत मला खाणार तर नाही."त्याच्या मनात हा विचार आला.आणि भूताने त्याला खाऊन टाकले. गोष्ट काल्पनिक जरी असली तरी वास्तव परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही. आपण जसा विचार करतो तसेच आपल्या बाबतीत घडत जातं. जसा संकल्प तशी प्राप्ती होते. दुःखी विचारांनी दुःखी मन बनते. पापी विचारांनी पापी मन बनते. निरोगी विचारांनी निरोगी मन बनते. आनंदी विचारांनी आनंदी मन बनते. पवित्र विचारांनी पवित्र मन बनते. चांगले विचार मनात आणावेत. कारण विचाराच्या पायावरच कृतीची इमारत उभी असते. आपली आजची चांगली वाईट परिस्थिती ही आपल्या चांगल्या-वाईट विचारांची निर्मिती असते. म्हणून आपले विचार निर्मळ आणि सकारात्मक असणे आवश्यक आहे. आपण आपल्या मनाशी सुसंवाद घडवून आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाची वाट शोधायला हवी. संत तुकाराम महाराज आपल्या एका अंभगात म्हणतात,

**"तुका म्हणे होय मनासी संवाद**
**आपुलाचि वाद आपणाशी।।"**

# संकटे येतात ती मनुष्याला मजबूत बनविण्यासाठी



प्रा. प्रवीण डिगांबर बोंद्रे
संपर्क क्र. : 7620021396

आधुनिक केसरी

**प्रत्येक मनुष्याला आनंदी, सुखमय जीवन जगायचे असते. मनुष्याला आवडतात ते केवळ सुखाचे क्षण, आनंदी क्षण आणि त्याला वाटते आपल्या आयुष्यात हा आनंद हे सुख चिरकाल टिकून राहावे. दुःख आपल्या आयुष्यात यायलाच नको. दुःखाचा स्पर्श सुद्धा आपल्याला व्हावयास नको. दुःख निर्माण होते ते संकटे आपल्यावर ओढवली की. संकटे आपल्यावर येऊ नयेत अशी प्रत्येकाची इच्छा असते पण तरीही ती संकटे आपल्यासमोर माउंट एवरेस्ट या पर्वतासाठी उभी राहतात. कधी कधी काही संकटे आपण चुटकीनिशी सहज सोडवितो . मात्र काही काही संकटे मात्र हे आपल्याला आव्हानात्मक वाटतात. संकटे ही आपली इच्छा असो वा नसो तरीही ती येतातच. मित्रहो ही संकटे नेहमीच तुमचे दार ठोठावतील , पण तुम्ही घाबरू नका . बिलकुल घाबरून जाऊ नका.**

मित्रहो संकट जेवढे आव्हानात्मक असेल, जेवढे मोठे असेल, त्याहीपेक्षा मोठे आपल्याला झाले पाहिजे. त्याला सोडवण्याची आपण आपल्या मनाची तयारी ठेवली पाहिजे. संकटे येतात तेव्हा आपणच आपल्या सोबत उभे राहिले पाहिजे. वेळेवर कोणीही कुणाचे नसते. वेळेवर कोणीही तुम्हाला मदत करायला तयार नसते. त्यावेळी तुम्ही तुमच्या सोबत स्वतः किती खंबीरपणे उभे राहता याला सर्वात जास्त महत्त्व आहे. आपल्यावर संकटे येतात तेव्हा आपण त्या संकटापेक्षा मोठं व्हायचं असते.

आपण एक छोटीशी गोष्ट ऐकली असेल. शाळेत गुरुजी फळ्यावर एक मोठी रेष ओढतात आणि विद्यार्थ्याला विचारतात की, तुमच्यापैकी कोण या रेषेला हात न लावता, स्पर्श न करता, लहान करणार ? तेव्हा विद्यार्थी विचारात पडतात की ही रेष तिला हात लावल्याशिवाय कशी लहान करायची ? कशी मोडणार ? विद्यार्थ्यांची उत्सुकता वाढीस लागते. तेव्हा एक विद्यार्थी उठून उभा राहतो. गुरुजीला सांगतो या रेषेला जर लहान करायचे असेल , हात न लावता, तर या रेषेच्या बाजूला एक तिच्यापेक्षा मोठी रेष ओढायला हवी. एका रेषेच्या बाजूला तिच्यापेक्षा मोठी रेष ओढली तर आधीची रेष आपोआप लहान होईल. तसेच संकटांचे पण आहे. जेव्हा संकटे येतात तेव्हा त्या संकटांपेक्षा त्या संकटाला सोडविण्याची आपली मनाची तयारी ही सर्वात मोठी ठेवली पाहिजे. आपण त्या संकटांपेक्षा खूप मोठे झालं पाहिजे म्हणजे ते संकट आपोआप लहान होईल.

आपण संकटांकडे संकट म्हणून बघायला नको कारण त्या संकटातच तर खरी संधी दडलेली असते. संकटे आली की आपण आपल्या सर्व क्षमता तपासून पाहतो. तेव्हा खऱ्या अर्थाने आपल्याला आपल्यात असलेल्या क्षमतांची, शक्तींची जाणीव होते. आपल्यातील हुशारीची जाणीव होते. संकटे ही आपल्याला मजबूत बनवण्यासाठी येत असतात . संकटे आपल्याला मजबूत बनवीत असतात.


आपण मोठ्या संकटांचा सामना यशस्वीपणे करू शकलो तर, लहान-मोठी संकटे आपल्यासमोर काहीच नाहीत.

विशेषतः संकटातही संधी दडलेली असते. त्या संदर्भात एक गोष्ट सांगतो आहे. दोन मित्र होते. दोघांनी पतसंस्थेच्या व्यवसाय सुरू केला. एक अध्यक्ष म्हणून तर एक पतसंस्थेचा मॅनेजर म्हणून काम बघत होता. पण COVID-19 च्या विषाणू ने थैमान घातले. त्यामुळे मॅनेजरचे कमाईचे इतर मार्ग बंद झाले. पतसंस्थेच्या व्यवहारातील 15 ते 17 हजार रुपये मॅनेजरच्या घर खर्चात चालले गेले. त्यामुळे मग त्या मॅनेजरचा दोन-तीन महिने पतसंस्थेचा हिशोब जुळला नाही. अध्यक्षांचा मॅनेजर वरील विश्वास कमी कमी होत गेला. त्यामुळे अध्यक्षाने पतसंस्थेची विड्रॉलची जी प्रणाली नेहमीप्रमाणे चालत होती ती बंद केली. अध्यक्षांनी मॅनेजरला लोकांच्या विड्रॉलकरिता जे पैसे रोजच्या वापरायला पहिजेत होते, ते देणे बंद केले. मॅनेजर भरपूर अडचणीत आला. लोक त्याला बचत खात्यातील पैसे मागायचे. पण त्याच्याजवळ पैसे नसल्यामुळे ते लोकांचे बचत खात्यातील पैसे द्यायला मॅनेजरला खूप अडचण निर्माण झाली. अध्यक्ष वापरायला पैसे देत नाही आणि स्वतःकडे काहीच बचत पैसा त्या मॅनेजर कडे शिल्लक नव्हता. कमाईचे COVID-19 मुळे इतर सर्व मार्ग त्या मॅनेजरचे बंद झालेले होते.या अडचणीच्या दिवसात त्याला कोणीच मदत करत नव्हतं. साथ देत नव्हतं. शेवटी त्या मॅनेजरने एक छोटासा व्यवसाय चालू केला. मॅनेजरने रस्त्यावर एबीसीडीचे, फळांचे, पालेभाज्यांचे, पाढ्यांचे , अआईचे , योगाचे, चार चाकी गाड्यांचे, जग, भारत, महाराष्ट्र, वेगवेगळ्या जिल्ह्यांचे नकाशे, शरिराच्या अंगाचे पोस्टर,बाराखडी, चौदाखडी,अंकांचे, प्राण्यांचे, फुलांचे, इत्यादीचे पोस्टर विकायला सुरवात केली.

मग हळूहळू लहान मुलांना अभ्यासाला आवश्यक असणारी अंकलिपीची पुस्तके, गणित सूत्रे, जनरल नॉलेजची पुस्तकं, महापुरुषांची पुस्तकं, आरत्यांची पुस्तकं, काही जनरल स्टोअर्सचे सामान आणि सोबत भिंतीला लावायचे चित्रांचे वेगवेगळे पोस्टर्स रस्त्यावर विकायला मॅनेजरने सुरुवात केली.

आणि त्यांचा हा व्यवसाय गेल्या दीड वर्षापासून चांगला चालत होता. या व्यवसायातून येणाऱ्या पैशातून ज्या लोकांचे पैसे देणे होते त्या सर्वांचे पैसे मॅनेजरने दिले आणि पतसंस्थेचे सर्व व्यवहार त्याने व्यवस्थित केले.

या मोठ्या आर्थिक संकटात सापडलेल्या त्या मॅनेजरने चांगला मार्ग काढला. लोकांची देणी पण त्याने पूर्णता फेडली. मार्केटमधील त्याची पत त्याने कायम ठेवली. आणि सर्वात महत्त्वाचे त्याच्या पुस्तकांचा व पोस्टर विक्रीचा व्यवसाय खूप चांगला आता चालू लागला. आर्थिक संकटातून त्याला मिळालेली किंवा आलेली संधी म्हणजे त्याचा पुस्तक व पोस्टर विक्रीचा विकसित



झालेला व्यवसाय होय. म्हणून सांगतो आहे संकट कितीही मोठे असले तरी आपण त्या संकटातून मार्ग काढायचा असतो. त्या संकटाला सामोरे जायचे असते. या आर्थिक संकटाने त्या मॅनेजरला पुस्तकांचा चांगला व्यवसाय विकसित करून दिला . म्हणून सांगतो आहे संकटांमध्ये संधी ही दडलेलीच असते.फक्त ती आपल्याला शोधता आली पाहिजे.

आपणास टेस्ट मॅच मधील एक किस्सा सांगतो आहे. पाकिस्तान सोबत भारताची टेस्ट मॅच चालू होती. भारताला ही मॅच ड्रॉ करायची होती. कारण पाकिस्तानची स्थिती मजबूत होती. पाकिस्तानकडून खूप दिग्गज गोलंदाज खेळत होते. वकार युनस, वशिम अक्रम, इमरान खान सारख्या जलदगती गोलंदाजांना मैदानातील पीच ( खेळपट्टी ) खूप साथ देत होती. पीचवरून ( खेळपट्टीवरून) बॉल खूप वेगाने जात होता. या दरम्यान नवज्योत सिंग सिद्धू अनुभवी खेळाडू म्हणून खेळत होता. सुनिल गावस्कर, मांजरेकर, रवी शास्त्री, यासारखे दिग्गज फलंदाज भारतीय टीम कडून खेळत होते . पण दुसऱ्या ईनिंग मध्ये सुरुवातीला चार ते पाच विकेट भारताच्या पटापट गेल्या होत्या . नंतर महत्वाचा फलंदाज नवज्योत सिंग सिद्धू शिल्लक राहिला होता. आणि नवखा नवीन सोळा वर्षाच्या कुरळ्या केसाचा एक युवक चार-पाच विकेट भारताच्या पडल्यावर मैदानात उतरला. तो उतरल्यावर सगळ्यांना वाटले की आता हा पाकिस्तानी जलदगती गोलंदाजांचा शिकार नक्की होणार.

सचिन बॅटिंग करत होता. त्याला बॉल टाकण्यासाठी आला पाकिस्तानी गोलंदाज वकार युनुस . वकार युनुस ने 160 किलोमीटर प्रतितास या वेगाने बॉल बाउन्सर टाकला. तो सचिन तेंडुलकरच्या नाकावर लागला. त्यामुळे त्याचे नाक फुटले. त्याचे नाक रक्तबंबाळ झाले.

सगळे खेळाडू त्याच्याजवळ आले. नवज्योत सिंग सिद्धू पण त्याच्या जवळ आला. डॉक्टरला बोलावण्यात आले. सचिनच्या नाकातून चांगलेच रक्त वाहायला लागले. त्यामुळे डॉक्टर व इतर खेळाडूंनी सचिनला पॅव्हेलियनमध्ये ड्रॉइंग रूम मध्ये जाऊन आराम करण्याचा सल्ला दिला .अशा अवस्थेत सचिनने आराम करायला नका दिला. त्याने म्हटले माझ्यासाठी देश सर्वात प्रथम आहे . 'माझ्या देशाला आता माझी गरज आहे ' असे सचिन म्हणाला .आणि सचिन पुढे पण म्हणाला की" मै खेलेगा " .सचिनचे हे म्हणणे ऐकून सर्वांना आश्चर्य वाटले की, सचिनला खूप लागलेले आहे तरी तो देशासाठी खेळण्याची तयारी दर्शवीत आहे. आणि नवज्योत सिंग सिद्धूला पण सचिनचा खूप अभिमान वाटला. सचिन परत बॅटिंग वर आला. समोर वकार युनुस होताच. वकार युनुस ने बॉल टाकला तसाच तो चार धावांसाठी बॉण्ड्रीच्या बाहेर गेला. वकार युनूस च्या दुसऱ्या बॉलला सुद्धा लगातार दुसरा चौकार सचिनने मारला .आणि सचिनने वकार युनुसच्या डोळ्यात डोळे टाकून बघितले. आणि सचिन वकार युनुसला म्हणाला" तू मख्खन है रे मक्खन" त्यावेळेस वकार युनुसच्या डोळ्यात डोळे टाकण्याची हिंमत कोणातच नव्हती. सचिनने त्या सामन्यात 50 च्या वर धावा काढल्या. आणि मॅच ड्रॉ करण्यात भारत यशस्वी झाला.

सांगायचे तात्पर्य सचिनने ही खेळी करून सर्व भारतीय लोकांचे मन जिंकले. आणि तो संकटात पण आपले मनोधैर्य गमावुन बसला नाही. या संकटाच्या परिस्थितीतून त्याच्या क्रिकेटमधील नवीन कारकिर्दीला सुरुवात झाली. आणि त्याने दाखवून दिले पाकिस्तानी गोलंदाजांना की मी कुठल्याही संकटाच्या परिस्थितीत भारतीय टीमकडून उत्तम खेळी करू शकतो.

***" मंजिले उन्ही को मिलती है जिनके सपनो मे जान होती है! पंख से कुछ नही होता! हौसलो से उडान होती है!"***

म्हणून संकटाच्या स्थितीत हिंम्मत सोडू नका. ज्याने संकटात किंमत सोडली नाही तो विजयी झाला. संकटे आणि अपयश हे मनुष्याला येतातच. ज्यांनी ज्यांनी इतिहास बनवला अशा महापुरुषांनी अनेकदा अनेक संकटांचा सामना केला आहे. त्यांच्या जीवनात अनेकदा संकटे येऊन उभी राहिलेली आहेत. या संदर्भात छत्रपती शिवाजी महाराजांचे उदाहरण देता येईल.

छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य निर्माण करत असताना अनेक शत्रूंचा सामना करावा लागला. विशेषता मुघलांचा. तसेच बाहेरील आक्रमणांमध्ये इंग्रज, पोर्तुगीज डच, फ्रेंच इत्यादींचा सुद्धा सामना शिवाजी महाराजांना करावा लागला. शिवाजी महाराजांनी अनेक संकटकालीन परिस्थितीत शत्रूचा सामना करून स्वतंत्र स्वराज्याची स्थापना केली.

***" जो माणूस कोणत्याही संकटाला भीत नाही, मृत्यूलाही भीत नाही तोच माणूस जीवनाची खरी गोडी चाखू शकतो"***

थॉमस एडिसन या शास्त्रज्ञाला पण बल्बचा आविष्कार करण्याच्या आधी खूप अडचणी आल्या होत्या. त्याच्या समोरही अनेक संकटे उभी होती. त्यामुळे त्याने 999 प्रयोग केले तरीही त्याला बल्ब चा शोध लागला नाही. शेवटी त्याला एक हजारावा प्रयोग करावा लागला. तेव्हा त्याला बल्बचा आविष्कार झाला. त्याला बल्ब शोधून काढता आला. अडचणी आणि संकट, अपयश हे सगळ्यांसमोरच असतात . अपयशाची कारणे देत स्वस्त बसू नका. थॉमस एडिसन पण स्वस्त बसला नाही. म्हणूनच त्याला बल्बचा आविष्कार झाला. त्याने अडचणीला, संकटांना संधी बनवली .आणि त्यांनी सांगितले मी 999 वेळा अपयशी झालो असलो तरी मी पूर्णपणे अपयशी झालोच नव्हतो . तर प्रत्येक प्रयोगाला मला काहीतरी नवीन अनुभव आला. काहीतरी नविन मला शिकता आलं. काहीतरी नवीन मला प्राप्त झालं. त्यामुळे तुम्हाला सांगत आहे कितीही अडचणी आणि संकटे आली तरी, थांबू नका. विजय तुमचाच असेल.

***" अपयशाच्या कठीण खडकाखालीच यशाच्या पाण्याचा झरा असतो"
कार्यात यश मिळो न मिळो
प्रयत्न करण्यास कुचराई करू नका.***

# एस टी बसेसना वाढत्या आगी चिंताजनक



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या अर्थात ( एस टी ) बसेसला आगी लागण्याच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. या आठवड्यात मंगळवारी दोन बसेसना तसेच बुधवारी एका बसला आग लागल्याची घटना घडली. सुदैवाने यात कोणतीही जिवीतहानी झाली नाही. अर्थात एस टी बसेसला आग लागण्याची ही पहिली घटना नाही याआधीही अनेकदा अशा घटना घडल्या आहेत. शिवशाही बसला आग लागली ही बातमी तर वर्तमानपत्रात हमखास वाचायला मिळते. एस टी बसेसला आग लागण्याच्या घटना वाढत असताना एस टी महामंडळ मात्र ते गांभीर्याने घेत नाही ही अधिक चिंताजनक बाब आहे.**









वास्तवीक एस टी बसेसला आग लागू नयेत यासाठी एस टी महामंडळाने तातडीने पावले उचलायला हवीत. या आठवड्यात ज्या तीन बसेसना आग लागल्या त्यात सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झाली नाही मात्र यापुढे जर अशी घटना घडली तर जिवीतहानी होणारच नाही याची शाश्वती एस टी महामंडळ देणार आहे का? प्रवाशांच्या जीवाशी खेळण्याचा अधिकार एस टी महामंडळाला कोणी दिला ? प्रवाशांचे जीवित धोक्यात असताना देखील एस टी महामंडळ त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत आहे ही चिंतेची बाब आहे. जर एखाद्या अपघातात एस टी ला आग लागली तर समजू शकते पण उभ्या असलेल्या आणि रस्त्यावर धावत असलेल्या बसेसना आगी लागतात ही धक्कादायक बाब आहे. बरे या घटना एका डेपोत किंवा एका जिल्ह्यात घडतात असे नव्हे तर संपूर्ण राज्यात घडतात याला जबाबदार आहे ते एस टी चे ढिसाळ प्रशासन. वास्तविक एस टी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची जीवनवाहिनी मानली जाते. दररोज लाखो प्रवासी एस टी ने प्रवास करतात. ग्रामीण भागात तर एस टी हेच प्रवाशांच्या प्रवासाचे एकमेव साधन आहे. शाळा कॉलेजमधील विद्यार्थीही एस टी नेच प्रवास करतात. एस टी महामंडळही वारंवार एस टी चे तिकीट वाढवून प्रवाशांच्या खिशावर डल्ला मारतात. ऐन दिवाळीच्या तोंडावर एस टी महामंडळाने आपल्या भाड्यात दहा ते तीस टक्के इतकी दरवाढ केली. प्रवाशांकडून पुरेपूर वसुली करणाऱ्या एस टी महामंडळाने प्रवाशांना पुरेश्या सुविधा द्यायला नकोत का ? एस टी बसची वेळेवर दुरुस्ती होत नाही जर एस टी महामंडळ वरचेवर भाडेवाढ करत असतील तर एस टी ची वेळेवर देखभाल दुरुस्ती करणे हे महामंडळाचे काम नाही का? आज सर्वच डेपोची दुर्दशा झाली आहे. एस टी बस संदर्भात तर न बोललेलंच बरं ! अगदी भंगार झालेल्या बसही रस्त्यांवरून धावताना दिसतात. त्यांची वेळेवर देखभाल दुरुस्ती केली जात नाही. अगदी मोडकळीस आलेल्या बस आजही रस्त्यांवरून धावताना दिसतात. आज रस्त्यांवरून धावणाऱ्या किमान दहा टक्के बसेसचे आयुष्य संपलेले आहे.नियमानुसार दहा वर्षांपेक्षा अधिक किंवा बारा लाख किलोमीटर पेक्षा अधिक धावलेल्या बस एस टी ताफ्यातून बाद केल्या जातात मात्र आजही अशा आयुष्य संपलेल्या शेकडो बस रस्त्यांवरून धावताना दिसतात. यात खरं तर एस टी कर्मचाऱ्यांचे त्यातही चालक व वाचकांचे कौतुक करायला हवे कारण अशा जीर्ण झालेल्या बसचे ते स्वतःचे जीव धोक्यात घालून सारथ्य करतात. एस टी कामगार संघटनेने या आयुष्य संपलेल्या आणि जीर्ण झालेल्या बसेस एस टी ताफ्यातून हटवण्यात याव्यात ही मागणी वारंवार केली आहे मात्र एस टी महामंडळ त्याकडे दुर्लक्ष करत आहे. एखादी मोठी दुर्घटना घडून त्यात प्रवाशांचा जीव गेल्यावरच महामंडळाला जाग येईल का ?

# अवैध धंदेवाल्यांची गय केली जाणार नाही

## सपोनि देवीदास वाघमोडे : फर्दापूर पोलिसांनी १२ जुगारीला खेळत असताना घेतले ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील जंगलातांडा येथे पोलिसांची धडाकेबाज कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. कार्तीक पौणिर्मेच्या मुहूर्तावर जबरदस्त कारवाई करत अवैध विक्रेते आणि जुगार अड्ड्यावर कारवाई करत बारा जणांना अटक केली. पोलिस ठाणे फर्दापूर अंतर्गत मौजे जंगला तांडा शिवारात आयटीआय पाठीमागील असलेले कॉलेज परिसरामध्ये दोन ठिकाणी एकूण बारा आरोपी तिरट व झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळत असतांना 20,990 रोख, 8,700 रुपयांचे पाच मोबाईल्स व 1,40,000/- रुपयांच्या एकूण चार मोटरसायकल इत्यादी मुद्देमालासह 1,69,690/- रुपयांच मुद्देमाल जप्त करुन एकूण 12 आरोपी विरुद्ध महाराष्ट्र जुगार कारवाई करण्यात आलेली आहे. पहिल्या रेडमध्ये आरोपी नामे 1) अनिल मिश्रीलाल राठोड, वय 32 वर्ष,रा जंगला तांडा 2) शेख शरीफ शेख शकुर वय 30 वर्ष रा सोयगाव 3)रविंद्र तुकाराम राठोड , वय 28 वर्ष, रा जगला तांडा 4) अर्जुन मनसुख राठोड वय 33 वर्ष,रा जंगला तांडा 5) चंद्रास लोटू रोकडे वय 66 वर्ष, रा आमखेडा सोयगाव 6) समाधान ओंकार राठोड वय 30 वर्षे सर्व रा.जंगला तांडा यांच्याकडे रोख रक्कम 8,910 रोख मोबाईल,03 किंमत अंदाजे 4000 मोसा 65,000 एकुण रुपये 77,910 चा मुद्देमाल मिळुन आला.

तसेच दुस-या रेडमध्ये ईसम नामे 1) नंदलाल त्रंबक चव्हाण, वय 44 वर्ष,रा जंगला तांडा 2) गणेश पंडित कापरे वय 42 वर्ष रा सोयगाव 3) विष्णू गोविंदा मानकर , वय 44 वर्ष, रा सोयगाव 4) संदीप प्रल्हाद बिरारे वय 35 वर्ष,रा गलवाडा ता सोयगाव 5) राजेंद्र सुरेश काळे वय 48 वर्ष, रा सोयगाव 6) नामदेव श्रीचद चव्हाण वय 28 वर्षे रा.जंगला तांडा यांच्याकडे रोख रक्कम 12,080 रोख मोबाईल,03 किंमत अंदाजे 4,700 व मोसा 02 किंमत 75,000 एकुण रुपये 91,780 असा जुगार मुद्देमाल मिळुन आला. त्याच्यावर पो.स्टे. फर्दापूर येथे गु.र.नं. 152/2022 व 153/2022 कलम 12 महाराष्ट्र जुगार कायद्याप्रमाणे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदरची कारवाई मा. पोलिस अधीक्षक साहेब श्री. मनीष कलवानिया साहेब व मा. उपविभागीय पोलिस अधिकारी श्री विजयकुमार मराठे साहेब यांचे मार्गदर्शनामध्ये सहायक पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे, पोउपनि कासले, पोलिस नाईक नीलेश लोखंडे, पोलीस अंमलदार आनंद पगारे, सतीश हिवाळे , भरत कोळी, प्रकाश कोळी यांच्या पथकाने केली आहे.तसेच सपोनि देवीदास वाघमोडे यांनी माहिती दिली की परिसरात अवैध धंदे चालवणाऱ्यांची गय केली जाणार नाही तसेच कायदाचा भंग केल्यास कडक कारवाई केली जाणार, पोलिसांची कारवाई सुरू असल्याने अवैध धंद्यावाल्यांचे फर्दापूर परिसरात ढाबे दाणाणले असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत निर्णयाची वाट बघू : अजित पवार

## सरकारच्या नाकर्तेपणामुळे मोठे प्रकल्प बाहेर गेले

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत निवडून आलेले कार्यकर्तेच पक्षाला ताकद देतात त्यातून आमदार, खासदार तयार होतात. हेच लोक लोकसभा, विधानसभा निवडणुकीची वाट सोपी करणारे आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्या विचारांची माणसे निवडून आणावी असे सांगतानाच पक्षाकडून निर्णय येईल याची वाट बघत बसू नका. निर्णय येईल तेव्हा येईल तोपर्यंत स्वतंत्र लढायचं आहे त्यादृष्टीने कामाला लागा असे आवाहन विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केले. राष्ट्रवादीच्या मंथन शिबीरात स्वराज्य संस्था निवडणुकांबाबत मार्गदर्शन करताना अजित पवार यांनी शिंदेसरकारच्या चुकीच्या धोरणावर हल्ला केला. लोकशाही व्यवस्थेला नख लावण्याचे काम होतेय परंतु ते कधीही यशस्वी होणार नाही. सर्व निवडणुका वेळेत होणे आवश्यक आहे परंतु निवडणूकांना विलंब लावला जात आहे हे लोकशाहीच्या दृष्टीने योग्य नाही. निवडणूका वेळेत होणे याकडे राज्य निवडणूक आयोगाने लक्ष दिले पाहिजे त्यांची ती जबाबदारी आहे असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले.

'राष्ट्रवादी मंथन वेध भविष्याचा' हे ब्रीद वाक्य घेऊन आपण हे शिबीर करत आहोत. येणाऱ्या भविष्यात पक्षाने काय केले पाहिजे, कसे वागले पाहिजे, कोणत्या पध्दतीने काम केले पाहिजे. पक्षाची पुढची वाटचाल ठरवण्यासाठी हे शिबीर असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. सत्तेच्या माध्यमातून लोकांच्या विकासाकडे लक्ष दिले पाहिजे. फेब्रुवारी २०२३ मध्ये पाच निवडणूका होत आहेत. याबाबत सर्व पक्षाच्या लोकांना घेऊन चर्चा करण्यात आली आहे. या निवडणूका आघाडी म्हणून लढवल्या जाणार आहेत. या पाचही जागा आघाडीच्या कशा येतील त्यासाठी जीवाचे रान केले पाहिजे असे आवाहनही अजित पवार यांनी केले.

सरकारच्या नाकर्तेपणामुळे मोठे प्रकल्प बाहेर गेले आहेत त्यातून लाखो नोकऱ्या तरुणांना गमवाव्या लागल्या आहेत. मात्र सरकार याचे लंगडे समर्थन करताना दिसत आहे असा आरोपही अजित पवार यांनी केला.

चार लाख कोटी एवढी गुंतवणूक राज्यात येईल असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहात सांगितले होते. मात्र आता महाविकास आघाडीच्या काळात प्रकल्प गेला हे धांदात खोटं बोलत आहेत. अंगलट आल्यावर दिल्लीला जातो आणि प्रकल्प घेऊन येतो सांगत आहेत. मात्र यांच्यामुळेच बेकारी वाढत आहे. नोकऱ्यांवर गंडांतर येत आहे. हे सरकार जनतेची पूर्णपणे फसवणूक करत आहेत. 'रेटून बोल पण खोटं बोल' हा धंदा सध्या सरकारचा सुरू आहे अशी जोरदार टीका अजित पवार यांनी केली.



महाराष्ट्राचे प्रकल्प बाहेर जात आहेत. यांचे प्रयत्न तोकडे पडत आहेत. यांना दिल्लीत गेल्यावर तोंड वर करून बोलण्याचा अधिकार नाही. महाराष्ट्रातून प्रकल्प गेले हे शिंदे सरकारचे अपयश आहे. हे सरकार जितका काळ सत्तेत राहिल तितकी बेकारी, बेरोजगारी राज्यात वाढणार आहे असेही अजित पवार म्हणाले. यंदा राज्यात अतिवृष्टीमुळे शेतजमिनीचे आणि पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. आत्महत्या वाढल्या आहेत. शेतकऱ्यांची दिवाळी काळी झाली आहे. ओला दुष्काळ जाहीर करा सांगून तो जाहीर केला नाही. विम्याची भरपाई द्या अशी मागणीही केली आहे. मात्र १३ कोटी जनतेचे हे दूर्देव आहे असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले.


सत्तेवर आल्यावर पक्षाच्या अनेक नेत्यांना आमिषे दाखविली जात आहेत. त्यांच्या खोट्या प्रचाराला बळी पडू नका. जे पक्ष सोडून गेले ते आज अस्वस्थ आहेत तसे ते बोलून दाखवत आहेत. ज्या घरात वाढलो तेच घर उध्वस्त करणे ही बेईमानी जनतेला पटलेली नाही. शिवसेना नाव आणि त्यांचे चिन्ह गोठवले तेही जनतेला रुचले नाही. जनतेचा प्रचंड राग एकनाथ शिंदे यांच्याबद्दल लोकांमध्ये आहे ही जनभावना अजित पवार यांनी यावेळी सांगितली. बच्चू कडू यांनी एका वाहिनीवर मुलाखतीत मुख्यमंत्री म्हणून पद मिळवले ठीक आहे परंतु पक्षावर दावा करणे योग्य नाही असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे. राक्षसी महत्वाकांक्षा योग्य नाही. मोठे प्रकल्प आणणे त्यांना जमणार नाही. वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जात आहे अशी टीकाही अजित पवार यांनी केली.

# धुळ्यातील पदाधिकाऱ्यांची मातोश्री येथे बैठक



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आगामी काळात पुढील सहा महिन्यात महाराष्ट्रात लोकसभा व विधान सभेच्या मध्यावती निवडणूका होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून, महाराष्ट्रातील राजकारण त्या दिशेने सुरू असुन शिंदे फडवणीस सरका मुळे अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्या अनुषंगानेच महाराष्ट्रातील सर्व अठ्ठेचाळीस लोकसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक दि.3 नोव्हेंबर रोजी मातोश्री या पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या निवासस्थानी पार पडली, या बैठकीत शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे, शिवसेना सचिव खा.विनायक राऊत, धुळे जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात आदींच्या उपस्थितीत पार पडली. बैठकीचे प्रास्ताविक खा.विनायक राऊत यांनी केले. पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी धुळे लोकसभा मतदार संघातील समाविष्ट विधान सभा मतदारसंघ त्यांचा आढावा व परिस्थिती माहीती पदाधिकाऱ्यां कडुन जाणुन घेतली व शिवसेना पक्ष नवीन सदस्य नोंदणी,नविन मतदार नोंदणी, बुथ प्रमुख, पन्ना प्रमुख या विषयी येत्या सात दिवसांत करण्यात यावी अशी सुचना देत उपस्थितीत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले, या प्रसंगी शिवसेना धुळे जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात, सहसंपर्क प्रमुख महेश मिस्त्री ,जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे उपजिल्हाप्रमुख किरण जोंधळे, मा.आ.प्रा शरद पाटील, महानगर प्रमुख डॉ.सुशील महाजन यांनी गेल्या पाच महिन्यातील धुळे जिल्हा व महानगर शिवसेनेचा अहवाल पक्षप्रमुखांना सादर केला, पक्षप्रमुखांनी शिवसेनेच्या कार्या बाबत समाधान व्यक्त करीत अजुन जोमाने काम करण्याच्या सुचना उपस्थितीतांना केल्या या प्रसंगी शिवसेनेचे विधानसभा संपर्कप्रमुख अतुल श्रीवर्धनकर, अनिल ढेरे, सुनिल पाटील, जिल्हा समन्वयक कैलास पाटील,महीला संघटक ज्योती पाटील, संघटक मंगेश पवार, उपजिल्हाप्रमुख शानाभाऊ सोनवणे, भरत सिंह राजपुत, किशोर वाघ, तालुकाप्रमुख नाना वाघ, पंकज मराठे, हिम्मत साबळे, अत्तरसींग पावरा, ईश्वर पाटील, गिरीश देसले, विधान सभा क्षेत्र प्रमुख ललित माळी तुषार भामरे, छोटुसींग राजपुत, युवा सेना ग्रामीण युवामम अधीकारी आकाश कोळी आदी उपस्थित होते.

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

● घाऊक आणि किरकोळ ● किराणा, सुका मेवा, मसाले
● क्रॉकरी, घरगुती उपकरणे ● घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
● प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# महामार्गावरील दुभाजके तोडणाऱ्या व्यावसायिकांवर गुन्हे दाखल

## दण्डासहीत ५ वर्षांचा सश्रम कारावास

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जिल्ह्यातील कन्नड खुलताबाद, पाचोड,गंगापूर, करमाड या भागातील महामार्गालगत असलेल्या १५ व्यावसायिकांवर दुभाजकांची तोडफोड केल्या प्रकरणी महामार्ग व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी फिर्याद दिल्यानंतर संबधित पोलीस ठाण्यात गुन्हेदाखल करण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक मनीष कलवानीया यांनी महामार्ग व्यस्थापनाला पोलिसांकडे तक्रार करण्याचे आदेश दिले होते.

या गुन्ह्यात दण्डासहित ५ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षेची तरतूद आहे या व्यावसायिकांनी स्वतः.च्या आस्थापनेत ग्राहकांना सहज येता यावे म्हणून महामार्गावरील दुभाजक तोडले आहेत. या मुळे महामार्गावर अपघाताचे प्रमाण वाढल्याचे पोलिसांनी सांगितले कन्नड विभागात एक वॉशिंग सेंटर, एक फार्म हाऊस व ५ हॉटेलवर गुन्हे दाखल झाले आहेत तर खुलताबाद तालुक्यात दोन हॉटेल विरुध्द् गुन्हे दाखल करण्यात आले आहेत ,गंगापूर तालुक्यात एक पेट्रोलपम्प,चार हॉटेल एक ग्रामपंचायत या आस्थापनावर गुन्हेदाखल झाले आहेत तर पाचोड आणि करमाड पोलीस ठाण्यात अज्ञातांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत . महामार्ग नियमांचे उल्लांघन करणाऱ्यांची गे केली जाणार नसल्याचे कलवानीया शेवटी म्हणाले

# एरंडोलमध्ये वीजचोरांवर कारवाई : महावितरणची मोहीम सुरूच

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** महावितरणने शहरात वीज मीटर तपासणीची धडक मोहीम शुक्रवारी राबविली. एरंडोल उपविभागाच्या पथकाने एकूण 210 वीज कनेक्शनची तपासणी यामोहिमेमध्ये केली. यातएकूण 32 मीटरमध्ये वीजचोरी असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले. सदर मीटर तपासणीसाठी धरणगाव येथीलचाचणी विभागातपाठविण्यात येणार आहेत. महावितरणने ग्रामीण भागानंतर शहरातही वीजचोरी मोहीम राबविल्याने वीजचोरांत खळबळ उडाली आहे. ही मोहीम धरणगाव विभागाचे कार्यकारी अभियंतारमेश पवार यांच्या मार्गदर्शनाखालीएरंडोल उपविभागाचे प्रशांत इंगळे यांच्या नेतृत्वात एरंडोल उपविभागातील सर्व अभियंता-कर्मचाऱ्यांनी राबविली. यातएरंडोल शहर कक्षाचे सहायक अभियंतापी. एस. महाजन, कासोदा कक्षाचे सहायक अभियंता राहुल पाटील, रिंगणगाव कक्षाचे सहायक अभियंता युवराज तायडे, गुणवत्ता नियंत्रण विभागाचे सहायक अभियंताजयदीपसिंग पाटील, एरंडोल ग्रामीण कक्षाच्या सहायक अभियंतालक्ष्मी माने, पिंपळकोठा कक्षाचे कनिष्ठ अभियंता इच्छानंद पाटील, प्रत्येक कक्षातील 2 जनमित्र व बाह्यस्रोत कर्मचाऱ्यांचा समावेश होता.
या पथकातर्फे एरंडोल शहरातील गांधीपुरा या भागात तपासणी करण्यात आली. त्यानंतर संपूर्ण शहरातील मीटरची तपासणी मोहीम सुरूच राहणार आहे. तसेच जप्त करण्यात आलेल्या मीटरमध्ये वीजचोरी आढळल्यास वीजचोरीचीबिले दिली जाणार आहेत. सदर बिल 48 तासाच्या आत न भरल्यास भारतीय विद्युत कायद्यान्वये पोलिस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात येणार आहे. सदर मोहिमेमुळे एरंडोल शहरात तसेच परिसरातील वीजचोरांचे चांगलेच धाबे दणाणले आहे.



# अंगणवाडीच्या पोषण आहारात आढळली पाल

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरातील नंदिनगर वसाहती मधील अंगणवाडीतील बालकांना शुक्रवारी ता .(चार) देण्यात आलेल्या पूरक पोषण आहारात पालीचे मुंडके निघाल्याने एकच खळबळ उडाली आहे.७० बालकावर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करून घरी पाठविण्यात आले असून बालकांची प्रकृती ठिक आहे.
मागील अनेक वर्षांपासून शहरात १८ अंगणवाडी कार्यरत आहेत.सदरील बालकांना देण्यात येणाऱ्या पूरक पोषण आहाराचे वाटप नांदेड येथील एका खासगी कंत्राटदाराकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे.शहरात शूक्रवारी नंदिनगर व जेटिबानगर वसाहतीत असलेल्या अंगणवाडीतील बालकांना वटाणे देण्यात आले यावेळी यात पालीचे मुंडके आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. खाऊ खाल्लेल्या ३० मुली आणि ४० बालकांना येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून घरी पाठविण्यात आले आहे.सर्व बालकांची प्रकृती ठिक असुन विषबाधेचा कुठलाही परीणाम जाणवला नाही कशी माहिती तेथील उपचार



करणा-या डॉक्टरांनी सांगितले आहे.
# सदरील घटणेची माहिती तहसीलदार राजेश लांडगे यांना मिळताच त्यांनी रुग्णालयात जाऊन बालक आणि पालकांची भेट घेऊन चौकशी केली असता झालेला प्रकार हा खरा असल्याचे सांगितले आहे. सूदैवाने बालकांची प्रकृती ठीक आहे.सदरील खाऊचे नमुने पुणे येथील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवली आहेत.प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर काय प्रकार आहे याची माहिती मिळाले त्यानंतर स्पष्टीकरण होईल अशी माहिती तहसीलदार श्री.लांडगे यांनी दिली आहे.

# घरफोडी करणाऱ्या चोराला 24 तासांच्या आत ठोकल्या बेड्या



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** घरफोडी करणाऱ्या आरोपीला चोवीस तासात जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शोध पथकाला यश आले असून या भामट्याकडून जवळपास ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दि . ४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास श्रेष्ठ शंकरलाल अग्रवाल यांच्या कल्पतरु सोसायटी, अग्रवाल नगर येथील राहत्या घराच्या मागील दरवाजा तोडून अज्ञात चोरट्याने पहाटे ३.३० वाजेच्या सुमारास घरातील इलेक्ट्रीक शेगडी मिक्सर व रोख रक्कम असा सुमारे ६० हजार रुपयांचा ऐवज चोरुन नेला. याबाबत अग्रवाल यांनी तात्काळ चाळीसगाव रोड पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली. अधिक चौकशीत एक संशयित चाळीसगाव चौफुली भागात हातात मिक्सर घेवून फिरत असल्याची खबर मिळताच गुन्हे शोध पथकाने तेथे धाव घेवून त्यास ताब्यात घेतले असता त्याने त्याचे नाव इरशाद खान असे सांगितले. त्याला अधिक बोलते केले असता त्याने अग्रवाल यांच्या घरात चोरी केल्याचे कबुल करीत चोरी केलेला मुद्देमाल पथकाला काढून दिला. त्याच्या ताब्यातून मिक्स , मोटारसायकल तसेच रोख रक्कम शिवाय घरफोडीसाठी लागणारे साहित्य असा सुमारे ६० हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधिक्षक प्रशांत बच्छाव, उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश रेडडी यांचे सूचना मार्गदर्शनाखाली सपोनि संदिप पाटील, पोसई नासिर पठाण, पोसई विनोद पवार, पोसई मानदेय काळे , असई दिपक पाटील, पोह . चव्हाण , संदिप पाटील , पोना . पाटील, पोका चेतन झोळेकर स्वप्नील सोनवणे, पोका इंद्रजित चैराट , शरद जाधव , चालक कुलदिप महाजन पोका विशाल मोहीते आदींनी केली.

# राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेचा काँग्रेसला फायदा होणार नाही

## भाजपा प्रदेशाध्यक्ष मा. चंद्रशेखर बावनकुळे यांची स्पष्टोक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेमुळे त्यांच्या पक्षात चैतन्य निर्माण होऊन इतर पक्षांतील कार्यकर्ते काँग्रेसमध्ये जाण्याच्या ऐवजी काँग्रेसमधून भाजपामध्ये कार्यकर्ते प्रवेश करत आहेत. राहुल गांधी यांची यात्रा त्या पक्षातील नेत्यांनी 'हायजॅक' केली असून त्यांच्या पक्षाला यात्रेचा काही फायदा होणार नाही, उलट नुकसानच होईल, असे मत भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी व्यक्त केले.
ठाणे जिल्ह्याच्या संघटनात्मक प्रवासादरम्यान ते ठाणे येथे पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेश सरचिटणीस ॲड. माधवी नाईक व भाजपा ठाणे जिल्हाध्यक्ष आ. निरंजन डावखरे उपस्थित होते.
मा. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेवर त्या पक्षातील नेत्यांचा कब्जा आहे. ते कार्यकर्त्यांना राहुल गांधी यांना भेटू देत नाहीत. परिणामी या यात्रेमुळे त्यांचा पक्ष वाढण्याच्या ऐवजी कमकुवत होत आहे. अन्य पक्षातील नेते – कार्यकर्ते काँग्रेसमध्ये प्रवेश करत नाहीत. उलट काँग्रेसचे कार्यकर्ते भाजपामध्ये प्रवेश करत आहेत. नंदूरबारच्या काँग्रेसच्या तीन नगरसेवकांनी आजच भाजपामध्ये प्रवेश केला. २०२४ ची आगामी निवडणूक येईपर्यंत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसमधील अनेक नेते भाजपामध्ये प्रवेश करतील.
त्यांनी सांगितले की, भाजपा आगामी निवडणूक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बाळासाहेबांची शिवसेना पक्षासोबत युती करून लढवेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अफाट लोकप्रियता, त्यांच्या सरकारचे काम, राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील युती सरकारचे काम आणि पक्षाच्या संघटनात्मक ताकदीच्या जोरावर आम्ही यश मिळवू. आगामी लोकसभा निवडणुकीत राज्यात ४८ पैकी किमान ४५ जागा व विधानसभा निवडणुकीत किमान २०० जागांवर आम्ही यशस्वी होऊ. आमच्या विरोधात तीनही पक्ष एकत्र आले तरी आम्ही विजय मिळवू. महाविकास आघाडी ही वैचारिक आधारावर नव्हे तर केवळ भाजपाला दूर ठेऊन सत्ता मिळविण्यासाठी निर्माण झाली. पण विचार सोडल्यामुळे आता पारंपरिक मतदार दुरावण्याच्या भितीने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे शिवसेनेवर टीका करत आहेत, असे त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

# सावळदबारा परिसरात कापसावरील लाल्या रोगाने शेतकरी हैराण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरात नादागांव, डाभा, देव्हारी, टिटवी, मोलखेडा, नादांतांडा, घाणेगांव तांडा आदी गावात अगोदरच अस्मानी संकटाने ग्रस्त बळीराजा मेटाकुटीला आला असताना सुलतानी संकटामुळे शेतकरी हैराण झाला असता मधातच कपाशी वर लाल्या रोगाने थैमान घातले आहे. परिसरात संपूर्ण शेतकरी सात ते आठ फवारण्या करुनही लाल्या रोग काही शेतकऱ्यांना सोड्याला तयार नाही. परंतु शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण राबवणारे कृषी विभाग सोयगाव यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे अशी मागणी सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी कृषी विभागाकडे केली आहे.अतिवृष्टीने हातचे गेलेल्या सोयाबीन नंतर आता कापसावरील लाल्या रोगाने शेतकरी पुरता हैराण झाला आहे. याबाबत अधिक वृत्त असे की, यंदाचा पाऊसाचे प्रमाण जास्तच आहे, त्यामुळे सर्वत्र महाराष्ट्र मधे हाहाकार माजला आहे. अतिवृष्टीमुळे हाता तोंडाशी आलेल्या सोयाबीनच्या पिकाची नासाडी झाल्याने यंदाची शेतकऱ्यांची




दिवाळी अंधारातच साजरी झाली. त्यात परतीच्या पावसाने ही कोणतीही कसर सोडली नाही. कपाशीचे आकलन करून पिकाबाबत मार्गदर्शन शेतकऱ्यांना करण्यात यावे. अतिवृष्टी नंतर शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सोयगाव कृषी विभागाने खरीपाचे पंचनामे केले.पिकाबाबत योग्य मार्गदर्शन केले.तसेच आता लाल्या रोगाचे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात यावे अशी मागणी मा.सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केली आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# दिल्लीत काँग्रेसची ४३ उमेदवारांची पहिली यादी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** गुजरात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने अलीकडेच निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. त्यानुसार १ आणि ५ डिसेंबर रोजी दोन टप्प्यात या निवडणुका पार पडणार आहेत. तर या निवडणुकीत कोण बाजी मारणार? हे ८ डिसेंबर रोजी स्पष्ट होणार आहे. निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतर सर्वच राजकीय पक्ष जोमाने प्रचार सुरू केला आहे. दरम्यान काँग्रेसने ४३ उमेदवारांची पहिली यादीही जाहीर केली आहे. गुजरात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने काल (४ नोव्हेंबर) रोजी रात्री उशीरा ४३ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीने नवी दिल्लीत एआयसीसी मुख्यालयातील बैठक पार पडल्यानंतर ही पहिली यादी जाहीर केली. काँग्रेसचे सरचिटणीस मुकुल वासनिक यांनी यादी जाहीर करताना सांगितले की, पुढे योग्य वेळी अन्य जागांवरील उमेदवारांची यादीही जाहीर केली जाईल. तर गुजरातमध्ये सत्ताधारी भाजपाकडून अद्याप उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आलेली नाही. गुजरातमध्ये सत्ता टिकवण्यासाठी भारतीय जनता पार्टीकडून जोरदार प्रयत्न केले जात आहेत. तर काँग्रेसकडूनही पुनरागमनासाठी प्रयत्न सुरू आहेत. या दोन पारंपरिक प्रतिस्पर्धकांमध्ये आम आदमी पार्टीही या निवडणुकीत आपली संपूर्ण ताकद पणाला लावताना दिसत आहे. दरम्यान, आता या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'सी व्होटर'ने घेतलेल्या सर्वेक्षणाची आकडेवारी समोर आली आहे.

या सर्वेक्षणात गुजरातमधील लोकांना विचारण्यात आलं की, तुम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कामावर समाधानी आहात का? त्यावर ६५ टक्के लोकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कामावर समाधानी असल्याचं म्हटलं आहे. तर १५ टक्के लोकांनी पीएम मोदींच्या कामाला सरासरी काम म्हटलं आहे. दुसरीकडे, २० टक्के लोकांनी नरेंद्र मोदींच्या कामावर असमाधानी असल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे गुजरातमध्ये पुन्हा एकदा भाजपाची सत्ता स्थापन होण्याचा संकेत मिळाले आहेत.



# लहान लहान कार्यकर्त्यांनी काम केल्याने परिवर्तनाची ताकद : शरद पवार

## 'राष्ट्रवादी मंथन वेध भविष्याचा'; दोन दिवसाच्या शिबीराची सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** आजच्या शिबिरातून एक चांगला संदेश राज्यात जात आहे. लहान - लहान कार्यकर्त्यांनी काम केल्याने परिवर्तन करण्याची ताकद निर्माण झाली आहे असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय शरद पवार यांनी व्यक्त केला. 'राष्ट्रवादी मंथन वेध भविष्याचा' या टॅगलाईनखाली राष्ट्रवादीचे शिर्डीत दोन दिवसीय राज्यस्तरीय शिबीर पार पडले. हॉस्पिटलमधून थेट शिर्डीत येत शरद पवार यांनी तब्बेतीमुळे थोडक्यात मार्गदर्शन केले. राष्ट्रवादीचे उत्तमरीत्या शिबीर झाले आहे. अनेकांची भाषणे ऐकण्याची संधी हॉस्पिटलमध्ये मिळाली. शिस्तबध्द पध्दतीने पक्षाला शक्ती देणारे शिबीर जयंत पाटील यांनी आयोजित केले त्याबद्दल शरद पवार यांनी त्यांचे कौतुक केले.

या शिबिराला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता आता पुढे युवक, युवती , महिला, सर्व सेलचे घटक काम करत आहेत त्यांचेही स्वतंत्र शिबीर आयोजित करणार आहेत असेही जयंत पाटील यांनी सांगितल्याचे शरद पवार म्हणाले. हॉस्पिटलमध्ये सर्वच भाषणे ऐकली असं नाही पण काहींची ऐकली. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दहा - पंधरा दिवस आराम करण्याचा सल्ला दिला आहे त्यानंतर मला काम करता येणार आहे असेही शरद पवार म्हणाले.

शरद पवार यांच्या तब्बेतीमुळे त्यांचे विचार माजी गृहमंत्री दिलीप वळसे - पाटील यांनी यावेळी वाचून दाखवले. सरकार गेलं की चिंता करायची नाही. एवढं काम करु की महाराष्ट्राचे चित्र पालटण्याची ताकद आपल्यात आहे. आम्हाला हिंदूत्व कुणाकडून शिकण्याची गरज नाही. आमचं हिंदूत्व छत्रपती शिवाजी महाराजांचे आहे असे सांगतानाच आपल्यात एकतेचा अभाव होता कामा नये. संकट आलं की पाठीशी ताकदीने उभे राहिले पाहिजे. आत्मविश्वास ठेवा. कुठल्याही मंत्री किंवा आमदारांनी एवढ्या वर्षात चुकीचे कधी काम केले नाही. त्यामुळे आपल्या कुणावर संकट आले तर ताकदीने उभे रहा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी केले. शिबीरात शेवटच्या दिवशी जयंत पाटील यांनी पक्षाचे नवनवीन व्हिजन यावेळी मांडले आणि कार्यकर्त्यांमध्ये जोश निर्माण केला. राज्यात ज्याप्रकारे सरकार यायला हवे ते आले नाही. भाजपच्या १०५ मध्ये अस्वस्थता आहे कारण हे सरकार ४० जणांसाठीच काम करत असल्याची भीती भाजप नेत्यांमध्ये आहे असा दावा जयंत पाटील यांनी यावेळी केला. राष्ट्रवादी व पवारसाहेब काय करतात याबाबत राज्यात चर्चा असते. आपण कुणाशी लढणार आहोत याचे मार्गदर्शन दोन दिवस या शिबीरात झाले. आईवडिलांना शिव्या द्या पण मोदींना नको बोलतात त्यांच्याविरोधात आपली लढाई आहे असेही जयंत पाटील यांनी स्पष्ट केले. सोयीचे असेल ते कसे वाजवायचे आणि आपण बोलतो तेच बाहेर वाजते त्यांच्याविरोधात आपली लढाई आहे. जिल्हाधिकाऱ्यांना दारु पिता का असं विचारणारा मंत्री या मंत्रीमंडळात आहे. हे कोणत्या पातळीवर आहेत लक्षात येत आहे त्याविरोधात आपली लढाई असल्याचे जयंत पाटील यांनी सांगितले. अतिवृष्टी झाली त्या सर्व ठिकाणी ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी करणारा ठराव आज या शिबिरात करण्यात आला. महाराष्ट्रासोबत दुसरं राज्य स्पर्धा करु शकत नाही परंतु घाबरुन दुसऱ्या राज्यात जाणारा प्रकल्प थांबवला जात नाही याबाबत तीव्र नाराजी जयंत पाटील यांनी व्यक्त केली. पूल पडणे हा ईश्वरी संकेत असे मोदी पश्चिम बंगालच्यावेळी बोलले असतील तर आता गुजरातमध्ये हा संकेत दिसला पाहिजे असा खोचक टोलाही जयंत पाटील यांनी यावेळी लगावला.

विधानसभेत आपल्या आमदारांनी चांगली कामगिरी केली आहे. रोहित पवार, अनिल पाटील, अमोल मिटकरी, यांच्यासह अनेक आमदारांना विधानसभेत थांबा असं बोलावं लागतं आहे अशी कामगिरी आहे. ही नवीन पिढी राष्ट्रवादीचा रथ पुढे नेल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास जयंत पाटील यांनी विधानसभेतील युवा आमदारांच्या कामकाजावर बोलताना व्यक्त केला. आपला पक्ष ताकदीने उभा करुया. पुढच्या काळात सक्षम व सर्वसामान्यांचा विचार करणारा पक्ष आहे हे चित्र निर्माण करुया. २३ वर्षात चार वेळा सत्ता स्थापन करायला मिळाली आहे. महापुरुषांकडून प्रेरणा घेऊन आपला पक्ष काम करतोय. २०२४ ला राष्ट्रवादीचे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. २५ वर्ष पूर्ण होत आहे त्यामुळे ताकदीने काम केले तर एक नंबरचा पक्ष बनेल असे आवाहनही जयंत पाटील यांनी केले.

महागाई वाढली आहे. गॅसची सबसिडी दिली नाही हे लोकांना सांगण्याची गरज आहे. भाजपच्या कामाने जनतेच्या मनात निराशा वाढलीय.

भाजप शंभर टक्के संसदेत निवडून जाणार असे चित्र निर्माण केले जात आहे परंतु आकडेवारी पाहिली तर याला छेद देणारे चित्र आहे असेही जयंत पाटील यांनी काही आकडेवारी सांगत स्पष्ट केले.

सध्या ५० खोक्यांची चर्चा जोरदार सुरू आहे. शेंबड्या पोरांनाही ही चर्चा माहीत झाली आहे म्हणून हीच शेंबडी पोरं नागपूरात जाऊन आंदोलन करत आहेत असा टोलाही जयंत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांना लगावला. राष्ट्रवादीच्या नेत्यांना त्रास दिला जात आहे तरीही राष्ट्रवादी लढा देत आहे. राष्ट्रवादीच्या नेत्यांना टार्गेट करण्याचे काम सुरू आहे आव्हान देणारा एकमेव पक्ष आहे त्यामुळे हल्ला होत आहे असेही जयंत पाटील म्हणाले.

# आशियातील मिरची राजधानीला पुराचा मोठा फटका; पाकिस्तानात दर वाढण्याची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** आपला शेजारी असलेल्या पाकिस्तानला देशाला यावर्षी पुराचा मोठा फटका बसला आहे. पुराच्या थैमानाने पाकिस्तानच्या शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. पाकिस्तानातील प्रसिद्ध असलेलया लाल मिरचीचे पीक पुरामुळे नष्ट झाले आहे. त्यामुळं यंदा लाल मिरची अधिक महागण्याची शक्यता आहे. दक्षिण पाकिस्तानातील कुनरी हे शहर आशिया खंडातील मिरचीची राजधानी म्हणून ओळखली जाते. तिथेही मिरची पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. भारताबरोबरही पाकिस्तानचा मिरचीचा व्यापार आहे. देशात यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. काही भागात अतिवृष्टी देखील झाली आहे. याचा मोठा फटका शेती पिकांना बसला आहे. भारताबरोबरच आपला शेजारचा देश असलेल्या पाकिस्तानला देखील अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, पाकिस्तानातून दरवर्षी मोठ्या प्रमाणात इतर देशांना लाल मिरची पाठवली जाते. मात्र, यावर्षी पुराचा मोठा तडाखा मिरचीला बसला आहे. दक्षिण पाकिस्तानातील कुनरी शहर आशिया खंडातील मिरचीची राजधानी म्हणून ओळखले जाते. मात्र, तिथेही मिरची पिकाला मोठा फटका बसला आहे.

# भारतीय मजदूर संघाची महाराष्ट्रव्यापी मजदूर चेतना यात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कामगार कायद्यातील एकतर्फी बदल, कामगारांच्या कायम स्वरूपी रोजगारावर आलेली गदा, महाराष्ट्रातील असंघटित कामगारांवर कोणत्याही प्रकाराची सामाजिक सुरक्षा नसल्याने , विविध उद्योगातील वाढत चाललेले कंत्राटी कामगारांची मोठी संख्या, घटत चाललेली कायम स्वरूपी नोकरी अशा विविध प्रश्नांवर संघटित व असंघटित कामगारांच्या मागण्यां करिता भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशातर्फे दि २१ डिसेंबर २०२२ रोजी मंत्रालय मुंबई येथे भव्य मोर्चा चे आयोजन करण्यात आले आहे असून त्याची जनजागृती करण्यासाठी दि ६ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत महाराष्ट्रातील सर्व जिल्हा मध्ये मजदूर चेतना यात्रेचे आयोजन केले आहे अशी माहिती पुणे येथे झालेल्या पत्रकार परिषदेत भारतीय मजदूर संघाचे प्रदेशाध्यक्ष अनिल ढुमणे यांनी दिली. या वेळी महाराष्ट्र प्रदेशचे संघटनमंत्री श्रीपाद कुटासकर, पुणे जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण, चिटणीस बाळासाहेब भुजबळ, महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघांचे अध्यक्ष निलेश खरात, अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे महामंत्री सचिन मेंगाळे,उमेश विस्वाद उपस्थित होते. भारतीय मजदूर संघाने २१ डिसेंबर २०२२ मंत्रालय मुंबई येथे कामगारांच्या विविध मागण्यांसाठी न्याय हक्कांच्या करिता कामगारांच्या भव्य मोर्चा काढणार असुन या मोर्चा द्वारे महाराष्ट्रातील संघटित व असंघटित क्षेत्रातील प्रलंबित प्रश्ना बाबतीतच्या मागण्या राज्य शासनाकडे मांडणार आहे. असंघटित कामगारांकरिता सामाजिक सुरक्षा कोड त्वरित लागु करून सुरक्षा मंडळा मार्फत लाभ देण्यात यावा. कंत्राटी कामगार पध्दत बंद करून तेथे कार्यरत रिक्त जागांवर कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांची कायम स्वरूपी नियुक्ती करावी, तसेच राजस्थान, ओडिसा,हरियाणा, पंजाब राज्याप्रमाणे कंत्राटी कामगारांना कायम नोकरीत समाविष्ट करावे. घरेलु कामगार कल्याण मंडळाचे काम बांधकाम कल्याण मंडळामार्फत सुविधा, लाभ देण्यात यावेत. अंगणवाडी सेविका व आशा वर्कर्स यांच्या मानधनात वाढ करून त्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे. बिडी उद्योगातील कामगारांना किमान वेतना ची प्रभावीपणे अंमलबजावणी त्वरित करण्यात यावी. ई पी एफ पेंशन दरमहा रू ५००० करण्यात यावी व महागाई भत्ता देण्यात यावा. राज्य सरकारी कर्मचारी करिता जुनी पेंशन योजना लागु रण्यात यावी. पेट्रोल, डिझेल व गॅस यांना जी एस टी च्या कक्षेत आणुन महागाई वर नियंत्रण आणावे. संरक्षण उद्योगांचे खाजगीकरण मागे घेण्यात यावे. बॅंक व एल आय सी चे खाजगीकरण मागे घेण्यात यावे. महाराष्ट्रातील प्रलंबित उद्योगातील प्रलंबित किमान वेतन वाढ त्वरित घोषित करण्यात यावी. या महत्त्वाच्या मागण्या करिता दि २१ डिसेंबर २२ रोजी मंत्रालय मुंबई येथे मोर्चा आयोजित केला आहे. ह्या मोर्चाची जनजागृती करण्यासाठी भारतीय मजदूर संघाने दिनांक ६ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२२ या काळात महाराष्ट्र मध्ये मजदूर चेतना यात्रेचे आयोजन केले आहे त्यांची सुरवात श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मभूमी किल्ले शिवनेरी येथून दि ६ नोव्हेंबर २२ रोजी सकाळी १० होणार आहे. दोन विभागात चेतना यात्रेचे नियोजन असून पश्चिम महाराष्ट्र कोकण विभाग जावून समारोप दि १७ नोव्हेंबर रोजी ठाणे येथे होणार आहे.

